# शिक्क्यांवर प्रश्न आणि उत्तरे

[एक भाऊ अन्य भाषेत बोलतो. दुसरा भाऊ त्याचा अनुवाद करतो. मंडळी उच्च स्वराने प्रार्थना करते—सम्पा.]

आमच्या स्वर्गीय पित्या, आम्ही खरचं ह्या समयासाठी आभारी आहोत, की आपण परमेश्वराच्या उपस्थितीत परमेश्वराच्या वचनाभोवती पुन्हा सहभागिता करु शकतो. आम्ही तुझे इतके आभारी आहोत की ह्या सकाळी, तु आमचे सहाय्य करण्यास व आम्हास आशीर्वाद देण्यास आम्हासमवेत आहेस, आम्ही आमच्या पापांची क्षमा मागतो, ह्यासाठी की आमचे दिवे तेलाने भरलेले आणि व्यवस्थित केलेले आणि जळलेले असावेत, की तू आता आमचा उपयोग तुझ्या महान नावाच्या गौरवासाठी करशील. आम्ही हे, परमेश्वराचा प्रिय पुत्र, येशू ख्रिस्ताच्या नावाने मागतो. आमेन.

तुम्ही बसू शकता.

2 मी नुकताच आत येत होतो जेव्हा मी तो संदेश ऐकला जो चालू होता. म्हणून मी…हे खरे आहे की आपण आपले दिवे भरलेले ठेवले पाहिजे, आम्ही आपले ठेवावे…तुम्हाला माहीत आहे, की जेव्हा…तुम्ही तुमचे दिवे पेटवता, तेव्हा तुम्ही तेच आता करु शकत नाही जे तुम्ही करीत होता. समजले? कारण, अग्नि, जो तेलाद्वारे जळतो, काजळी बनवतो. म्हणून हेच कारण आहे की नीटनेटके…तुम्हाला तुमचे दिवे नीटनेटके केले पाहीजे, कारण दिव्याच्या वातीवर काजळी जमा होते. तुमच्यातील कित्येकजण जे माझ्या वयाचे आहेत. जेव्हा आम्ही ते—ते कोळशाच्या तेलाचे दिवे वापरत असू, पाहा, ते…त्यावर—त्यावर काजळी साचत असे, जेथून ते जळत असत आणि त्यामुळे ते जळण्यात अडथळा निर्माण होत असे. म्हणून तुम्ही सर्व काजळी स्वच्छ केली पाहीजे. आणि ह्यासाठी की आपण. "ख्रिस्ताच्या उच्च बोलावण्याकडे, पुढच्या दिशेने, त्या खुणेकडे चालत राहू."

3 आता, ही—ही एक महान, सुंदर सकाळ, बाहेरुन व आतून कारण आता हा ईस्टरचा समय जवळ आला आहे.

4 आणि—आणि आपण आता जर प्रभूची इच्छा असली तर आज रात्री शेवटच्या शिक्क्याकडे येऊ. आणि हा एक अत्यंत, अत्यंत रहस्यमय शिक्का आहे. कारण पवित्र शास्त्रात कोठेही, कुठल्याही चिन्हात, किंवा—किंवा कोठेही ह्याचा उल्लेख केलेला नाही. तो तर थेट स्वर्गातून येणार आहे.

5 आणि हा—हा एक—एक प्रकारे माझ्यासाठी तणावपूर्ण समय आहे. माझ्याबरोबर असे पूर्ण आठवडाभर होते. आता हा माझा…माझ्या खोलीमध्ये आठवा दिवस आहे. आणि मी येथील ह्या अनेक विनंत्यांकडे लक्ष दिले, मला ह्यांतून काहींना निवडणे आहे. त्यांतील कितीतरी आहेत. ज्यांना मुलाखती हव्या होत्या. आणि मला—मला ते आवडते. मला त्या—त्या द्यायला आवडेल, पाहा, परंतु मी—मी पुर्ण ते करु शकत नाही. कारण, तुम्ही समजता, की आता आपण जो प्रयत्न करीत आहोत. तो हा की प्रभूच्या इच्छेचे प्रकटीकरण प्राप्त करुन घेणे, तुम्हाला समजले. जेव्हा आपण मुलाखत घेतो तेव्हा ती तुम्हाला भलतीकडे वळवते, अशा काही गोष्टींच्या दुसऱ्या बाजूस, समजले.

6 आणि, मग, आणि जसे आजाऱ्यांसाठी प्रार्थना करणे, हे पूर्णपणे वेगळे आहे. तुम्ही… हे दृष्टांत आणि गोष्टी आहेत. तुमचा अभ्यास वेगळा असतो, आणि तुम्ही—तुमचा अभिषेक वेगळा असतो. हे अशा प्रकारे असते जसे बायबल म्हणते, "एक—एक झाड जे—जे

पाण्याच्या प्रवाहाजवळ लावलेले असते." "पाण्याचा प्रवाह," पाहा, तेच पाणी, परंतु तेथे एक जाण्याचा मार्ग असतो तो ह्या मार्गाने, तो *ह्या* मार्गाने येतो, आणि *ह्या* मार्गाने येतो. तो *ह्या*वर अवलंबून असतो की कुठल्या मार्गाने येतो. तो तोच आत्मा आहे.

7 पौलाने, पहिले करिंथकरांस पत्र 12 मध्ये, ह्याच गोष्टीविषयी सांगितले, "कृपादानाचे निरनिराळे प्रकार आहेत. तरी आत्मा एकच आहे."

8 म्हणून, तुम्ही पाहा, जर तुम्ही एका गोष्टीवर कार्य करीत आहात, आणि मग दुसऱ्या गोष्टीवर *येण्या*साठी परिवर्तन करता. तुम्हाला कळते की मला काय म्हणायचे आहे. तुम्ही—तुम्ही त्या ओळीवर अभ्यास करत जाता, तुम्ही लोकांना...आणि आता त्यांचे हृदय त्यावर केंद्रीत झालेले आहे. "हे शिक्के काय आहेत?" त्यांचे उद्देश, "काय आहे?" रात्री मागे रात्री, जेव्हा मी येथे येतो, तेथे इतका ताण असतो की मला दुसऱ्या गोष्टीविषयी बोलावे लागते; ह्यासाठी मी एक प्रकारे त्या—त्या तणावांतून शांत व्हावे. तुम्हाला समजले, आणि, मग, जोपर्यंत पवित्र आत्मा त्या शिक्क्याची फोड करीत नाही. आणि मग—मग, मला प्रत्येक रात्री अशाप्रकारे करावे लागते. मग जेव्हा आम्ही ते आरोग्यासाठी किंवा आणखी कशासाठी बदल करतो, पाहा, तुम्ही...लोकांचे संपूर्ण लक्ष त्या एका गोष्टीकडे लागलेले असते. तुम्ही ते सहसा पुन्हा दुसरीकडे वळवू शकत नाही.

9 आणि—आणि मग, मी हे जाणतो की तुमच्यामध्ये ह्या गोष्टी घडत आहेत, पाहा, की मी—मी...मला—मला ठाऊक आहे की तुम्ही—तुम्ही ते पाहात नाही, समजले, पाहा, मी अगदी निश्चित आहे की तुम्ही ते पाहात नाही. आणि तुम्ही म्हणता, "भाऊ ब्रॅन्हम, तुमच्यासाठी ही गोष्ट सांगणे एक कठीण गोष्ट आहे." मी जाणतो हे असेच आहे.

10 परंतु, पाहा, मला आता तुम्हाला हे सांगू द्या. मी समजतो की हे केवळ आपल्यासाठीच टेप होते, आणि इत्यादी. परंतु मला ते सांगू द्या, समजले. की तुम्ही—तुम्ही नाही...तुम्हाला ते मिळत नाही. समजले, आणि ते तुम्हाला मिळण्यासाठी नाही. म्हणून कशाचाही अर्थ सांगण्याचा प्रयत्न करु नका, समजले. तुमचा अनुवाद त्यामध्ये घालण्याचा प्रयत्न करु नका; तुम्ही फक्त—फ़क्त ह्यापासून आणखी दूर जाता. जर तुम्ही माझ्यावर आता विश्वास करता, जर परमेश्वराने माझ्यावर तुमच्या दृष्टीत अनुग्रह केला असेल, तर तुम्ही केवळ माझा सल्ला माना.

11 आणि तुम्ही, त्या प्रकटीकरण आणि गोष्टींविषयी जाणता. मी—मी येथे तुमच्याबरोबर फार समयापासून आहे, पाहा आणि ते सदैव खरे ठरले आहे. आणि आता ते दूहेरी सिध्द करण्यासाठी, ते तंतोतंत वचनासह जुळत आहे. समजले? म्हणून, तुम्ही जाणता हे **प्रभू परमेश्वर बोलत आहे**. असे आहे. ते अगदी बरोबर आहे. पाहा, ते तुम्हाला सिध्द केले आहे.

12 आता तुमचा भाऊ म्हणून, माझा सल्ला घ्या. तुमचा स्वतःचा अर्थ कुठल्याही गोष्टींत लावू नका. तुम्ही फक्त पुढे चाला. आणि एक चांगले ख्रिस्ती जीवन जगा. कारण, जेव्हा तुम्ही तसे करता, तुम्ही फक्त तुम्हाला सत्य गोष्टींपासून दूर नेता. समजले? तुम्ही, तुम्ही फक्त तुमचा मार्ग ह्या गोष्टींपासून दूर नेता.

13 आणि तुम्हाला सर्वांना जाणीव आहे आणि जाणता की तेथे काहीतरी रहस्यमयरित्या घडत आहे. आणि ते घडत आहे. आणि मला ठाऊक आहे ते काय आहे. आता, मी ते सांगत नाही. ही परमेश्वराची कृपा आहे जी मला समजावते की ते काय आहे. ते अशी गोष्ट आहे जी जबरदस्त आहे. आणि जी आता घडली आहे, आणि जगात असा कोणताही मार्ग नाही की तुम्ही ती पाहू शकता. आणि हा...मला...परंतु, म्हणून माझे सहाय्य कर, ह्या बायबलच्या आधारे जे माझ्या हातात आहे मी समजेन की ते काय आहे. ते तुम्हाला

आधीच सांगण्यात आले आहे. म्हणून कोणताही—कोणताही तुमचा अनुवाद घालण्याचा प्रयत्न करु नका, परंतु, तुमचा भाऊ म्हणून माझ्यावर फक्त विश्वास ठेवा. समजले? आपण एका महान समयात राहात आहोत, आपण एका अशा समयात राहत आहोत जेथे...ठीक आहे, आपण आहोत...

14 आता, तुम्ही केवळ खरे नम्र व्हा, एक ख्रिस्ती व्हा, आणि परमेश्वरासाठी जगण्याचा प्रयत्न करा. आणि तुमच्या सोबतीच्या मनुष्याबरोबर प्रामाणिक राहा, आणि त्यांच्यावर प्रेम करा जे तुमच्यावर प्रेम करीत नाही. तुम्ही कुठलाही प्रयत्न करु नका...तुम्ही पाहा, जर तुम्ही तसे करता, तर तुम्ही ती एक रहस्यमय गोष्ट करता, आणि परमेश्वराची खरी योजना अव्यवस्थित करुन टाकता. समजले?

15 काल दुपारी, माझ्या खोलीत काहीतरी घडले, जे मी—मी ते कधीच विसरु शकत नाही. तुम्ही पाहा. आणि म्हणून तुम्ही...आणि अंदाजे दोन आठवड्याअगोदर, काहीतरी घडले, मी ते कदापि...जोपर्यंत मी ह्या पृथ्वीवर जीवंत आहे, पाहा मी—मी कधीच त्यापासून दूर होऊ शकत नाही. आणि म्हणून...

16 आणि मंडळी हो, ह्या गोष्टी तुम्हास समजवण्यासाठी नाहीत, म्हणून तुम्ही कोणत्याही गोष्टींचा अनुवाद करु नका. समजले? तुम्ही फक्त पुढे चाला आणि जे तुम्हाला सांगण्यात आले आहे त्याचे फक्त स्मरण करा. एक ख्रिस्ती जीवन जगा. तुमच्या मंडळीत जा. तुम्ही जेथे कुठे असाल. खरा प्रकाश बना, आणि ख्रिस्तासाठी जळत राहा, आणि लोकांना सांगा की तुम्ही कसे त्याच्यावर प्रेम करता. आणि तुमची साक्ष, सर्वसमयी, लोकांबरोबर प्रेमाची असू द्या. समजले? कारण, जर तुम्ही तसे करीत नाही, तर तुम्ही स्वतःला दुसऱ्या गोष्टीत वळवता, आणि मग तुम्ही—तुम्ही सत्य पथावरुन बहकून जाल, पाहा, प्रत्येक वेळा तुम्ही ते करण्याचा प्रयत्न केला आहे, तुम्ही तसेच केले आहे. समजले? म्हणून तसे करु नका, करु नका, अनुवाद करण्याचा प्रयत्न करु नका.

17 आणि विशेषतः, आज रात्री, जेव्हा तो शिक्का तुमच्या पुढे प्रगट झाला आहे, पाहा, त्याचा अनुवाद करण्याचा प्रयत्न करु नका. तुम्ही फक्त पुढे जा आणि फक्त नम्र असा, आणि ह्या साध्या संदेशाबरोबर चालत राहा.

18 आता, तुम्ही म्हणता, "भाऊ ब्रॅन्हम, हे असे आहे...आपण, जीवंत देवाची मंडळी असून, आपण करु शकत नाही..."

अच्छा, जसा मी प्रयत्न करीत होतो...येथे पाहा, मी सांगू इच्छितो...

म्हणता, "अच्छा, मी असे करु शकत नाही? मला असे केले पाहीजे..."

नाही. आता, असे करु नका.

19 लक्षात ठेवा, मी हे तुमच्या चांगल्यासाठी सांगत आहे. समजले, मी हे सांगत आहे ह्यासाठी की तुम्हाला समजावे. आता, जर तुम्ही माझा विश्वास करता, मी जे सांगत आहे ते लक्षपूर्वक ऐका. समजले? समजले?

20 आता, येथे, आता येथे एक खांब आहे, आणि, तो, आपण त्याला एक ऐकणारा खांब म्हणूया, समजले. आणि त्यामध्ये, एक रेडियो आहे, पाहा. आणि तेथे सुचना आणि इतर गोष्टी करता येऊ शकतात. जणू काही तुमच्या हातातील एक तलवार पाहा ती वाईटापासून घेऊ शकते किंवा तीला जशीच्या तशी घेता येते...तीला तीचा संदेश मिळतो. समजले.

21 आता, परंतु आता, उदाहरणार्थ, सामान्य मनुष्यासाठी थोडासा पवित्र आत्मा ओतल्यामुळे, कित्येक तत्वप्रणाली आणि कुळे उदयास आले आहेत, जोपर्यंत लोक व्यर्थतेच्या समुहात कार्यरत होताना, बाहेर जातात आणि दुसरी छोटीशी चळवळ आणि

गोष्टी सुरु करतात. तुम्हाला ठाऊक आहे. समजले? तुम्हाला आता ते करण्याची आवश्यकता नाही. समजले? आता, लक्षात ठेवा, तुम्ही जसे आहात. तसे राहा.

22 आणि तुम्ही म्हणता, "अच्छा, प्रभू दाखवतो…" नाही. आता पाहा, सावध असा.

23 येथे पाहा. पाहा, मला तुम्हाला काही गोष्ट दाखवू द्या. तुम्हाला ठाऊक आहे की ह्या वेळेस ह्या खोलीमध्ये दहा हजार आवाज आहेत. [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] अक्षरश: लोकांचे आवाज जे ह्या रेडिओच्या इलेक्ट्रॉनिक तरंगाद्वारे येतात! त्यांना तुम्ही का ऐकत नाही? ते आवाज आहेत. बरोबर आहे? ["आमेन."] ते येथे ह्या समयी तरंगत आहेत. येथे खोलीमध्ये लोकांची रुप आणि शरीरे ह्या समयी हालचाल करीत आहेत. हे बरोबर आहे? ["आमेन."] अच्छा, तुम्ही त्यांना का पाहात नाहीत? समजले? ते येथे आहेत. प्रत्यक्ष आवाज माझ्या आवाजासारखे अच्छा, ते तुम्ही का ऐकत नाही? पाहिले? ते प्रगट होण्यासाठी प्रथम कुठल्यातरी वस्तूवर आदळले पाहीजे. समजले? आता तुम्हाला समजले? ["आमेन."]

24 आता तुम्ही कशाचाही अनुवाद करु नका. जर परमेश्वराची इच्छा आहे की काही गोष्टी तुम्हाला कळाव्या, तर तो त्या तुम्हाकडे पाठवील. समजले? म्हणून तुम्ही खरे. मजबूत व्यक्ती बना. जे काही घडले आहे. ते पकडून ठेवा. आणि आता खरे बना… तुम्ही समजत आहात मला काय म्हणायचे आहे, काय तुम्ही समजत नाही? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] आणि तसेच राहा…ख्रिस्ती होण्यासाठी स्वतःला विचित्र बनवण्याचा प्रयत्न करु नका, कारण तुम्ही स्वतःला परमेश्वरापासून दूर नेता. आणि तुम्ही—तुम्ही—तुम्ही…

25 जर तुम्ही ते समजू शकता, हेच ते तिसरे खेचणे आहे. समजले? तुम्ही—तुम्ही ते त्या दिवशीच, पकडायला पाहीजे होते. समजले? म्हणून आता, लक्षात ठेवा, की ह्याची कुठली नक्कल होणार नाही. जसे ह्या इतर दोघांची झाली होती. समजले? म्हणून, इथपर्यंत ते तुम्हाला—तुम्हाला आता कळले पाहीजे. बस—बस ते लक्षात ठेवा…

26 आता, तुम्ही पाहा, ह्या खोलीमध्ये काहीतरी घडत आहे, आणि येथे काहीतरी आहे. तेथे—तेथे प्रत्यक्ष, ह्या खोलीमध्ये स्वर्गदूत, परमेश्वराची वाणी आहे. समजले? परंतु तुम्ही कसे तुम्ही…करु शकत नाही…जर तुम्ही हे नैसर्गिक आवाज ऐकू शकत नाही, जोपर्यंत कुठली वस्तू ते बाहेर पाठवत नाही, तर तुम्ही हे आत्मिक आवाज कसे ऐकणार?

27 आता तुम्ही कदाचित विश्वास कराल की कोणीतरी हे ठराविक गाणे गात आहे. ते कदाचित तेथे नसतीलही, समजले. परंतु जेव्हा ते प्रत्यक्षरित्या त्या काचेवर आदळते ज्यावर ते आदळले पाहिजे, तेव्हा ते खरा अर्थ सांगते, आणि दाखवते, त्याचा चित्र दाखवून सिध्द करते. मला काय म्हणायचे आहे ते समजत आहात? [मंडळी "आमेन."—सम्पा.]

28 आता, परमेश्वराचा आत्मा, जेव्हा त्या सत्य वचनाद्वारे बोलतो तो स्वतःस सिध्द करतो, हे दाखविण्यासाठी की तो खरा आहे. तुम्हाला समजले का? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] ठीक आहे.

आता आपण पुन्हा एकवार प्रार्थना करुया.

29 स्वर्गीय पित्या, आम्ही ह्या…पुस्तकाचे आवरण उघडण्याच्या बेतात आहोत. आणि जसे भौतिक भाग हे परत देण्याचा प्रयत्न करीत आहे जे तू आम्हासाठी आत्मिकदृष्ट्या उघडले आहे. आणि आता मी प्रार्थना करतो, परमेश्वरा की तू ह्या प्रश्नांचा खरा अर्थ सांगण्यासाठी माझे सहाय्य करशील. होऊ दे की हे अशा प्रकारे सांगण्यात येईल की…हे

लोकांसाठी मदत होतील. ते त्यांना समज देणारे होतील. मी प्रार्थना करतो की तू मला समज देशील, की मी ती तुझ्या लोकांपर्यंत पाठवू शकेन. की त्यांना ती समज मिळेल. की आम्ही एकत्रितरित्या येशू ख्रिस्ताच्या नावाद्वारे परमेश्वराच्या गौरव आणि सन्मानाकरिता जगू. आमेन.

30 आता, मला फक्त ते सांगायचे होते.

31 आणि मला वाटले होते की *येथे* ज्या गोष्टी आहेत त्या ह्या टेपवर नियंत्रित करतात, परंतु पाहा, त्या नियंत्रित करीत नाही. आणि हा डेस्क लाईट आहे. आणि मला वाटले की टेपला नियंत्रित करणारा येथे असत असे. परंतु मला सांगण्यात आले होते की मी ह्या भावांना जे रेकॉर्डींग रुममध्ये आहेत, त्यांना संकेत द्यावे, आणि त्यांना कळेल की केव्हा टेप थांबवावी, आणि केव्हा नाही.

32 पाहा, ह्या टेपची सेवकाई जगभर सर्वठिकाणी आहे. पाहा, सर्व ठिकाणी त्याचा सर्व प्रकारच्या भाषांमध्ये अनुवाद आणि सर्वगोष्टी होतात. म्हणून तेथे काही गोष्टी आहेत ज्या आम्ही येथे सांगितल्या आहे, ज्या आम्ही इतर कुठे सांगू शकत नाही, तुम्हाला समजले, आणि हेच कारण आहे की आम्ही ते बंद करतो.

33 आता, प्रश्नांची उत्तरे देणे हे एक पूर्ण काम आहे. म्हणून, मी—मी आता...ह्या प्रश्नोत्तरास खूपसे प्रश्न बाहेरचे आहे...आता, प्रत्येक...त्यांच्यातील काहीचा या संदेशाशी मूळीच, संबंध नसतो, परंतु मी देणार आहे...किंवा शिक्क्यांशी काहीच नसतो. परंतु मी त्यांचे उत्तर देण्याचा प्रयत्न करणार आहे. आणि जसे लोकांना सांगितले गेले होते, आणि ते प्रश्न मला दिले गेले आहेत. त्यांच्यातील कित्येकांविषयी मला सांगण्यात आले. किंवा, त्यांच्यातील बहुसंख्य आजारी आणि पीडीत लोकांसाठी, प्रार्थनेच्या विनंत्या आहेत. आणि—आणि अशा विविध गोष्टी, असे चालू असते, आणि म्हणून त्याचा संबंध त्या प्रश्नाशी नाही ज्याचे उत्तर दिले जाते. आणि मग ते...माझ्याकडे एक गट्ठा दिला गेला जो—जो निराळ्याच गोष्टींविषयी, शास्त्रलेख आणि गोष्टींविषयी आहे; परंतु कदाचित, जर आपल्याकडे वेळ असला तर, आपण त्यांचे उत्तर देण्याचा आपल्या कुवतीप्रमाणे प्रयत्न करु. आता, आणि जर मी एखादी चूक केली, का, लक्षात ठेवा, ती चूक करण्याचा उद्देश नव्हता.

34 म्हणून सर्वजण चांगला अनुभव करता का? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] आमेन. हे असे नाही का...जसे ख्रिस्त येशूमध्ये स्वर्गीय स्थानांविषयी बोलणे किती अद्भूत स्थान आहे, किती शानदार समय आहे!

35 त्या सर्व समयामध्ये ज्यात मी ह्या आराधनालयात प्रचार मंचाच्या मागे राहून, मी माझ्या सेवकाईच्या कुठल्याही समयात, कधीच, कधीच परमेश्वराच्या क्षेत्रात आणि आध्यात्मिक क्षेत्रात इतके कार्य केले नाही जितके ह्या समयात केले, मी आतापर्यंत केलेल्या माझ्या सेवकाईच्या समयातील, कुठेही झालेल्या सभांपेक्षा, ही सभा अधिक आहे. बहुतेक त्या आरोग्यसभा असत. हे सत्याला प्रगट करणे आहे, त्या एकाच आत्म्याने, त्याच आत्म्याने.

36 आणि मी—मी पूर्णतः एकटा आहे, आणि एका जागी राहात आहे, किंवा खाण्यासाठी खाली जात आहे. आणि मी एकटाच होतो, म्हणून तो खरोखरीच एक महान समय होता.

37 आणि आता, सकाळी किंवा दुसऱ्या दिवशी सकाळी, मी...कदाचित, जर आपल्याला समय मिळाला, मी ह्या सकाळी फक्त आजाऱ्यांसाठी प्रार्थना करीन. जर ह्या प्रश्नांवर अधिक समय लागला नाही तर.

38 म्हणून मला—मला वाटते की थोडा वेळ माझ्यासाठी, समजले. मानवी मनच फक्त एवढा वेळ एकटे राहू शकते. समजले? आणि जेव्हा तुम्ही अशा ठिकाणी पोहोचता जेथे तुम्ही एक तासासाठी परमेश्वराच्या उपस्थितीत संवेदनाशुन्य स्थितीत बसता आणि एक अग्नीस्तंभ तुमच्यासमोर थांबलेला असतो, तेव्हा तुम्ही—तुम्ही अधिक काळ तेथे थांबू शकत नाही, तुम्हाला समजले. मनुष्य त्यापुढे थांबू शकत नाही.

39 आणि म्हणून, आता हे प्रश्न खरोखरीच चांगले आहेत. मी ती बुध्दी आणि त्या गोष्टींची प्रशंसा करतो ज्याचा लोक वापर करतात. आता पहिल्या प्रश्नासाठी आणि मी त्यांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करीन. आणि जर मी त्याचे उत्तर बरोबर देऊ शकलो नाही. तर, तुम्ही—तुम्ही मला क्षमा करा.

40 आणि जर तुमच्याकडे वेगळा अर्थ आहे, आणि तुम्ही विश्वास करता की तुमची कल्पना बरोबर आहे, तर तुम्ही बस त्यावर चालत राहा. ते आघात पोहचवणार नाही. कारण तेथे त्यांच्यात एक किंवा दोनापेक्षा अधिक नसणार ज्यांचा उध्दाराच्या कोणत्याही गोष्टीशी संबंध असेल. ते फक्त...

41 बहुतेक प्रश्न ह्यांच्या. दुसऱ्या बाजूविषयी...किंवा खऱ्या मंडळीच्या स्वर्गरोहणावर विचारले आहेत. म्हणून, पाहा, येथे जे प्रश्न. आहेत ते त्या गोष्टीविषयी आहेत, ज्या घडणार नाहीत. आणि दुसऱ्या भागात घडणार आहेत. कारण, आता आपण पुस्तकाच्या अध्ययनात मंडळी युगाच्या पलिकडे आहोत. आपण एक लाख चव्वेचाळीस हजार ह्यांचा बोलावण्यापुढे आहोत. आता येथे पहिला प्रश्न आहे:

**173. काय मत्तय 25च्या पाच शहाण्या कुमारी वधूच्या—च्या दासी आहेत. किंवा त्या वधू आहेत? समजले? जर ह्या शहाण्या कुमारी वधूच्या दासी आहेत. तर मग वधू कुठे आहे?**

42 आता, पाहा, माझ्या उत्तम ज्ञानानुसार, ह्या पाच कुमारी...तुम्हाला ठाऊक आहे, तेथे दहा कुमारी होत्या ज्या बाहेर गेल्या. पाहा, आणि हे येथे फक्त एक चिन्ह किंवा एक दाखला आहे. जो—जो मी तुम्हास सांगणार आहे. पाहा, ह्या त्यांच्यातील दहा होत्या. अर्थात तेथे दहापेक्षा अधिक होत्या. ही तर केवळ एक संख्या आहे जी सांगितली गेली आहे. परंतु शहाण्या कुमारीच्या दिव्यात तेल होते. मुर्ख कुमारीच्या दिव्यात तेल नव्हते.

43 "म्हणून मत्तयच्या जर दहा कुमारी, जर..." एका व्यक्तीचा तो प्रश्न आहे. "काय त्या दहाही...त्याचा हा अर्थ आहे की असतील...किंवा ह्या पाच, परंतु केवळ पाचच, केवळ पाचच त्या असतील?" नाही, हा त्याचा अर्थ नाही.

44 तुम्ही पाहा, हा तर केवळ कुमारींचा एक दाखला आहे, कुमारींचा त्यांच्या दिव्यामध्ये तेल होते. ते त्या वधूचा भाग आहे. आणि माझ्या समजूतीप्रमाणे...

45 आणि मग तुम्ही पाहता, आता, की त्या अंतिम प्रहराच्या कुमारी होत्या. प्रहरांतून येताना. तेथे सात प्रहर झाले होते. आणि सातव्या प्रहरात, मध्यरात्रीच्या प्रहरी, जसे आपण आता आलो आहोत, पाहा. आता, मध्यरात्रीच्या प्रहरी त्या कुमारी उठल्या आणि त्यांनी त्यांचे दिवे नीट केले, आणि आत गेल्या, परंतु मुर्ख कुमारी...

46 "आता, येथे हा भाग, ह्या पाच," जर त्या प्रश्नाचा अर्थ हा आहे, काय हाच अर्थ आहे की, "तेथे केवळ पाचच होत्या का?" आणि आपल्याकडे येथे खूप प्रश्न आहेत, जसे त्या—त्या सात हजारांविषयी आणि इत्यादी इत्यादी. आता, ते, ते केवळ दाखल्याच्या स्वरुपात आहे, ते केवळ त्यांचा भाग आहे. आणि ते सर्व जे ह्या अंतिम युगात, सातव्या

प्रहरात जागे झालेल्या आहेत, की…"काय त्या केवळ पाचच होत्या. ज्या त्या समयी उठल्या, बदलल्या गेल्या, वधूबरोबर गेल्या, वराबरोबर? आता जर त्या स्वतः…"

47 ह्याचा असा अर्थ नाही की केवळ पाचच जाणार आहेत. कारण, आपण सर्व युगात ह्या आठवड्यात पाहिले की, त्या झोपलेल्या आहेत, समजले.

48 पौलाच्या—च्या दिवसात इफिस मंडळी युगाचा दूत; पौल ह्या युगाचा संदेशवाहक असल्याने, त्याने ह्या मंडळीची स्थापना केली. लक्षात ठेवा, पौलाने इफिस येथे मंडळीची स्थापना केली, तो त्या मंडळीचा संदेशवाहक बनला. आणि ह्या समयात जो आत्मा पृथ्वीवर होता तो सिंहाचा आत्मा होता. आणि हा सिंह यहुदा वंशाचा सिंह आहे, जो ख्रिस्त आहे, आणि ख्रिस्तच वचन आहे. पौल, त्या युगाच्या वचनासह! त्या युगात हजारो झोपी गेले होते? ते बरोबर आहे? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.]

49 नंतर दुसरे युग आले, आणि त्या समयापर्यंत मंडळी अंधकाराच्या युगात स्थापित झाली होती, बैलाचा आत्मा पुढे गेला; कार्य, श्रम, आणि बलिदान, आणि त्यांचे प्राण अर्पिले. हजारो हजार होतात्म्याखाली आणि अशा गोष्टीखाली झोपी गेले. ते वाट पाहत आहेत. पाहा.

50 नंतर, आणि पुढचे युग आले, लुथरचे युग, सुधारणुकीचे युग. बुध्दीमान युग, मनुष्याच्या हुशारीत गेले. जर तुम्ही लक्ष दिले, तर कळेल, की मनुष्य त्यासह पुढे गेले आणि जेव्हा त्याने तसे केले तर त्याने त्याची स्वतःची हुशारी त्यात घातली. पाहा, हाच तो आहे ज्याने दुसऱ्या भागात विवाह केला. समजले? जर तो केवळ परमेश्वराच्या ज्ञानासह राहिला असता आणि केवळ सुधारणा करीत राहीला असता आणि बाहेर काढीत राहीला असता…परंतु त्याने काय केले? त्या मनुष्यानंतर ज्याच्याकडे तो संदेश होता, लुथर; लुथरच्या मृत्युनंतर, त्यांनी लुथरन संस्था बनवली.

51 वेस्लीच्या मृत्युनंतर त्यांनी मेथडीस्ट संस्था बनवली. पाहा? ते अशाप्रकारे पुढे चालत राहीले. हे तर—तर बस…ह्याने तेच केले. आता माझी इच्छा आहे की तुम्ही ह्याकडे लक्ष द्यावे. आता काहीजण कदाचित पेंटेकॉस्टलबद्दल विचारतील, जे तिसरे युग होते.

52 तुम्ही पाहा की, त्या समयातील प्रत्येकाने केवळ पवित्र आत्म्यामध्ये डुबकी घेतली. न्यायीकरण हे पवित्र आत्म्याचे एक कार्य आहे; पवित्रीकरण हे पवित्र आत्म्याचे एक कार्य आहे; परंतु बाप्तिस्मा हा पवित्र आत्मा *आहे*. हेच कारण आहे की पवित्र आत्म्यासाठी भविष्यसुचक संदेष्टा खाली आला. त्या युगासाठी कोणी संदेशवाहक नाही. कारण पवित्र आत्मा स्वतः पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्माच्या रुपात, त्याच्या पूर्णतेमध्ये, आला.

53 परंतु ह्या युगाच्या शेवटी, आपण पाहतो की जसे दूसऱ्या युगाच्या समाप्तीवेळी एक संदेशवाहक पाठवला. आणि ह्या सर्व शंका आणि गोष्टींना त्यांच्या स्थानी व्यवस्थित ठेवल्या जातील, मग खऱ्या मंडळीसाठी रॅपचर येते.

54 परंतु जसे ह्या बऱ्यचशा गोष्टी ठरविल्या गेल्या आहेत की, "सूर्य अंधकारमय होईल, चंद्र…" त्यांनी ते ख्रिस्ती युगात घातले आहे, आणि ते ह्या तीन प्रश्नांना पहाण्यास अयशस्वी ठरतात जे आमच्या प्रभूला विचारले होते, जेव्हा त्याने त्यांची उत्तरे दिली होती, समजले.

55 आता, मला वाटते की, काल रात्री तेथे बिलकुल प्रश्न नव्हते. आपण त्या प्रत्येक प्रश्नांना घेतले आणि त्याचा शिक्क्या अंतर्गत अभ्यास केला आणि हे शिक्के एकंदरीत परिपूर्ण पुस्तक आहे.

डॉक्टर, काय तुम्ही ह्यावर विश्वास करता? [एक भाऊ म्हणतो, “होय.”—सम्पा.]

56 पाहा, ह्या संपूर्ण गोष्ट एकत्रितरित्या बांधलेल्या आहेत. आणि आपण ते घेतले जे येशूने येथे सांगितले. त्यांनी तीन प्रश्न विचारले पाहा, “ह्या गोष्टी केव्हा होतील? आपल्या येण्याचे चिन्ह काय? आणि युगाच्या समाप्तीचे चिन्ह काय?” आणि तो थेट खाली आला...आणि आपण त्यांतील प्रत्येकाचा त्याखाली अभ्यास केला, परंतु एक. तो काय होता? सातवा शिक्का का? पाहा, तो प्रगट केला नाही. असेच आहे. त्यांतील प्रत्येक प्रगट झाली आहे. मी त्यांना एक दुसऱ्याच्या बरोबर घेतले होते, मी त्यांना बरोबर मागून व पुढून घेतले होते.

57 आणि काल रात्री जेव्हा मी लिहीले, आणि मी तेथे आत गेलो आणि तेथे पोहोचलो... मी माझ्या जुन्या टिप्पण्या आणण्यासाठी परत गेलो. ज्या मी तेथे मागे सोडल्या होत्या. मी पाहिले की तेथे मी एक दुसऱ्या कुणाच्या जागेवर ठेवले होते, आणि मी अशाप्रकारे पाहीले. मी त्यांना मागून पुढे करुन पाहीले. हेच मी केले. माझा अंदाज आहे की तुम्ही हे समजला असाल. तुम्हाला, तुम्हाला ते समजले काय? समजले?

58 मी ते येथे लिहीले जे मी *ह्या* दुसऱ्या बाजूस लिहीणार होतो, आणि ते *येथे* वर लिहीले. त्या दोघांना ठेवले, 9,11 किंवा 9, 6 किंवा काय...किंवा 6 आणि 11, आणि—आणि—आणि 9 आणि 11, जे तसे नव्हते. ते उलट होते, पुढचे वचन त्याच्याखाली. समजले? आणि पाहा, त्याचे उत्तर रोगराई आणि युध्द ह्यात होते. हेच आहे ते जे ते होते.

59 म्हणून मी इतका आनंदी होतो! मी बस अशाप्रकारे चालत होतो...आणि मी प्रकटीकरणापासून मिळणाऱ्या उत्तेजनाचा आस्वाद घेत होतो. म्हणून, मी—मी हे येथे वर ठेवले. मी तेथे पेन्सिल किंवा पेन घेऊन बसलो होतो; मी 11दोन्ही बाजूला ठेवले होते. जेव्हा असे करायला नको होते. मला वाटले की दुसऱ्या बाजूला 11 ऐवजी 9 होते.

60 परंतु आता तुम्ही पाहीले का, की ते कसे पूर्णतः समांतर आहे? आता, ते विसरु नका. ते सहाव्या शिक्क्यापर्यंत एक दुसऱ्याशी समांतर आहेत, आणि थांबले, पाहा. आणि पाहा—पाहा शिक्क्याचे उघडणे पाहा, ते खाली सहाव्या शिक्क्यापर्यंत आले. आणि थांबले. “अर्ध्या तासाच्या अवधीबद्दल,” हेच सांगितले आहे की, “स्वर्गात निवांत होते.”

61 आता—आता, ह्यात पाहा मला...मला घाई करावी लागेल आणि ह्यांची उत्तरे द्यावी लागेल. कारण, पाहा, त्यांच्यातील प्रत्येक एक प्रवचन आहे, आणि चार आठवड्यांचे लांब कालावधीपर्यंत त्या प्रत्येकाचा अभ्यास केला गेला, आणि तुम्ही कुठल्यातरी वेगळ्या गोष्टीकडे वळला आहात. परंतु, माझा—माझा तसे करण्याचा उद्देश नाही, कारण मी जितके शक्य होईल तितके, प्रत्येक प्रश्न घेऊ इच्छीतो.

62 पाहा, त्या कुमारी, त्या बनल्या होत्या...त्या केवळ त्या युगातील असणाऱ्यांचा भाग आहे. प्रत्येक युगात कुमारी होत्या. समजले एक—एक शिक्का...

दूत मंडळीकडे आला आहे, “इफिस येथील मंडळीच्या दूताला लिही.” पाहिले?

63 ह्यानंतर इफिसच्या मंडळीला लिहील्यानंतर त्याची तुलना केली, मग शिक्का उघडला आहे. ठीक अशाप्रकारे आम्ही हे पूर्णतः तुमच्याकडे आणण्याचा प्रयत्न करतो. (काय तुम्ही समजता मला काय म्हणायचे आहे?), जर प्रभूची इच्छा असली तर.

64 प्रथम त्यांच्याकडे काय होते? मंडळीची युगं. ते बरोबर आहे? नंतरची गोष्ट, मंडळींच्या युगांसाठी संदेश. आता प्रत्येकांना ही गोष्ट स्पष्ट झाली? समजले?

65 प्रथम आपण मंडळीची युगे आणि इतिहास घेतला आणि त्यांना निसीया कॉन्सिल आणि प्री–निसीया कॉन्सील, आणि सर्वकाही आपण इतिहासात शोधू शकत होतो. आणि

आपण पाहीले की वचनाचा खरा अनुवाद तंतोतंत इतिहासात होता. आणि हे आपण क्रमाने ह्या लवदिकीया काळात, ह्या दिवसापर्यंत घेऊन आले आणि तुम्हाला—तुम्हाला इतिहास ठाऊक असण्याची आवश्यकता नाही, हा स्वयं आता एक इतिहास बनत आहे, पाहा. असेच आहे. आणि मग, दाखवले की ह्या युगात काय होईल.

66 आता आम्ही पुन्हा शिक्क्यांकडे आलो, आणि तो शिक्का उघडला. परमेश्वर तो शिक्का आपल्यासाठी उघडतो. तो काय आहे? प्रथम, तेथे संदेशवाहक आहे, मंडळीचे युग, नंतर सात शिक्के.

67 आता, आपण नीतीभ्रष्टता पाहतो. जीने सातव्या मंडळी युगात प्रहार केला आहे. परंतु सातवा शिक्का काहीच प्रगट करत नाही की त्याच्या बरोबर काय घडणार आहे. समजले? कारण ह्या मंडळी युगाच्या शेवटी एक भविष्यसुचक देणगी येणार होती. ह्या सर्व गोष्टी प्रगट करण्यासाठी समजले? तुम्ही हे समजत आहात? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] ठीक आहे. आता लक्ष द्या की ह्या, शिक्क्यांतील प्रत्येक शिक्का…

68 ह्यानंतर मी येथे आलो, आणि आपण त्या तीन प्रश्नांचा अभ्यास केला जे येशू ख्रिस्ताने विचारले. "ह्या गोष्टी केव्हा होतील, 'येथे चिऱ्यावर एकही चिरा राहणार नाही'? केव्हा हे जगाचे धार्मिक केंद्र ताब्यात घेतले जाईल, आणि दुसरे स्थापित केले जाईल? पाहा, ते केव्हा होईल?" ख्रिस्तविरोधी स्वार! समजले? आणि त्याचा सामना करण्यासाठी कोण बाहेर जातो? वचन, विकृत वचनाविरुध्द परमेश्वराचे वचन.

69 त्यानंतर हे राजकारण आणि इतर सर्व गोष्टीत स्थिर झाले, आणि मग श्रम करणारा बैल त्याचा सामना करण्यास जातो. समजले? तो दुसरा शिक्का आहे. आणि पाहा येशूने मत्तय 24 मध्ये, तसे म्हटले, मग आपण खाली सुधारकांच्या बुध्दीकडे आलो, मनुष्य श्वापद त्याचा सामना करण्यासाठी गेला. हेच सर्व घडले होते. मग आपण खाली पुढच्या, चौथ्या शिक्क्यांकडे आलो, जेव्हा ख्रिस्तविरोधी संस्थेमध्ये परिवर्तित झाला, त्याचे नाव होते, "मृत्यू."

70 आता, पाहा येशूने काय म्हटले, "तो तीला अग्नीत फेकेल, आणि तीच्या लेकरांना मारील,", तो मृत्यू आहे जो घोड्यावर स्वार आहे. तो प्रोटेस्टंट आणि कॅथलिक दोन्ही आहे, ज्यातील प्रत्येकावर मृत्यूची खूण आहे. पाहा, "तिचा आणि तिच्या संततीचा नाश होईल." म्हणून जर तुम्ही तुमच्या संप्रदायावर अवलंबून आहात, तर तुम्ही त्यापासून आताच दूर व्हा.

71 आणि मग जेव्हा तो सातव्या शिक्क्याकडे आला, तेव्हा येशू तेथेच थांबला. त्याने सहावा शिक्का हे सांगून उघडला की, "चंद्र रक्तासारखा होईल, आणि अंधकार आणि सर्वगोष्टी." ह्या गोष्टी घडतील. आपण येथे आलो आणि सहावा शिक्का उघडला. सहावा शिक्का उघडल्यानंतर आपण पुन्हा मागे गेलो आणि तीच गोष्ट दाखवली.

72 आम्ही पवित्र शास्त्रांतून तीन भिन्न स्थानांतून वचने घेऊन त्यांना प्रकटीकरणाद्वारे एक दुसऱ्याशी जोडले. समजले? लक्ष द्या. ते स्थान ज्याविषयी येशूने असे सांगितले होते; ते स्थान जेव्हा त्याने पुस्तक उघडले जे जगाच्या स्थापनेपासून गुप्त होते. आणि मग येथे ह्या दिवसाचे प्रकटीकरण त्यास व्यवस्थितरित्या त्यामध्ये रचत आहे, तिघांस एकत्रितपणे बांधत आहे. आणि तीन एक साक्ष आहे. म्हणून, ते सत्य आहे. ते पूर्णतः सत्य आहे.

73 आता, ह्या कुमारी ज्या येथे येतात, त्या आहेत ज्या झोपी गेल्या आहेत, आणि तेव्हा त्या समुहाचे एकत्रितरित्या पूर्ण शरीर बनते. ते बनवले जाते…पाहा, शहाणी कुमारी बनवण्यासाठी. आणि मुर्ख कुमारी त्या आहेत. ज्यांनी पूर्वी त्याच वेळेस सुरुवात केली,

जेव्हा शहाण्या कुमारींनी सुरुवात केली, ख्रिस्तविरोधी, आणि कुमारी त्या आहेत ज्या तेल विकत घेण्याचा प्रयत्न करीत आहे.

74 आता, फक्त तुम्ही येथे पाहा आणि पाहा की हे किती परिपूर्ण आहे, तुम्ही कुठेही हे पाहू शकता. जर मी येथे उभा राहून त्या गोष्टींविषयी सांगतो ज्या मला त्या खोलीत प्रगट झाल्या होत्या, मी तुम्हास सांगतो की तुमचे डोके चकरावून जाईल. परंतु तुम्ही ते कसे करणार आहात, जेव्हा तुम्हाला येथे संपूर्ण गोष्टी प्राप्त झाल्या आहेत?

75 आणि मग जेव्हा तुम्ही लोकांपासून दूर जाता तर, मग कसेही करुन दुसऱ्या गोष्टी अशा होतात की रहस्ये प्रगट होण्यास सुरुवात होते. मग तुम्ही अशा गोष्टी पाहता ज्या तुम्ही लोकांना सांगण्याची हिंमत करु शकत नाही. कारण तुम्ही पाहता, जर तुम्ही तसे करता, तर ते छोटे–छोटे वाद सुरु करतात.

76 आणि आपण पाहुया की आरोग्याच्या ह्या छोट्याशा दानाने काय केले आहे. त्याने कसा मंडळीत गोंधळ केला आहे? प्रत्येकाला संवेदना आहे, प्रत्येकाकडे हे होते; आणि ह्या समयी माझ्या हृदयात (परमेश्वराला ठाऊक आहे हे सत्य आहे) मला ठाऊक होते की हे ठीक नाही, कारण त्याने मला तसे सांगितले आहे. समजले? परंतु ते एक लोकांच्या फसवणूकीसाठी केलेली, खोटी नक्कल आहे. आता, ते सत्य आहे. आता, परंतु तुम्ही पाहा, तुम्ही त्या गोष्टी सांगू शकत नाही. हेच योग्य आहे तुम्ही त्या गोष्टी तशाच राहू द्या.

77 आणि तुम्हाला तिसरे खेचणे लक्षात आहे? त्याने म्हटले, “हे कोणासही सांगू नका.” मी काय सांगितले की ते काय होते? किती जणांना ते लक्षात आहे? खात्रीने, तुम्हाला लक्षात आहे. काय तुम्हाला लक्षात आहे, की मी त्या दृष्टांतात, तेथे उभा राहून, एक बूटाची नाडी एका लहान बुटाच्या छोट्याशा भोकात घालण्याचा प्रयत्न करीत होतो? त्याने म्हटले, “तू पेंटेकॉस्टल बालकांना ह्या अद्भूत गोष्टी शिकवू शकत नाही.”

78 मी म्हटले, “हे तीसरे खेचणे असेल, आणि तो ज्ञात करुन देता येणार नाही; परमेश्वराच्या कृपेने, माझे सहाय्य कर.”

आता—आता, आपण—आपण आता आपण अगदी अंतिम समयात आहोत. आता खूप वेळ लागणार नाही की दयासन न्यायसन बनले जाईल. जेव्हा तुम्ही ह्या गोष्टी आत येताना, आणि ह्या लोकांना आत येताना पाहात आहात, जर तुम्ही आत नसाल, तर योग्य होईल की तुम्ही सुध्दा आत या. समजले?

79 आता, “स्वर्गीय स्थानात एकत्र येणे,” पाहा, त्याचा असाही अर्थ होतो की आनंद साजरा करण्यापेक्षा अधिक आहे. “स्वर्गीय स्थानात,” जर तुम्ही ख्रिस्तामध्ये खरोखरीच एकत्र झाला असाल, तर ही एक भयप्रद गोष्ट आहे.

80 प्रभूच्या त्या स्वर्गदूताच्या...जवळ उभे राहणे, तुम्ही विचार करा तुम्ही आरडाओरडा आणि किंचाळत आहात. ते, ते तसे नाही. ते तुम्हाला इतके भयभीत करते की तुम्ही जवळजवळ मृत होता. समजले? म्हणून, तुम्हाला समजले, तेथे—तेथे एक फरक आहे नुसते आनंद साजरा करणे आणि नाचणे उड्या मारणे ह्यामध्ये, ते सर्व ठीक आहे, आणि आपण खऱ्या गोष्टीकडे येत आहोत. समजले? समजले? तेथे जेथे भय आहे. ती एक भयप्रद गोष्ट आहे. असे नाही की तुम्ही भिता कारण तुमचा नाश होईल. परंतु प्रत्यक्षात स्वर्गीय दुतांसमोर आणि स्वतः पवित्र आत्मा तेथे तुमच्यासमोर उभा असतो.

81 आता, ते त्या वधूचा भाग असतील. पाहा तेच आहेत जे हे बनवण्यासाठी जातील, ते सर्व जे झोपी गेलेले आहेत आणि काय आपण ते पूर्णता पाहू शकत नाही. पाहा...

[टेप रेकॉर्डींग व्यवस्था बिघडली. टेपवर रिकामी जागा—सम्पा.] ...आता प्रार्थना करतो की तू ह्या लोकांना ह्या रुमालाद्वारे आरोग्य प्रदान कर, जेव्हा हे त्यांच्यावर ठेवले जातात. येशूच्या नावाने मागतो. आमेन.

आता, हे बरोबर आहे? [भाऊ म्हणतो, "आमेन."—सम्पा.] धन्यवाद. कोणीतरी कशावर पाय ठेवला का? [एक भाऊ म्हणतो, "एकाच लाईनवर पुष्कळ रेकॉर्ड्स आहेत."] पुष्कळ रेकॉर्ड्सनी खूप दबाव त्यावर दिला. समजले? ठीक आहे. आता, आता पुढच्या प्रश्नाकडे लक्ष द्या.

## 174. काय सुवार्तिकांनी क्षेत्रात कार्य सुरु ठेवले पाहीजे?

82 "ह्या समयात," निश्चितच, त्यांच्या सर्व साधनांसह. निश्चितच, त्यांच्या सर्व साधनांसह त्यांनी कार्यरत राहीले पाहीजे. कोणताही बदल करु नये. जर येशू सकाळी येत आहे, तर आज असा प्रचार करा जणू काही आजपासून अजून दहा वर्षे लागणार आहेत, परंतु असे जीवन जगायला पाहीजे जणू काही ते ह्या घडीला होणार आहे.

83 आता विकल्प करणारे होऊ नका—नका. पाहा, त्याविषयी मी तुम्हाला सावध करण्याचा प्रयत्न करीत आहे. तुम्ही विचित्र, वेगळे बनू नका. परंतु जर तुम्ही काही चुकीचे किंवा वाईट करीत आहात, तर पश्चाताप करा, समजले, परमेश्वराकडे परत या. तुमच्या सुवार्तिकाची सेवा चालू ठेवा जशी ती तुम्ही सदैव करता.

84 जर तुम्ही घर बांधत आहात, तर तुम्ही ते करीत राहा. जर येशू उद्या येईल, तुम्ही तुमच्या कार्यावर विश्वासू आढळला पाहीजे. जर तुम्ही प्रार्थनागृह बांधत आहात, तर तुम्ही ते बांधत राहा. मी माझे धन माझ्या खिशात साठवण्याऐवजी मी ते अशा कुठल्या ना कुठल्या कार्यासाठी वापरत राहावे. समजले?

85 म्हणून तुम्ही जे काही आहात, आपले कार्य—कार्य करीत राहा. सर्वांना आता हे समजले? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] तुम्ही तुमचे कार्य करीत राहा. आणि जसे तुम्ही आहात, आपले कार्य करीत राहा. आता, तुम्ही थांबू नका. काहीच असे करु नका...तुम्ही ठीक तसेच पुढे जात राहा जसे तुम्ही आहात. प्रभूची सेवा करीत राहा.

86 आता, उदाहरणार्थ, जर तुम्ही होता—जर तुम्ही एका व्यक्तीसाठी कार्य करीत होता, आणि तुम्हाला समजले की समय समाप्त होण्यासाठी पंधरा मिनीटे उरली आहेत. "अच्छा," तुम्ही म्हणता, "ओह, फक्त पंधरा मिनीटे अधिक, म्हणून मी कदाचित नुसता वर जातो आणि खाली बसतो." तुम्हाला त्या पंधरा मिनीटांसाठी न्यायालयातील आरोपीचा पिंजरा मिळेल.

87 जर तुम्ही गहू पेरीत असाल, तुमचे गहू पेरा, तुम्ही बटाटे खोदून काढीत असाल; ते बाहेर काढीत राहा. तुम्ही म्हणता, "अच्छा, कोणीही ते खाणार नाहीत"? त्याने काहीही फरक पडत नाही. कसेही करुन खोदून बाहेर काढा. समजले? होय. तुम्ही जसे आहात तसे करीत राहा.

88 मला त्यादिवशी कोणाकडून एक पत्र आले. कोणीतरी त्यांना म्हणाला, "समय जवळ आहे. तुझे शेत विक. आता तुला धान्याची गरज लागणार नाही की त्या शेतावर तू जगावे." म्हणाला, "हा हजार वर्षांचा काळ सुरु होणार आहे, आणि तुला त्याची गरज भासणार नाही. परंतु तुम्ही फक्त पुढे जा...आणि जेव्हा महासंकटाचा काळ चालू असेल, तुमची लेकरे वाचले नसतील, म्हणून तुम्ही ते तसेच असू द्या. तुमच्या लेकरांना ते शेत मिळू दे, ज्यांतून ते खाऊ शकतील, परंतु जर तुम्ही तुमचे संपूर्ण शेत विकले," आणि—आणि, किंवा त्यासारखे काही. आणि होय, त्याच्याकडे ते होते.

89 मी म्हणालो, “अरे बापरे!” जर मला कळले तो उद्या येणार आहे आणि मी एक शेतकरी असतो, मी आज पीक लावत असतो. निश्चितच. जर त्याने मला एक शेतकरी बनवले. तर मी माझ्या कर्तव्यावर बनून राहीलो असतो. ते खरे आहे. जर त्याने मला मेकॅनिक बनवले, म्हणाला कोण...

90 कोणी एक दिवशी म्हणाला, त्याने म्हटले, “एक व्यक्ती आत आला आणि म्हणाला, म्हणतो, ‘भाऊ, तुला ठाऊक आहे काय?’ त्याने म्हटले, ‘मी तुला किल्ल्यांचा दुसरा संच देणार आहे. मी एक नविन मोटार विकत घेतली.’ तो म्हणाला, ‘मी तुला त्या चाव्यांचा दुसरा संच देणार आहे, कारण तुला माहीत आहे, कदाचित रॅपचर येईल,’ आणि म्हणाला, ‘मला त्याची आणखी आवश्यकता भासणार नाही.’” पाळक ते गमावणार आहे, तुम्हाला समजले. ओह! ते तयार करीत आहे, नाही का? ठीक आहे. परंतु ते—ते तसे आहे, पाहा, आपण तसे असू नये.

91 पाहा, आपण एक—एक समजूतदार विश्वसनीय ख्रिस्ती असलो पाहीजे की मला येथे शेवटच्या मिनीटापर्यंत कार्य करण्यासाठी ठेवले आहे. माझ्याकडे करण्यासाठी एक कार्य आहे, आणि मी माझ्या कर्मस्थळावर विश्वासू आढळेन जर तो ह्या सकाळी आला, माझी इच्छा आहे की मी ठीक ह्या मंचावर येथे उभा असलो पाहीजे.

92 तुम्ही म्हणता, “भाऊ ब्रॅन्हम, जर त्याला ह्या सकाळी यायचे असेल, तुला *तेथे* बाहेर नसले पाहीजे का?” नाही, महाशय!

93 हे माझे कर्तव्य स्थान आहे. मी ठीक येथे उभा राहून, प्रचार करीत असेल, जेव्हा तो येईल, मी ठीक त्याच गोष्टी सांगत असेल. मग, जेव्हा तो येईल, मी त्याच्यासह बाहेर जाईन.

94 जर मी फावड्याने किंवा कुदळीने बटाटी खोदत असेन, तर मी जितक्या मजबूतीने बटाटे खोदत असेन, तसेच खोदत असेन. जेव्हा तो येईल, मी कुदळ खाली टाकेन आणि त्याच्याबरोबर जाईन.

काय तुम्हाला लक्षात आहे योबेल वर्षात काय होत असे? जर ते खोदकाम करणारे असतील—ते खोदकाम करीत राहात. त्यांना ठाऊक होते की योबेल वर्ष कदाचित दहा मिनिटांनंतर असेल, आणि योबेल वर्षात तुतारीचा नाद होत असे, जर ते गवताचा ढीग लावत होते, किंवा काही करत असत तर ते करीत राहात. परंतु जेव्हा तुतारी वाजत असे, तेव्हा ते आपला विळा टाकून देत आणि जात. पाहा, ते तसेच आहे, गवताचा ढीग करीत राहा. जोपर्यंत तुतारी वाजत नाही. ठीक आहे.

[कशामधून एक आवाज ऐकायला येतो.—सम्पा.] प्रश्न, “उघडण्याद्वारे...” काय ते...काही घडते? हू? ह्याने—ह्याने येथे आवाज केला. एक प्रश्न:

### 175. पाचवा—पाचवा शिक्का उघडल्यानुसार, मोशे आणि एलीया ह्यांना—ह्यांना मरावे लागते. हनोकाविषयी काय?

95 मला ठाऊक नाही. समजले? मला—मला...जर मला ठाऊक नाही, मी तुम्हाला असेच सांगणार की मला ठाऊक नाही. समजले? लोकहो, मला—मला सर्व प्रश्नांची उत्तरे ठाऊक नाही. मला—मला ठाऊक नाही. आणि जर मला ठाऊक नाही, मी तुम्हाला सांगणार की मला ठाऊक नाही. जर मला ठाऊक नाही...मी तुम्हाला सांगु शकत नाही जीतपर्यंत मलाच ठाऊक नाही, पाहा. परंतु, मला—मला ठाऊक नाही.

96 मला स्वत:ला ह्याविषयी नेहमी आश्चर्य वाटते. तेथे हनोक होता...मी मोशेला येताना पाहीले, आणि एलीयाला परत येताना पाहीले, आणि पाहा, ते मारले गेले, परंतु हनोक

समया अगोदर रुपांतरात घेतला गेला. मी स्वतःचे सदैव विचार आणि आश्चर्य करतो, “अच्छा, त्याविषयी काय आहे?”

97 परंतु, मग, येथे केवळ एक सांत्वन आहे जे मी सांगू शकतो, ते हे. आता लक्ष द्या, मोशेने परमेश्वराची सेवा फक्त चाळीस वर्षे केली. समजले? तो—तो एकशे वीस वर्षाचा होता. परंतु वीस वर्षे...मला म्हणायचे आहे. पहिली चाळीस वर्ष, तो त्याचे शिक्षण घेत होता. ते बरोबर आहे? दुसरी चाळीस वर्ष, परमेश्वर त्याच्यामधून बाहेर काढीत होता. आणि तिसऱ्या चाळीस वर्षात, त्याने परमेश्वराची सेवा केली. समजले? ठीक आहे. परंतु हनोक परमेश्वरासमोर पाचशे वर्ष चालला, आणि तो निष्कलंक होता. समजले? समजले? म्हणून, मोशे पुन्हा काही वर्षे सेवा करण्यासाठी परत येतो; तो आणि एलीया.

98 आता, पाहा, मी असे म्हणत नाही की ते बरोबर आहे. मी ते फक्त तुम्हाला एक विचाराच्या हेतूने दिले. परंतु हे सांगणे की हनोकाचा काय भाग आहे, ते मला ठाऊक नाही. मी खरोखरीच तुम्हाला सांगू शकत नाही की काय—तेथे काय घडले, किंवा परमेश्वर काय करील.

**176. ते नाव काय असेल...जे प्रकटीकरण 3:12 च्या लोकांवर असेल.**

99 मला—मला ठाऊक नाही. होय. त्याने म्हटले, “त्यांना एक नवे नाव द्या.” मला—मला—मला ठाऊक नाही ते काय आहे, समजले. ते कदाचित तेव्हा समजेल जेव्हा आपण तेथे जाऊ, परंतु मला—मला आता ठाऊक नाही की ते काय आहे, समजले पाहा, तो ते करणार आहे. समजले? त्याने त्यांना एक नवे नाव दिले जे—जे फक्त त्यांना, स्वतःलाच ठाऊक आहे. समजले?

**177. आता, भाऊ ब्रॅन्हम, तेथे असे कोणते वचन आहे जे घटस्फोटानंतर विवाहाची परवानगी देते? हे खूप महत्त्वाचे आहे.**

100 ते म्हणते, “महत्त्वाचे.” अच्छा, हे कारण आहे...हे त्याच्याशी संबंधीत नाही. जोपर्यंत मी समजू शकतो, माझ्या भावा, किंवा बहिणी, ते कोणीही असो, तेथे असे वचन नाही, जोपर्यंत तुमचा जोडीदार मृत नाही. कारण, बायबल सांगते, “जोपर्यंत ते जीवंत आहेत आपण त्यांच्याशी बांधलेलो आहोत.” समजले?

101 म्हणून जो—जोपर्यंत “कुठले वचन?” हेच येथे विचारले होते, “तेथे वचन आहे का?” समजले? “तेथे कुठले वचन आहे का?” जोपर्यंत मी शोधू शकतो, तेथे असे कोणतेही वचन नाही जे घटस्फोटानंतर विवाहाची अनुमती देते.

कारण, पौल विवाहीत जोडप्यांना असे म्हणतो, “पती मेल्यावर तिची इच्छा असेल त्याच्याबरोबर, पण प्रभूमध्ये लग्न करावयाला ती मोकळी आहे.” परंतु तो पर्यंत, परंतु, लक्ष द्या. तुम्ही शपथ घेता, “जोपर्यंत मृत्यु आम्हाला वेगळे करत नाही.” असेच आहे. तुम्ही पाहा, तुम्ही ह्यावर शपथ घेता.

102 म्हणून, मला वाटत नाही की तेथे वचन आहे आता, जर तेथे आहे...जर तुम्हाला काही मिळाले आणि ते पूर्णतः बरोबर आहे, तर ठीक आहे. परंतु जोपर्यंत मला ठाऊक आहे, मला—मला असे कोणते वचन मिळाले नाही.

**178. प्रकटीकरण 6:6 मध्ये “तेल व द्राक्षारस ह्यांची खराबी तू करु नको.” चा अर्थ काय आहे?**

103 तो पवित्र आत्मा आहे. समजले? आपण ते नुकताच पाहीले. तुम्हाला माहीत आहे. कदाचित कोणी व्यक्ती संदेशासाठी थोडा उशीरा आला, ते...ठीक आहे, तुम्ही दुसऱ्या टेपसाठी पाहा.

**"तू तेल आणि द्राक्षारसाची हानी करु नको." तेल आणि द्राक्षारसाचा अर्थ काय आहे?**

104 जसे आपण तेलाला चिन्ह म्हणून घेतले, तेल म्हणजे पवित्र आत्मा. समजले? द्राक्षारस...आणि तेल बायबलमध्ये आराधनेसाठी एक दुसऱ्याशी जुळलेले आहे. समजले? आणि द्राक्षारस, जसे मी सांगितले ह्यापासून मला कल्पना मिळाली की, "उत्तेजना." द्राक्षारस उत्तेजीत करतो. आणि द्राक्षारस, हा—हा स्वाभाविक दृष्टीकोनात जो एक दर्शक आहे प्रकटीकरण, उत्तेजनामधून येते.

105 आता जरा विचार करा. मंडळीला कोण उत्तेजीत करते? प्रकटीकरण. समजले? म्हणून, द्राक्षारस, नवा द्राक्षारस...आता लक्ष द्या. तेल आणि द्राक्षारस अर्पणामध्ये एकत्रित जातात, ह्या दोघांचा उपयोग मंडळीत आराधनेसाठी एकत्र केला जातो. आता लक्ष द्या, ते एकत्र जमतात, एकत्र जोडलेले असतात.

106 जर तुमच्याकडे अनुक्रमणिका पुस्तिका आहे, तुम्ही पाहा की जेव्हा आराधनेत द्राक्षारस आणि तेल एकत्र येतात, तर सर्व लयबद्ध होते. जर तुमच्याकडे क्रूडनचे आहे, तर तुम्ही पाहा की ते तेच सांगते.

107 आता ह्यावर लक्ष द्या. परंतु आता, तुम्ही पाहा, तेल हे सदैव पवित्र आत्मा आहे. आपल्याला ते यहेज्केलच्या पुस्तकात मिळते. आणि आपल्याला ते सर्व जुन्या करारात मिळते. आपल्याला ते सर्व नविन करारात मिळते.

108 आपण आजाऱ्यांना तेलाचा अभिषेक का करतो? आपण आजारी व्यक्तिला तेलाचा अभिषेक करतो. कारण ते त्यांच्यावर पवित्र आत्मा ओतला जाणे ह्याचे निदर्शक आहे. समजले? आणि शहाण्या कुमारींकडेही तेल होते; मूर्ख कुमारीकडे तेल नव्हते अर्थात पवित्र आत्मा नव्हता. आता, ते तेल आहे. आणि मग द्राक्षारस, हे—हे आहे...तेल परमेश्वराला दर्शविते. परमेश्वर आत्मा आहे. समजले?

109 परमेश्वर वचन आहे. "प्रारंभी शब्द होता. शब्द देवासह होता. शब्द देह झाला, आणि तोच परमेश्वर होता." आता, जर वचन...आता येथे स्वाभाविक रुपात विराजमान आहे, द्राक्षारस पाण्यासारखा असतो, ते, किंवा प्रकटीकरण वचनाचा अर्थ प्रकट करते, जे विश्वासणाऱ्याला उत्तेजित करते, तुम्हाला समजले. ते असे म्हणतात, "मी तसे अगोदर कधीच पाहीले नाही! अरे बापरे! परमेश्वराची महिमा होवो!" ते काय आहे? पाहा, प्रकटीकरणाचे उत्तेजन.

110 मला ठाऊक नाही की ज्याने हा प्रश्न विचारला आहे तो त्या दिवशी तेथे होता किंवा नाही. समजले. आता, प्रश्न होता, "तेल आणि द्राक्षारस काय आहे..." हा होता. "तू त्याची हानी करु नको." तो काळा घोडेस्वार होता. आणि तो त्या अंधकार युगाच्या समयात होता मंडळीचे—चे, तिसरे युग लक्ष द्या. आणि तेथे, "तेथे फक्त त्याचा थोडासा अंश, थोडासा अंश उरला आहे, परंतु त्याची खराबी करु नको."

111 आणि मी विश्वास करतो की जर तुम्हाला तीसरा शिक्का टेपवर मिळाला...तुम्हाला ते तेथे मिळेल, जेथे आम्ही ते विस्तृतरित्या स्पष्ट केले आहे, किंवा किंबहुना विस्तृतरित्या स्पष्ट केले आहे.

**179. भाऊ ब्रॅन्हम, कोकऱ्याचे जीवनाचे पुस्तक, आणि जीवनाचे पुस्तक, एकच आहे का?**

112 निश्चितच, कारण हेच ते पुस्तक आहे ज्यामध्ये सर्वांची मुक्ती लिहीलेली आहे. समजले? त्यांची नावे त्यात आहेत. तुम्ही म्हणा, "अच्छा, भाऊ ब्रॅन्हम, आमचे नाव त्या

कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात लिहीले आहे. मी—मी माझे नाव त्या रात्री त्यामध्ये लिहून घेतले आहे." नाही, तुम्ही असे केले नाही, तुम्ही तसे केले नाही. तुम्हाला त्या रात्री फक्त तुमचे नाव त्यात दिसले जे त्यावर होते, पाहा, कारण त्यांची नावे जगाच्या स्थापनेअगोदर त्यात लिहीली होती. समजले? पाहा असे आहे, ते एकच पुस्तक आहे.

**180. भाऊ ब्रॅन्हम, काय हे खरे आहे, की—की प्रत्येक तो यहूदी, जो जेव्हा ख्रिस्त आला आहे, जन्मला आहे, वाचला जाईल? आणि एक लक्ष आणि चव्वेचाळीस हजार कोण आहेत? काय ते पवित्र आत्म्याने मोहरबंद होण्यासाठी पूर्वनियुक्त आहेत? आणि त्यांचे काय ध्येय आहे?**

113 तेथे तीन प्रश्न एकाच प्रश्नात आहे. परंतु हा पहिला:

**हे—हे खरे आहे की प्रत्येक यहुदी जो जेव्हा ख्रिस्त आला तेव्हा जन्मला आहे, तो वाचला जाईल का?**

114 नाही, कोणीच तारले जाणार नाही, फक्त तेच ज्यांची नावे कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात युगाच्या स्थापनेअगोदर ठेवण्यात आली आहेत, मग ते यहुदी किंवा परराष्ट्रीय असो. समजले? तेच सर्व आहे. त्या पुस्तकात ते रहस्य आहे, आणि ते पुस्तक ह्याचा खुलासा करीत आहे, ते प्रत्येकाचे नाव प्रगट करीत नाही, परंतु ते पुस्तक हे प्रगट करीत आहे की ह्या पुस्तकाचे काय रहस्य आहे; जेव्हा ती त्या नावांना पुकारीत आहे. तुम्ही ते समजत आहात का? समजले?

115 ते पुस्तक सांगत नाही, "आता, ली वाइल ह्या मंडळी युगात वाचेल, किंवा—किंवा ऑर्मन नेविल," किंवा—किंवा कोणीही. नाही, ते तसे म्हणत नाही, ते फक्त ते रहस्य दाखवते, ते रहस्य खोलते की ती गोष्ट काय आहे. परंतु आपण स्वतःच, विश्वासाद्वारे, तो विश्वास करतो. तेच मी त्या रात्री सांगितले.

116 कोणी म्हटले, "अच्छा, मला तो प्रयत्न करण्याची काहीच आवश्यकता नाही. भाऊ ब्रॅन्हमने म्हटले होते, की जेफर्सनविलेमधून केवळ एकच व्यक्ती वाचेल." समजले? आता, पाहा, तो एक दाखला दाखवीत आहे. ते—ते—ते तसे नाही, ते तसे नाही—ते तसे नाही कदाचित हजारो वाचतील. मला ठाऊक नाही. पाहा, माझी आशा आहे की त्यांतील प्रत्येकजण वाचला आहे, परंतु मला ठाऊक नाही.

परंतु मी ह्याचा अशाप्रकारे विश्वासू ठेवू इच्छीतो, की, "मी तो एक व्यक्ति आहे." तुम्हीही तुमच्यासाठी तसाच विश्वास ठेवा. जर तुम्ही तसा विश्वास करीत नाही, तर तुमच्या विश्वासात काहीतरी चुकीचे आहे; तुम्ही त्याविषयी निश्चित नाही जे तुम्ही करत आहात.

117 तुम्ही मृत्युसमक्ष कसे—कसे चालू शकता; जेव्हा तुम्हाला पूर्ण खात्री नाही की तुम्ही वाचला आहात की नाही? समजले? तुम्ही येथे खाली जाऊन त्या पांगळ्या व्यक्तीस, आंधळ्या आणि लंगड्या व्यक्तीस कसे सांगू शकता, "**प्रभू परमेश्वर असे म्हणत आहे**. उठून उभा हो! येशू ख्रिस्त तुला बरे करीत आहे."

118 तुम्ही कसे उभे राहून, तो थंड सुन्न देह जो पडलेला आहे, मृत आहे, आणि कित्येक तासांपासून मृत आहे, आणि थंड आणि सून्न होऊन पडलेला आहे; सांगू शकता, "**प्रभू परमेश्वर असे म्हणत आहे**, तुझ्या पायावर उभा राहा"? तुम्हाला, तुम्हाला समजले पाहीजे तुम्ही कशाविषयी बोलत आहात. समजले?

119 अच्छा, तुम्ही म्हणता, “मृत्यु प्रत्येक गोष्टीचा दावा करतो. ते सर्व समाप्त झाले आहे.” होय, परंतु जेव्हा परमेश्वराचे वचन प्रगट होते, तर तुम्ही जाणता की तो परमेश्वर आहे, जो परिस्थिती बदलतो. ही खरी गोष्ट आहे.

120 आता, होय, हे यहूदी नाहीत…नाही, सर्वच यहुदी वाचले जाणार नाही. नाही, महाशय. ते वाचले जाणार नाही; फक्त तेच जे…जेव्हा तो यहुद्यांविषयी बोलतो, “यहुदी,” हे केवळ नाम आहे जे त्यांना दिले होते जेव्हा…ते निघाले…माझा विश्वास आहे, की तो नबुखद्नेसर होता ज्याने त्यांना सर्वप्रथम “यहुदी,” म्हणण्यास सुरुवात केली, कारण यहुदाचा वंश तेथे नेण्यात आला होता. आणि आता त्यांना “यहुदी,” हे नाव देण्यात आले, कारण ते यहुदीयांतून आले, आणि त्यांना यहूदी हे नाव मिळाले.

121 परंतु, आता पाहा, इस्त्राएली वेगळे आहेत. इस्त्राएली आणि यहुदी हे पूर्णतः वेगळे आहेत. पाहा, प्रत्येक यहुदी—प्रत्येक यहुदी हा इस्त्राएली नाही. नाही, तो फक्त एक यहुदी आहे. परंतु मग इस्त्राएल…पौलाने कधीच सांगितले नाही की सर्व यहूदी वाचले जातील. त्याने म्हटले, “सर्व इस्त्राएली वाचतील.” का? कारण इस्त्राएल एक नाव होते, ते—ते पूर्वकाळापासून नाव आहे. समजले? आणि सर्व इस्त्राएली वाचले जातील, परंतु सर्व यहुदी नाही—यहुदीवाद वाचला जाईल. समजले?

122 परराष्ट्रीय सारखेच, असे होईल…ह्या संघटनांमध्ये, हजारो पटीने हजारो—हजारो लोक, होय, अक्षरशः लाखो लोक आहेत, आणि ते त्यास “ख्रिस्ती, चर्च ऑफ क्राईस्ट,” आणि अशा सर्व नावांनी बोलले जातात. त्याचा ह्या गोष्टीशी जराही संबंध नाही. नाही… त्याचा असा अर्थ नाही की ते वाचले जातील.

लोक म्हणतात, “आता तुम्ही *ह्या*चे, *त्या*चे, त्या संघटनेचे, अमुक संघटनेचे आहात. जर तुमचे नाव आमच्या पुस्तकात नाही, तर तुमचा नाश झाला आहे.” आता, ही एक तत्वप्रणाली आहे. समजले? ही एक तत्वप्रणाली आहे. समजले?

123 तेथे फक्त एकच मार्ग आहे ज्याद्वारे तुमचे तारण होईल, आणि, तो आहे, “हे इच्छा बाळगणाऱ्यावर नव्हे, किंवा धावपळ करणाऱ्यावर नव्हे, त्याच्यावर…तर दया करणाऱ्या देवावर अवलंबून आहे.” आणि परमेश्वराने त्याच्या पूर्वज्ञानाद्वारे, त्याची मंडळी त्याच्या गौरवाकरिता अगाऊच नियुक्त केली, आणि ती आहे जीचं तारण झाले आहे. बरोबर. आता, तुमचा विश्वास तेथे इतका रुतलेला आहे.

124 तुम्ही म्हणता, “माझा विश्वास तेथे नांगर घालून आहे.” आणि तुम्ही दृष्टी लावून पाहा की तुम्ही कशाप्रकारचे जीवन जगत आहात. तुम्ही पाहा, तुम्ही तेथे जाण्यासाठी बिलकुल लायक नाही. तुमचा नांगर चुकीचा आहे. तुम्ही तुमचा नांगर खडकाऐवजी वाळूवर घातला आहे, पहिली लहानशी लाट तो उडवून लावील. ओह.

125 वचन काही गोष्टींतून प्रगट होवो. “माझी मंडळी तसे शिकवत नाही!” ते बरोबर दर्शविते की तुमचा नांगर खडकावर घातलेला नाही. तुम्ही वाळूवर होता. होय. ते खरे आहे. म्हणून, आता तुम्ही पाहा.

**आणि ते एक लक्ष चव्वेचाळीस हजार, ते अगाऊच नेमलेले आहेत का?**

126 होय, महाशय. ते इस्त्राएल आहे, ते आत्मिक इस्त्राएल आहे.

127 जरा विचार करा, तेथे त्यांच्यापैकी दहा लाख असतील. मला ठाऊक नाही की ह्या समयी तेथे ते कितीजण आहेत, माझा अंदाज आहे की तेथे एक पूर्ण समुह आहे, परंतु ते सर्वच वाचलेले असणार नाहीत. कारण ते यहुदीयात आहे. समजले?

तुम्हाला काही कल्पना आहे की ह्या समयी ते तेथे कितीजण आहेत? मला ठाऊक नाही, परंतु ते बहुदा...ह्या पुढच्या छळणुकीला सुरुवात झाल्यानंतर ते वाढण्यास सुरुवात होते...ते एकत्र होत आहेत...तुम्हाला माहीत आहे, माझ्याकडे त्यांच्यावर एक टेप आहे, जीला मी माझ्याबरोबर पश्चिमेला एका कॉन्वेन्ट मंडळीत घेऊन जात आहे जी येथे आहे...

128 ती एक प्रचीन...ओह, मला आता त्याचे स्मरण नाही. तिची सुरुवात झाली होती... ती तेथे आफ्रिकेत आहे. डच रिफार्म. ते कॉन्वेन्ट डच रिफॉर्म चर्च आहे. आता, जर तुमच्यापैकी कोणी येथे बसलेले आहे, तर मी तुम्हाला सांगेन की ते तसे का आहे. तुम्ही अजूनही त्या जुन्या हाईडलबर्ग कॅटेकीजमला पकडून आहात, आणि तेच कारण आहे की तुम्ही अजूनही...डच रिफार्ममध्ये आहात. म्हणून, तुम्ही कदाचित एका अमेरिकी नावाने प्रतिष्ठित आहात. तीच—तीच गोष्ट त्यामागे आहे, कारण तुम्ही त्याच जुन्या हाईडेलबर्ग कॅटटेकिजममधून, शिक्षण देत आहात. तुम्ही तुमच्या पाळकांना विचारा की काय हे सत्य नाही काय? समजले? म्हणून आता, ह्याकडे लक्ष द्या.

**काय हे एक लाख चव्व्चाळीस हजार आहे ते ते पवित्र आत्म्याने मुद्रीत करण्यासाठी अगाऊच नेमलेले आहेत?**

129 होय, महाशय ते अगदी सत्य आहे. आता जर तेथे...आता जर मी...

काय मी उत्तर दिले नाही, जे तुम्हाला उपयुक्त वाटेल, का, होऊ शकते की मी... पाहा, मी चुकीचा असू शकतो. परंतु तुम्ही पाहा, हे मी माझ्या उत्कृष्ट समजुतीप्रमाणे दिले आहे, हे माझ्या सर्वोत्तम ज्ञानाप्रमाणे आहे.

**181. भाऊ ब्रॅन्हम, जसे तुम्ही ह्या आठवड्यात सर्पवंशावर...अत्याधिक परिश्रम घेतले आहेत...** (ओह, मी कधी ह्या प्रश्नावर लक्ष दिले नव्हते. हा प्रश्न माझ्याकडून राहिला होता)**...काय हा प्रश्न विचारणे योग्य होईल का? माझ्या मित्राने मला उत्पत्ती 4:1 समजविण्यास सांगितले आणि मी ते करु शकत नाही. मला तुम्ही मदत कराल का?**

130 हा—हा प्रश्न आपल्या विषयाच्या बाहेर आहे. परंतु, कसेही असो, मी—मी—मी, परमेश्वराच्या सहाय्याने माझ्या सर्वोत्कृष्ठ समजुतीप्रमाणे, सांगण्याचा प्रयत्न करीन. मला जरा हे व्यवस्थित करु द्या. मला वाटते. हे तेथे आहे जेथे ती म्हणते. "यहोवाच्या परमेश्वराच्या सहाय्याने मला पुरुषसंतान लाभले आहे." मला—मला विश्वास आहे की हाच तो प्रश्न आहे. मला वाटते हव्वेने तसे म्हटले. मला ते तपासावे लागेल खात्री करुन घेण्यासाठी,

131 कारण, त्या रात्री मी सात...मी...सात हजारच्या ऐवजी सातशे म्हटले. म्हणून त्यामुळे पाहा मी अस्वस्थ झालो, आणि तुम्हाला तर फक्त लक्ष द्यायचे असते. आणि शत्रू सर्व बाजूंनी, आणि तुम्ही—तुम्ही त्यावर सचेत आहात, तुम्ही पाहीले. होय, असेच आहे.

*आणि आदामाने आपली स्त्री हव्वा हिला जाणिले, ती गर्भवती होऊन तीने काइनास जन्म दिला, आणि म्हणाली, परमेश्वराच्या सहाय्याने मला पुरुषसंतान लाभले आहे.*

132 आता, माझा, किंवा बहिण, मी तुम्हाला ह्या प्रश्नाचे उत्तर देणार आहे. आणि आता तुम्ही लक्षात ठेवा की, मी तुम्हाला टाळीत नाही—नाही, नाही, पाहा, मी तुम्हाला सहाय्य करण्याचा प्रयत्न करीत आहे. मी तुमच्यावर प्रेम करतो, आणि मी त्या व्यक्तिवर प्रेम करतो ज्याने ह्या विषयी टीका केली असेल. परंतु मला वाटत नाही की हा व्यक्ति टीकाकार आहे. कारण पाहा, त्याने म्हटले, "माझे सहाय्य कर," कारण लोकं त्याचा

विश्वास करतात, परंतु त्यांना पवित्र आत्म्याद्वारे हे जाणण्यासाठी की त्यांनी त्या व्यक्तिला काय सांगावे ज्यांनी त्यांना हे विचारले आहे, योग्यरितीने ठरविलेले नसते.

133 आता, येथे ती सांगत आहे जो प्रश्न आहे, ह्यात काही शंका नाही की ते सांगत आहेत, "हव्वेने म्हटले परमेश्वराच्या सहाय्याने मला पुरुषसंतान लाभले आहे."

134 तुम्ही असे कसे विचार करु शकता की जर कधी जीवन आले असेल, जर ते प्रभूकडून आले नसले, मग ते बरोबर किंवा चुकीचे असो? कोणी पाठवले—कोणी यहुदा इस्कर्योतला जगात पाठवले? ते मला सांगा. बायबल सांगते. की तो "नाशाचा पुत्र" म्हणून जन्मला होता. तुम्ही जर त्यांना विचारा लिंबूमध्ये किडा कसा होतो, समजले. समजले? आता, तुम्ही पाहा, ते सांगू शकत—शकत नाही...असेच आहे.

135 लक्ष द्या, मग, जर तुम्ही त्यांना थोडेसे विधींवर आणू इच्छिता. पाहा. हव्वा येथे म्हणाली, जर तुम्ही हे ठीक त्याच भाषेत घेऊ इच्छिता जसे येथे लिहीले आहे—येथे ते असे लिहीले आहे की ज्ञानी आणि विचारवंताच्या डोळ्यांपासून ते लपलेले आहे. येथे अशाप्रकारे शिकविले गेले आहे, की हा एक परमेश्वर होता. ज्याद्वारे हव्वेला हा पुत्र लाभला आहे. आणि तो एक आत्मा आहे, आणि असे करु शकत नाही, समजले? आता येथे लक्ष द्या, जर तुम्ही ते पाहू इच्छीता, "परमेश्वराच्या सहाय्याने मला पुरुषसंतान लाभले आहे." पाहा, तुम्ही हे असे बनवू शकत नाही की त्याचा अर्थ...परंतु पाहा ह्याचा योग्य अनुवाद झाला पाहीजे. होय., महाशय. नाही, महाशय, जर तो, तर तो आत्मा...

136 आणि आपण नेहमीच आपल्या पालकांच्या स्वभावाचे अनुकरण करतो. तुम्हाला ते ठाऊक आहे. त्या लेकराकडे, त्याच्या स्वभावाकडे पाहा. अच्छा, तर आदम परमेश्वराचा पुत्र होता. हव्वा परमेश्वराची कन्या होती; बरोबर आहे, परमेश्वराच्या निर्मितीतील पहिली गोष्ट, ज्यात कुठेही वाईटाचा एक लवलेशही असू शकत नाही. त्यावेळी वाईटाची ओळखही नव्हती.

137 मग का काईन खोटारडा एक खूनी होता, आणि इतर इतर सर्वगोष्टी, ते कोठून आले? जरा हा प्रश्न स्वतःला विचारा, ते सर्पाचे बीज होते. समजले? बायबल तसे सांगत नाही काय? पाहा, त्याचा वंश निरंतर पुढे वाढत गेला. त्यात, तो बनत, पाहा, त्याचा वंश निरंतर वाढत गेला, त्यात तो बनत...

138 हे जग कोणाचे आहे? सैतानाचे. ते आता कोण नियंत्रित करतो? सैतान. अगदी बरोबर आहे. सैतानाचे जगावर नियंत्रण आहे. त्याने येशूला म्हटले, "पाहा, ही सारी महिमा, किती सुंदर आहे! जर तू मला नमन करशील, तर मी ते तुला देईन." पाहा, तो ह्या सर्वांवर अधिपत्य करतो.

139 आता पाहा, त्याचे संतान बुध्दिमान आहे; सैतानाची लेकरे किंवा काईनाचे संतान... जर तुम्ही हे पाहू इच्छिता तर त्याची वंशावळ खालपर्यंत पाहा, आणि तुम्हाला समजले की त्यांच्यातील प्रत्येक जण हुशार होते.

140 परंतु मग जेव्हा त्याने हाबेलला मारले आणि परमेश्वराने त्याला पुन्हा शेथ दिला, ह्या गोष्टीचे दर्शक होते की नीतीमानाला मुक्त करणे आहे, जो मृत होता, आणि पुन्हा उठला. आणि तेव्हापासून...आता लक्ष द्या, तो पहिल्या स्वाभाविक वंशापासून आला नव्हता. ते मृत झाले होते. आता काय तुम्ही आपले मन उघडले आहे? समजले? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] पहिले बीज, स्वाभाविक बीज, साधारण चांगले होते, ते आधुनिक मंडळी, हाबेलला दर्शवते. त्या वंशावळीला सुरक्षित ठेवण्यासाठी तो एक मेला ह्यासाठी की दुसरा उठू शकेल, तुम्हाला समजले. म्हणून, त्याला पुन्हा परत जन्मले पाहीजे

काय? तुम्ही ते समजत आहात? ["आमेन."] ठीक आहे, तुम्हाला ते समजत आहे, पाहा. समजले?

141 हे ह्याचे परिपूर्ण दर्शक आहे. म्हणून नैसर्गिक मनुष्य, आदाम, जो—जो त्याचा पिता त्यापासून जन्मला, तो नैसर्गिक कल दाखवतो. परंतु ह्याने काम चालणार नाही, स्वाभाविक मनुष्य परमेश्वराच्या गोष्टी जाणू शकत नाही. म्हणून तेथे एक मनुष्य स्वाभाविक रुपात आला आणि मेला ह्यासाठी सर्व गोष्टी पुन्हा पूर्वस्थितीत जाव्या; आणि हे हाबेलाच्या मृत्यूने आणि त्याच्या जागी शेथाचे येणे ह्याद्वारे—द्वारे दाखवले आहे.

142 आणि पाहा, की त्या आत्म्याने त्याच्यापासून जे लोक उत्पन्न केले ते कशाप्रकारचे होते. ते नम्र, शेतकरी, मेंढपाळ. पाहा ह्या जगाच्या ज्ञानाद्वारे काय आले; चलाख मनुष्य, बांधकाम करणारे, आणि—आणि धातूची कामे करणारे, आणि सर्व प्रकारची प्रवीण बुध्दिमत्ता आणि अशा प्रकारच्या गोष्टी आल्या. पाहा. त्यांचा कोठे अंत झाला. ते तेथे खाली होते, आणि परमेश्वराने त्यांच्यातील प्रत्येकाचा नाश केला; त्यांच्यातील प्रत्येकाचा, आणि नम्र जनांना वाचवले. येशूने मत्तय 5 मध्ये सांगितले नाही काय. "नम्र जन पृथ्वीचे वतन भोगतील."?

143 म्हणून, होय, काळजी करु नका. त्यांच्याकडे पाऊल ठेवण्यासाठी जागा नाही. समजले? ते काईनाचा पुत्र असण्याचा विश्वास करीत नाहीत. परंतु आपल्याकडे त्यावर टेप आहे, जर तुम्ही ते ऐकू इच्छिता तर ऐका. त्यात ते विस्तृतपणे स्पष्ट केले आहे. समजले? नाही, महाशय.

144 आणि मी पाहिला आहे की त्यांनी वर्तमान पत्रात एक छोटा लेख दिला आहे, जेथे विज्ञान आता सिध्द करणार आहे की, "हव्वेने कधीच सफरचंद खाल्ले नव्हते. तिने जर्दाळू खाल्ले होते." समजले? पाहा, ते वर्तमानपत्र माझ्या घरी आहे. "ते एक जर्दाळू होते." कसे—कसे लोक एवढे दूर...पाहा, ते ऐहीक बुध्दीचे आहेत.

"मग, प्रत्यक्षात, मोशेने कधीच समुद्र ओलांडला नाही. तो लव्हाळ्याच्या समुद्रामधून पार गेला. इस्त्राएलाला मृत समुद्राच्यावरील भागांतून आणले. तेथे लव्हाळ्याचा गुच्छ होता, संपूर्ण समुद्र लव्हाळ्याच, जेथे एकेकाळी पाणी होते, जे खाली सुकून गेले होते. आणि मोशेने आडमार्ग घेतला. आणि त्या मार्गाने गेला." आणि सनातनी मंडळ्यांनी त्याचा स्विकार केला, की ते तसेच होते.

145 हे मनुष्या, काय तू तो सर्पाचा वंश, ख्रिस्तविरोधी आणि संपूर्ण गोष्ट जी तेथे ठेवलेली आहे, पाहू शकत नाहीस? निश्चितच? होय, महाशय.

> **भाऊ ब्रॅन्हम, कृपया माझ्या छोट्यासाठी प्रार्थना करा...** (अच्छा, येथे एक प्रार्थना विनंती आहे. मी ते पाहात आहे) **माझ्या लहान नातवासाठी प्रार्थना करा, जो फ्लूने अत्यंत आजारी आहे. तो त्या रिवर व्हयू हॉटेलमध्ये आहे.**

146 प्रभू येशू, ह्या बिचाऱ्या मनुष्याने कधीही येथे हे उगाचच लिहीले नाही. तीने तुम्हाला त्या रात्री त्या लहान मुलांतून संधीवाताचा ताप काढताना पाहिले आहे. तीला ठाऊक आहे की तू तो महान परमेश्वर आहेस, आणि आम्ही त्या लहान मुलाकरीता आमच्या प्रार्थना सादर करतो. येशू ख्रिस्ताच्या नावात, तो बरा होवो. आमेन.

147 जेव्हा कोणीतरी काही लिहीते ते व्यर्थ नसते. त्यांना—त्यांना—त्यांना...काही होत असते. कदाचित आपल्याला ते कितीतरी साधारण वाटत असेल, परंतु—परंतु त्या मागे काही गोष्ट असते, तुम्ही पाहा, ती स्त्री, तो लहान मुलगा, काही गोष्ट.

**182. काय एलीया, जो यहुद्यांना प्रचार करण्यासाठी येणार आहे, तो खरा मनुष्य असेल जो ह्या पृथ्वीवर राहिला होता किंवा तो एलीयाचा आत्मा असेल जो कोणा दुसऱ्या मनुष्यावर असेल?**

आता, ते, मी—मी सांगण्यास भीत आहे. मला माहीत नाही. समजले? मला तो पुन्हा वाचू द्या.

> **हा एलीया, जो यहुद्यांना प्रचार करण्यासाठी येत आहे** (ओह, होय) **काय तो तोच मनुष्य असेल जो पृथ्वीवर राहिला होता किंवा तो एलीयाचा आत्मा असेल जो दुसऱ्या कुठल्या मनुष्यावर असेल.**

148 आता, पाहा, जर मी ह्याचे बरोबर उत्तर देऊ शकतो, तर मी तुम्हाला हनोकाविषयी सांगू शकतो. परंतु पाहा, मी तसे करु शकत नाही. मला फक्त एकच गोष्ट माहीत आहे, जी ती आहे की वचन सांगते की तो काय असेल. आणि आता ते कदाचित तसे असेल... माझा—माझा एक प्रकारे कल आहे...आता मला हे अशाप्रकारे सांगू द्या. आणि माझी आशा आहे की जे भाऊ टेपवर ऐकतील, ते हे समजतील. मी ह्यावर विश्वास ठेवतो की ते व्यक्ति त्यांच्या आत्म्याने अभिषिक्त असतील. कारण पाहा, त्याने म्हटले, "काय नाही...अलीशावर? एलीयाचा आत्मा अलीशावर येऊन थांबला नव्हता काय?" पाहा, "एलियाचा आत्मा." आणि पाहा त्याने तसेच केले जसे एलीयाने केले म्हणून, मी, जर मी...परंतु मी सांगू शकत नाही की ते सत्य आहे. पाहा, मला—मला ठाऊक नाही. मी तुमच्याशी प्रामाणिक आहे. मला ठाऊक नाही.

**183. भाऊ ब्रॅन्हम, काय तुम्ही कृपया बाप्तिस्माविषयी प्रश्नाचे उत्तर माझ्यासाठी द्याल? मत्तय 28:19 शिकवते, "पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा." आणि पेत्र, प्रेषितांची कृत्ये 2:38 मध्ये, "प्रभू येशूच्या नावात." हा बदल प्रेषितांच्या कृत्यांमध्ये केव्हा आला? आता मी "प्रभू येशूच्या" नावात, बाप्तिस्मा घेण्यात विश्वास ठेवतो.**

149 ठीक आहे, भाऊ किंवा बहीण, ज्या कोणी हे लिहीले आहे, तेथे—तेथे ह्याविषयी कुठलाच बदल आला नव्हता, समजले. ते...आणि पेत्राने अगदी तेच केले जे येशूने करण्यास सांगितले. आता, कोणी येईल आणि म्हणेल, "पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्या उपाधियांचा उपयोग करा," तर तो ते करतो जे पेत्राने करण्यास सांगितले नाही, जे परमेश्वराने करण्यास सांगितले नाही. समजले? आता, येशूने म्हटले की...

150 आता येशूने म्हटले की आपण ह्याचा थोडासा अभ्यास करुया. आपण...मी तुम्हाला येथे काही दाखवू इच्छितो, लक्ष द्या. आता लक्ष द्या, जर तुम्ही ती व्यक्ति, येथे आहे. मी येथे एका पदार्थाचे तीन तुकडे ठेवणार आहे. आता बघा. [भाऊ ब्रॅन्हम उदाहरणासाठी तीन पदार्थ वेगवेगळे ठेवतात.—सम्पा.] *हा* पिता आहे, *हा* पुत्र आहे, *हा* पवित्र आत्मा आहे; जसे त्रैक्यवादी लोक त्यावर विश्वास ठेवतात, विश्वास करतात की ते तीन वेगळे व्यक्ति आहेत. ते हाच विश्वास करतात. समजले? अच्छा, तर मग, आता मला...

151 आणि मग मत्तय 28:19 मध्ये येशूने म्हटले, "सर्व जगात संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा. त्याने..." नाही. मला तुम्ही क्षमा करा. मी आता, मला वाटते प्रेषितांची कृत्ये 2 मधील संदर्भ देत आहे. वाटते नाही, लूक 24:49 चा मी संदर्भ देत आहे. त्याने म्हटले...मला ते वाचू द्या, मग मला ते समजेल पाहा, आणि मग...कारण त्या दिवशी मी त्याला सांगितले होते की जेव्हा मी नाही केले...मी ह्यावषयी निश्चित होऊ इच्छितो. मला—मला ते शिर्षक माहीत आहे, जे तुम्ही विचारत आहात, परंतु मला ते जाणून घ्यायचे आहे की त्याने काय म्हटले. आपण 28 अध्यायाचे 16 वचनापासून सुरुवात करुया. "मग अकरा भोजनास बसले..."

*इकडे अकरा...शिष्य गालीलांत जो डोंगर येशूने नेमला होता त्यावर गेले.*

*आणि त्यांनी त्याला तेथे पाहून नमन केले, तरी कित्येकांस संशय वाटला.*

*आणि येशू जवळ येऊन त्यांच्याशी बोलताना म्हणाला, स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे...स्वर्ग आणि पृथ्वीचा सर्व अधिकार मला दिला आहे.*

152 आता परमेश्वराचे सामर्थ्य कोठे आहे? परमेश्वर कोठे आहे? जर स्वर्गात सर्व अधिकार आणि पृथ्वीवर सर्व अधिकार, दिलेले आहेत, आता परमेश्वर कोठे आहे? पाहा, तो तेथे आहे. हेच आहे जे तुमच्याशी बोलत आहे. ठीक आहे.

*तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा; त्यांस पित्याच्या, पुत्राच्या आणि पवित्र आत्म्याच्या नावात बाप्तिस्मा द्या.*

153 आता त्रैक्यवादी मानणारे ही पद्धत स्विकारतात, "मी तुला पित्याच्या नावाने, पुत्राच्या नावाने, पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा देतो." असे तर पवित्र वचनातही दिलेले नाही. समजले? त्याने म्हटले, "त्यांना पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या..." त्याने असे सांगितले नाही की...प्रत्येकाच्या पुढे एक नाव लावा. एकच नावात! येथे लक्ष द्या. असे म्हटले नाही, "त्यांना त्यांच्या नावात बाप्तिस्मा द्या." नाव, एक नाव, "पित्याच्या, पुत्राच्या आणि पवित्र आत्म्याच्या नावात." समजले?

154 आता मी तुम्हाला विचारु इच्छितो. "पिता" हे एक नाव आहे काय? [मंडळी, "नाही"—सम्पा.] "पुत्र" एक नाव आहे का? ["नाही."] येथे किती पिता आहेत? तुमच्यातील कोणाचे नाव "पिता" आहे? येथे किती पुत्र आहेत? येथे किती मनुष्य आहेत? समजले? अच्छा, तुमच्यातील कोणाचे नाव "पिता," "पुत्र" किंवा "मनुष्य" आहे? समजले?

155 जसे एक रात्र स्त्री एकदा म्हणाली, ती म्हणाली, "भाऊ ब्रॅन्हम, 'पवित्र आत्मा' हे नाव आहे. ती एक व्यक्ती आहे."

156 मी म्हणालो, "होय, महाशय. मी एक व्यक्ती आहे, परंतु माझे नाव 'व्यक्ती' नाही. मी एक व्यक्ती आहे, समजले. माझे नाव विलीयम ब्रॅन्हम आहे; परंतु मी एक व्यक्ती आहे."

पवित्र आत्मा एक व्यक्ति आहे. तो व्यक्ती आहे, ते नाव नाही. ते परमेश्वराच्या व्यक्तीचे शिर्षक आहे. समजले? ते परमेश्वराच्या व्यक्तीमत्वाचे शिर्षक आहे, जे तो आहे. आता—आता जर...

157 त्याने म्हटले, "तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा, त्यांस पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या." "पित्याच्या नावाने, पुत्राच्या नावाने, पवित्र आत्म्याच्या नावान नाही." किंवा "पित्याच्या, पुत्राच्या आणि पवित्र आत्म्याच्या *नावांनी* नाही," परंतु, "पित्याच्या, पुत्राच्या आणि पवित्र आत्म्याच्या नावाने." आणि जर "पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा नाव नाही," मग त्या विषयी काय?

158 जर तुम्ही म्हणता ते "नाव" आहे, तर मग कुठले नाव. तुम्ही त्यांतील एकाला नाव म्हणू इच्छिता, ते कुठले नाव आहे. जर तुम्ही शीर्षकाला नाव संबोधू इच्छिता, तर मग कुठल्या नावाला, कोणत्या शीर्षकात तुम्ही बाप्तिस्मा घेऊ इच्छिता, "पिता" किंवा "पुत्र"? पाहा, ते एकवचन आहे.

आता आपण येथे वळूया, आणि ते म्हणजे मत्तय पुस्तकाचा शेवटचा अध्याय.

159 जसे मी ते नेहमीच समजावले आहे. जर तुम्ही एखादी प्रेमाची गोष्ट वाचता, आणि त्यात म्हटलेले असते, “जॉन आणि मेरी ह्यानंतर सदैव सुखाने जीवन जगतात.” पाहा, ह्याचे कारण तुम्ही—तुम्हाला ठाऊक नाही की जॉन आणि मेरी कोण आहे. तुम्ही तुमच्या गोष्टीच्या सुरुवातीला जा, शोधून काढा की जॉन व मेरी कोण आहेत. समजले?

160 आता तेच तुम्ही ह्या मत्तयच्या पुस्तकात करीत आहात. तुम्ही त्याचा फक्त शेवटचा भाग वाचत आहात. मत्तयच्या पहिल्या अध्यायाकडे जा आणि वाचा की ती गोष्ट काय आहे. ते मत्तयचे शेवटचे पुस्तक आहे, आणि शेवटचे वचने आहेत.

161 जसे तुम्ही एक पुस्तक उचलले आणि म्हणालात “जॉन आणि मेरी ह्यानंतर सदैव आनंदी जीवन जगतात. तो जॉन जोन्स होता आणि—आणि मेरी *अमुक–आणि–अमुक* होती? ते होते...? नाही, तो जॉन होता...? तो जॉन हेन्री आणि ती *अमुक–अमुक* होती? हा जॉन *कोणीतरी* आणि *अमुक–अमुक* आहे?” नाही, तुम्ही पाहा, तुम्हाला अजूनही माहीत नाही. फक्त एकच गोष्ट करायची आहे, ती म्हणजे पुन्हा पुस्तकात जा आणि ते वाचा. पाहा, तुम्ही *येथे* एखादा तुकडा उचलू शकत नाही. तुम्हाला चित्र पूर्ण करण्यासाठी सर्व गोष्टी एकत्रित केल्या पाहीजे.

162 आता तुम्ही मत्तयच्या, पहिल्या अध्यायात जा. आणि पहिला अध्याय पुढे जाऊन वंशावळी विषयी सांगतो. मग हे 18 व्या वचनाकडे येते आणि म्हणते, “येशू ख्रिस्ताचा जन्म ह्या प्रकारे झाला.” काय हे बरोबर आहे? [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.]

163 आता मी तुम्हाला काही विचारु इच्छितो. आता पुन्हा ऐका. तुम्ही, तुम्ही हे सांगा. [भाऊ ब्रॅन्हम तीन वस्तूंकडे निर्देश करतात, जे उदारणांने दाखवले होते—सम्पा.]. *हा* कोण आहे? परमेश्वर हा...[मंडळी, म्हणते, “पिता.”], परमेश्वर हा...[“पुत्र.”] परमेश्वर हा...[“पवित्र आत्मा.”] आता *हा* कोणता परमेश्वर आहे? [“पिता.”] *हा* कोणता परमेश्वर आहे? [“पवित्र आत्मा.”] *हा* कोणता परमेश्वर आहे? [“पुत्र.”] पुत्र. ठीक आहे. आता आपल्याला हे समजले. आता तुम्ही *हा* कोण होता असे म्हणाले; परमेश्वर *कोण*? [“पवित्र आत्मा.”] पवित्र आत्मा. ठीक आहे. आता ठीक आहे.

> *आता येशू ख्रिस्ताचा जन्म ह्या प्रकारे झाला. जेव्हा...त्याची आई मरीया हिचे योसेफास वाग्दान झाल्यावर त्यांचा सहवास होण्यापूर्वी ती पवित्र आत्म्यापासून गर्भवती झालेली दिसून आली...*

164 [मंडळी म्हणते, “पवित्र आत्मा”—सम्पा.] आता, मला वाटते तुम्ही म्हटले परमेश्वर त्याचा पिता होता. आता येथे काहीतरी चुकीचे आहे; त्याला दोन पिता असू शकत नाही. तुम्हाला हे ठाऊक आहे. समजले? आता येथे काहीतरी चुकीचे आहे. आता, ह्या तीन व्यक्तींपैकी कोण, जर ते तीन व्यक्ती आहेत, त्यांच्यातील कोण त्याचा पिता आहे? बायबल येथे स्पष्टपणे सांगते, “ती पवित्र आत्म्यापासून गर्भवती झालेली दिसून आली.” परमेश्वर जो पिता त्याला ह्याच्याशी काही घेणे देणे नाही. आणि येशूने म्हटले, परमेश्वर त्याचा पिता होता, आणि आपल्याला माहीत आहे की परमेश्वर त्याचा पिता आहे. तर मग, त्याचे दोन पिता होते, आता ही गोष्ट सुनिश्चित होते, की तो अनौरस संतती, खात्रीशीर. पाहा तुम्हाला स्वतःला ही गोष्ट कोठे मिळते? आता:

> *तिचा पती योसेफ नीतीमान होता व तिची बेअब्रू करण्याची त्याची इच्छा नसल्यामुळे तिला गुप्तपणे सोडण्याचा त्याने विचार केला.*
>
> *असे विचार त्याच्या मनात घोळत असता...*

165 आता, तुम्हाला स्मरण आहे की तो एक नीतिमान मनुष्य होता, आणि प्रभूचा हात आता सारखाच हात आहे, जे अगाऊ नेमलेले आहे तेच हे पकडतील. समजले?

*असे विचार त्याच्या मनात घोळत असता. पाहा, प्रभूच्या दूताने त्याला स्वप्नात दर्शन दिले...*

काय तुम्ही हे तुमच्या बायबलमध्ये पाहात आहात? [मंडळी म्हणते, "आमेन."] ठीक आहे.

*...म्हटले, योसेफा, दावीदाच्या पुत्रा तू मरीयेचा आपली पत्नी म्हणून स्विकार करण्यास...अनमान करु नको, कारण तिच्या पोटी...जो गर्भ आहे तो...*

166 "परमेश्वर जो पिता"? मी ते चुकीचे वाचले का? [मंडळी म्हणते, "होय."—सम्पा.] निश्चितच मी चुकीचे वाचले. "तिच्या पोटी जो गर्भ आहे," ह्याचा पिता परमेश्वराशी काही संबंध नव्हता, तो तर "पवित्र आत्मा" होता. आणि आता आपल्याला ठाऊक आहे की परमेश्वर त्याचा पिता होता. काय हे बरोबर आहे? ["आमेन."] तर ते काय आहे? अर्थातच, पवित्र आत्मा हा परमेश्वराचा आत्मा आहे. आता तुम्हाला हे समजले आहे. पाहीले?

167 परमेश्वर पिता आणि पवित्र आत्मा हे एकच व्यक्ती आहे, किंवा त्याला दोन पिता होते. आणि मग कुठल्या—कुठल्या प्रकारच्या व्यक्तीची तुम्ही उपासना करता? आता कुठला परमेश्वर तुमच्याकडे आहे? समजले? समजले? परमेश्वर पवित्र आत्मा, आणि परमेश्वर पिता, हे स्वतःमध्ये तोच आत्मा आहे.

*आणि तिला पुत्र होईल,...* (हा व्यक्ती येथे)*...आणि त्याचे नाव तू...*

काय? [मंडळी म्हणते, "**येशू**."—सम्पा.] "त्याचे नाव!" ["येशू."] आता लक्षात ठेवा.

*...त्याचे नाव **येशू;** असे ठेव. कारण तोच आपल्या प्रजेला त्यांच्या पापांपासून तारील.*

*हे सर्व अशासाठी झाले की प्रभूने संदेष्ट्याच्या द्वारे जे सांगितले ते पूर्ण व्हावे ते असे,*

*पाहा, कुमारी गर्भवती होईल, व तिला पुत्र होईल. आणि त्याला... इम्मानुएल हे नाव देतील; ह्या नावाचा अर्थ, आम्हाबरोबर देव!*

168 परमेश्वराचे काय नाव आहे? पित्याचे, पुत्राचे आणि पवित्र आत्म्याचे नाव काय आहे? [मंडळी म्हणते, "**येशू."**—सम्पा.] बायबल सांगते, "**येशू**." त्याचे नाव होते.

मग एकदा तेथे आराधनालयात एक व्यक्ति वादविवाद करण्याचा प्रयत्न करीत होता, म्हणाला, "भाऊ ब्रॅन्हमने ह्या सर्व गोष्टींना फिरविले आहे; परंतु तो ह्या गोष्टीस फिरवू शकत नाही." तो म्हणाला, "येथे ते पूर्णपणे योग्यरितीने तीन वेगवेगळ्या व्यक्तींना दाखवत आहे." म्हणाला, "मत्तय, 3रा अध्याय! *येथे* योहान उभा राहून प्रचार करीत होता; *येथे* पुत्र बाप्तिस्मा घेण्यासाठी चालत येतो. तो पाण्यात गेला. त्याने योहानाकडून बाप्तिस्मा घेतला, पाण्याबाहेर निघून गेला. आणि, 'पाहा, त्याच्यावर आकाश उघडलेले होते.' आणि म्हणाला, 'परमेश्वराचा आत्मा आकाशांतून कबुतरासारखा उतरताना पाहिला. आणि आकाशांतून अशी वाणी झाली की, "हा माझा परमप्रिय पुत्र, ज्यामध्ये..."' एकाच समयी तीन वेगळ्या व्यक्ती."

169 होय. हे असे दर्शविते की लोक ज्यांनी बाप्तिस्मा घेतला नाही आणि ज्यांना त्या कार्यासाठी सेवक म्हणून बोलाविले नाही, त्यांचे मंचावर काहीच काम नाही. हे बरोबर आहे.

आता पाहा, मी—मी—मी त्या व्यक्तीला परमेश्वराच्या सहाय्याने घेऊ शकतो आणि त्याला अशा बंधनाने बांधू शकतो की त्यांचे डोके चक्रावून जाईल. पाहा, मला त्याची काही पर्वा नाही...

नाही, माझा असा अर्थ नाही. हे योग्य वाटत नाही. मला क्षमा करा. प्रभू, माझा तसा अर्थ नव्हता. मला तसे म्हणायचे नव्हते. मला असे वाटले की, त्याने मला ह्या गोष्टी तपासण्यास सांगितले, पाहा, म्हणून मला तशाप्रकारे सांगायचे नव्हते. मला—मला क्षमा करा. माझा विश्वास आहे की पवित्र आत्मा त्या व्यक्तीला काही रहस्य प्रगट करु शकतो. ही गोष्ट बरोबर वाटते.

170 हे जणू काही एखाद्या वाद्याला सुर बरोबर लावण्यासारखे आहे, जेव्हा तुम्ही काहीतरी चुकीचे करता. आणि एक ख्रिस्ती म्हणून, तुम्ही ते सांगू शकता, तुम्ही काहीतरी चुकीचे बोलला. त्याला ते आवडले नाही. पाहा, तो मला त्याच्यामध्ये ठेवत आहे. समजले. मी त्या चित्रात मुळीच नाही. मी तर बस...मी स्वतःस त्यामध्ये पाडू इच्छीत नाही किंवा असे काहीच करु इच्छित नाही. फक्त त्यालाच, त्यालाच कार्य करु दे. तोच शब्द काढतो. तुतारी तर निःशब्द आहे; त्याच्यामागे एक वाणी असते, तीच शब्द देते.

171 आता, येथे पाहा. त्या मनुष्याने वचनाचा चुकीचा अर्थ लावला. पाहा, ते...लक्षात ठेवा, "हे ज्ञानी आणि विचारवंत ह्यांपासून गुप्त ठेवले; बालकांस प्रगट केले."

आता, *येथे* तो एक व्यक्ती, येशू ख्रिस्त आहे. जो पृथ्वीवर उभा आहे. आता, आकाश पाहा, वास्तवात हे ते वातावरण आहे जे त्याच्यावर होते. आता लक्ष द्या, "आणि योहानाने साक्ष दिली..."

172 आता त्या मनुष्याला हे सांगायचे आहे. "*येथे* पिता परमेश्वर आहे, आणि *येथे* पवित्र आत्मा परमेश्वर आहे, जो आत्मा परमेश्वर आहे, कबुतरासारखा आहे, आणि *येथे* पुत्र परमेश्वर आहे; अशाप्रकारे तीन व्यक्ती बनवित आहे." हे चुकीचे आहे.

173 योहान *येथे* मागे उभा होता, त्याला ठाऊक होते, की *हा* तो कोकरा आहे. योहानाने म्हटले, "मी ही साक्ष दिली की..." *मी* परमेश्वराचा आत्मा, कबुतरासारखा आहे. आता येथे हीच गोष्ट आहे जसे मी, त्या रात्री सातशे ऐवजी...म्हणालो...समजले? परमेश्वराचा आत्मा! कबुतरा*सारखा* परमेश्वर होता. "परमेश्वराचा आत्मा आकाशांतून उतरत होता. आणि आकाशांतून एक वाणी झाली, म्हणाली, 'हा माझा परमप्रिय पुत्र, ज्यात मी राहण्यास संतुष्ट आहे.'"

"स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला देण्यात आला आहे." समजले? समजले? समजले? तो तोच होता. आता त्याचे नाव काय होते. [मंडळी म्हणते, "येशू"—सम्पा.] निश्चितच. समजले?

174 पाहा जोपर्यंत त्रैक्यवादी तीन भिन्न परमेश्वर असण्याची शिकवण आहे; तो मूर्तीपूजावाद आहे! बायबलमध्ये तसे कधीच शिकवण्यात आले नव्हते. तसे कधीच सिंहाच्या संदेशात शिकवले गेले नाही; परंतु ते नंतर, जो ख्रिस्तविरोधी होता, त्या समयात स्विकारण्यात आले. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही कोणत्याही धर्मशास्त्राच्या अभ्यासकास विचारु शकता. असे कधीच नव्हते, परंतु ते केवळ निकलाईताच्या शिकवणीद्वारे आले हेच कारण आहे की ही शिकवण मार्टिन लूथर बरोबर बाहेर आली; हेच कारण आहे की

ती जॉन वेस्लीच्या समयात ही चालू राहिली, आणि पुढे पेंटेकॉस्टलमध्ये खोलपर्यंत ओतली गेली.

175 त्या समयात जेव्हा पेंटेकॉस्टल बाहेर आले, तेव्हा त्यांच्याकडे “ओन्ली जिजस” हा समुह होता. आता, तेही पुन्हा चुकीचेच आहे. येशू स्वतःचाच पिता कसा काय होऊ शकतो? समजले? म्हणून ते शिक्षण बाहेर काढले गेले.

176 परंतु तेथे एक गरुडाचा समय येणार होता. समजले? हा तोच समय आहे, जो ती सर्व गूजे सुधारणार आहे. समजले?

177 “पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा” हे प्रभू येशू ख्रिस्ताचे शीर्षक आहेत. त्या सर्व तीघांकडे लक्ष द्या! मत्तय सांगतो, “पिता, पुत्र, पवित्र आत्मा.” पेत्र म्हणतो, “प्रभू येशू ख्रिस्त.” पिता कोण आहे? “प्रभूने माझ्या प्रभूला सांगितले, ‘तू माझ्या उजवीकडे बैस.’” हे बरोबर आहे काय? पिता, पुत्र, येशू; पवित्र आत्मा, तो लोगॉस जो परमेश्वरातून निघाला. “पिता, पुत्र, पवित्र आत्मा” हे पूर्णतः शीर्षक आहेत. ज्यात परमेश्वराचा मनुष्य तीन वेगवेगळ्या रुपात, किंवा त्यांच्या स्वतःच्या तीन गुणवैशिष्ट्यांमध्ये—मध्ये—मध्ये प्रगट झाला.

178 आणि त्या व्यक्तीसाठी जो हे समजू शकणार नाही, स्पष्ट करण्यासाठी असे म्हणता येईल की हे एकाच परमेश्वराची तीन कार्यालय आहेत. वास्तवात, हे एकाच परमेश्वराचे तीन गुणवैशिष्ट्य आहेत. परमेश्वर तीन भिन्न कार्यालयात काम करत आहे. पितृत्वाखाली, पुत्रत्वाखाली, पवित्र आत्म्याच्या कार्यक्षेत्राखाली. परमेश्वर ह्या तीघांमध्ये पूर्ण होतो. तुम्हाला पूर्ण होतो. तुम्हाला लक्षात आहे की ख्रिस्तविरोधीचा अंक चार आहे? समजले? परमेश्वर “पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा,” हे पूर्णतः “प्रभू येशू ख्रिस्त आहे.”

179 जेव्हा तुम्ही फक्त “येशू” च्या नावाने बाप्तिस्मा घेता, ते चुकीचे आहे. फक्त मी तुला “येशूच्या नावाने बाप्तिस्मा देतो,” हे पूर्णतः चुकीचे आहे. मी पुष्कळ येशूंना ओळखतो. का, लॅटीन देश अशा येशूंनी भरलेले आहे.

180 परंतु हा “प्रभू येशू ख्रिस्त” आहे आणि तोच सांगतो की तो कोण आहे.

181 तेथे पुष्कळ ब्रॅन्हम्स आहेत, जर तुम्हाला माझ्याशी व्यक्तिशः बोलायचे आहे. परंतु मी—मी एकच विलियम मॅरियम ब्रॅन्हम आहे. तो—तो मी आहे. परंतु तेथे सभोवती अनेक इतर विलियम ब्रॅन्हम्स आहेत आणि इत्यादी.

182 परंतु हा स्पष्टरितीने एकच व्यक्ति “प्रभू येशू ख्रिस्त” आहे, समजले, अभिषिक्त. त्यांच्यातील केवळ एकच आहे. आता, ते बरोबर आहे.

म्हणून जर ह्यावर आणखी काही आहे. तर तुम्ही मला पत्र किंवा—किंवा दुसरे काही लिहा, आणि जेव्हा मी दुसऱ्या प्रश्नावर उत्तर देत असेल, मी ह्यावर बोलण्याचा प्रयत्न करीन, ह्यासाठी की मी पाहू शकेन की जर आपण काही ह्या आजारी लोकांसाठी प्रार्थना करु जे पीडीत आहेत.

**184. भाऊ ब्रॅन्हम जर हा प्रश्न येथे योग्य वाटत नाही—नाही, ह्यात योग्य वाटत नसेल...उत्तर देऊ नका.** (ही एक चांगली गोष्ट आहे. मी त्याचे कौतुक करतो.) **कुठली—कोणती लेकरे रॅपचर मध्ये जातील, काय कोणी लहान लेकरे रॅपचरमध्ये जातील? धन्यवाद.**

त्यांनी ह्यावर कधीच नावाची स्वाक्षरी केली नाही. आता, जर तुम्ही केली नाही, त्याची आवश्यकता नाही.

183 परंतु पाहा. जेव्हा परमेश्वर कोणाचे नाव जगाच्या उत्पत्ती अगोदर कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात लिहीतो, तर पृथ्वीवरील कोणीही ते नाव खोडू शकत नाही, कारण ती ख्रिस्ताच्या रक्ताच्या शाहीने लिहीली गेली आहेत. मग ते *इतके* मोठे असो किंवा *इतके* मोठे, *तेवढे* मोठे किंवा कितीही असो, त्याबरोबर असेच आहे. समजले? सर्व लेकरे, सगळी मंडळी, तेथील सर्वजण...जे परमेश्वराच्या त्याच्या पूर्वज्ञानाद्वारे तेथे आहेत.

184 आता, आपल्याला ठाऊक नाही. तुम्ही म्हणाल, "भाऊ ब्रॅन्हम, तुम्ही सिध्द करु शकता की तुम्ही तेथे आहत?" नाही, महाशय. मी ते सिध्द करु शकत नाही. परमेश्वर माझा उपयोग आणखी कशासाठी एक उपकरण म्हणून करु शकतो, आणि तुमचाही तशाच प्रकारे उपयोग करु शकतो. परंतु मी विश्वास ठेवतो आणि माझे विश्वासाद्वारे, तारण झाले आहे. माझे तारण ज्ञानाद्वारे नाही; परंतु विश्वासाद्वारे झाले आहे! त्या प्रकारे तुमचे तारण झाले आहे. त्याच रितीने आम्हा सर्वांचे तारण झाले आहे.

185 परंतु, लक्षात ठेवा, परमेश्वर अनंत आहे. तुम्ही ह्यावर विश्वास करता काय? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] अनंत! अच्छा, तो अनंत असल्याकारणाने ते त्याला बनवते...आणि, मग, तो सर्वज्ञानी आहे. तुम्ही ह्यावर विश्वास ठेवता? ["आमेन."] *सर्वज्ञानी* म्हणजे, "त्याला सर्व गोष्टी माहीत आहे." तो—तो सर्वज्ञानी असू शकत नाही अनंत असल्याशिवाय. पाहा तेथे असे कधीच काहीही नव्हते जे त्याला ठाऊक नव्हते. त्याला तो प्रत्येक मच्छर माहीत आहे जो कधीतरी ह्या पृथ्वीवर होता, आणि त्याला ठाऊक आहे की कितीवेळा तो आपले डोळे मिचकावील आणि किती मेण तो बनवील, किती मेण ते सर्व मिळून बनवतील. त्याला तो प्रत्येक श्वास माहीत आहे. जो तुम्ही घेणार आहात, आणि किती खोल तो तुमच्या फुप्फुसात जाईल. तो अनंत आहे.

186 आता, जर तो अनंत आहे, ते त्याला सर्वज्ञानी बनवते. काय हे बरोबर आहे? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] आणि जर तो सर्वज्ञानी आहे, तर ते त्याला सर्वव्यापी बनवते, कारण तो मिनीट, तास, समय, एका सेकंदाच्या पंचावन हजार भागांनाही जाणतो, की केव्हा ते घडणार आहे. समजले? काय आता, तुम्ही हा विचार समजत आहात? काय आता, तुम्ही हा विचार समजत आहात? ["आमेन."] तर मग, तो सर्व गोष्टी जाणतो. आणि ह्याच कारणामुळे त्याच्याकडे सर्व सामर्थ्य आहे, सर्व गोष्टी जाणतो, आणि तो सर्व गोष्टी करु शकतो.

187 आता आपण पाहुया. आता "आणि सर्व लेकरे ज्यांना परमेश्वराने...प्रत्येकजण ज्यास देवाने..." आता, लक्षात ठेवा, बायबल सांगते...

188 आता आपल्याला माहीत आहे की येशूचा वध सुमारे 30 A.D. मध्ये झाला? काय हे बरोबर आहे? मला वाटते तो 30 A. D. च्या लगभग मध्यात झाला होता.

189 आता, परंतु बायबल सांगते की जगाच्या निर्मितीअगोदर तो वधला गेला होता. आणि तुमचे नाव, जेव्हा कोकऱ्याचे पुस्तक...जेव्हा कोकरा हे पुस्तक सोडविण्याठी वधला गेला...आता येथे एक महान गोष्ट आहे. ते कदाचित स्फुर्ती देऊ शकते. पाहा, जेव्हा—जेव्हा—जेव्हा तो कोकरा...आता लक्षात ठेवा, बायबल सांगते कोकऱ्याच्या जीवनाचे पुस्तक युगाच्या स्थापनेअगोदर लिहीण्यात आले होते. आणि तुमचे नाव त्यात घालण्यात आले, ते त्या पुस्तकात होते. जेव्हा कोकरा जगाच्या स्थापनेअगोदर, जे प्रत्येक नाव ह्या पुस्तकात लिहीले होते, त्यांना सोडविण्यासाठी वधला होता. समजले? तुम्हाला आता ते समजले काय?

190 पाहा, तेथे कुठलीही गोष्ट व्यवस्थेच्या बाहेर नाही. पाहा, हे परमेश्वराच्या मोठ्या समयसुचकाप्रमाणे कार्य करीत आहे. ते घड्याळाप्रमाणे कार्य करीत आहे. तुमचे नाव तेथे

जगाच्या स्थापने अगोदर लिहीले होते, जेव्हा तो कोकरा त्यांना सोडविण्याकरिता वधला होता, ज्यांची नावे त्या पुस्तकात होती. आणि आता तो पुढे येतो आणि ते पुस्तक घेतो, ह्यासाठी की त्याने त्याच्या मुक्तीचा दावा करावा.

मी ह्या गोष्टीवर येथे सुरुवात करु इच्छित नाही, आपण आज दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर देऊ शकणार नाही. ठीक आहे. पुढचा प्रश्नः

**185. काय नरक आणि ते सरोवर जे अग्नीने व गंधकाने जळत आहे, एकच आहे?**

191 नाही. मला वाटते, की बायबलमध्ये नरकाचा अनुवाद आहे...आता येथे विद्वान बसलेले आहे, आणि मी त्याचा आदर करु इच्छितो. आपले भाऊ इवरसन येथे बसलेले आहे, आणि भाऊ वाइल, आणि पुष्कळसे हे बंधुजन, जे खरोखरी पवित्र शास्त्राचे ज्ञानी आहेत. अनुवादीत शब्द, *अधोलोक*, म्हणजे "कबर." ते बरोबर आहे. तो कबरेसाठी ग्रीक शब्द आहे. परंतु अग्नीचे सरोवर काही वेगळे आहे. कारण, प्रकटीकरणामध्ये, "सगळे, अधोलोक आणि सर्व अग्नीच्या सरोवरात टाकले गेले." समजले? ठीक आहे. आता ते पाहुया.

**186. काय असे नाही, अग्नीचे सरोवर, आणि नरक सांकालिक आहे?**

192 नाही, महाशय नाही, महाशय. कुठलीही गोष्टी जी निर्माण केलेली आहे ती सार्वकालिक नाही. नाही. प्रत्येक गोष्ट ज्याची निर्मिती केली आहे...हेच कारण आहे की सार्वकालिक नरक असू शकत नाही. जर कोणी तुम्हाला कधी असे सांगत असेल की तुला सार्वकालिक नरकात जाळतील, तर त्यासाठी वचन पाहीजे. समजले? सार्वकालिक नरक अशी कोणती गोष्ट नाही.

193 नरकाची निर्मिती तर सैतान आणि त्याचे दूत, ख्रिस्तविरोधी आणि त्याचे लोक ह्यांसाठी होती, तो सैतान होता, देहधारी सैतान तो तर त्याचा सर्वनाश करण्यासाठी होता आणि काहीही जे होते...काहीही...

194 केवळ एकच वस्तु, सर्व गोष्टी, संपूर्ण जग आणि अन्य सर्वगोष्टीत, केवळ एकच गोष्ट अनंत आहे, आणि तो परमेश्वर आहे. तेथे अणू किंवा इलेक्ट्रॉन असण्याअगोदर किंवा वैश्विक प्रकाश, इलेक्ट्रॉन किंवा काहीही असण्याअगोदर, तो परमेश्वर होता. तो निर्माणकर्ता आहे.

195 आणि केवळ एकच मार्ग आहे की तुम्ही अनंत असू शकता, तो म्हणजे अनंत जीवनाचा स्विकार करणे. मला वाटते. तो ग्रीक शब्द *झोई* आहे. काय ते बरोबर आहे? झोई. झोई. आणि मग ते—ते जीवन, जे परमेश्वराने तुम्हाला प्रदान केले आहे. जसे एक पिता, तुमचा पिता, त्याचे जीवन तुमच्या आईबरोबर विवाहाच्या शपथेद्वारे, प्रदान करतो, त्याद्वारे आनंद विभागल्यामुळे (मला समजून घ्या) तो आपल्या जीवनाचा भाग आपल्या पुत्राला देतो. आणि तशाच प्रकारे परमेश्वर करतो. आपला भाग आपल्या पुत्राला देतो. समजले? आणि तेव्हा तुम्ही त्याचा भाग बनता, जे झोई आहे, परमेश्वराचे स्वतःचे जीवन. "मी त्यांना सार्वकालिक जीवन देतो."

196 "त्यांना शेवटच्या दिवशी उठवीन." केवळ तीच एक गोष्ट आहे जी—जी...तुम्हाला अनंत जीवन मिळते. आणि त्या अनंत जीवनाला तिचे शरीर ठाऊक आहे, आणि त्याला बाहेर आले पाहीजे. होऊ शकते की ते...तीच्यासाठी हे अशक्य की ते तेथेच पडून राहील. जसा ख्रिस्ताचा आत्मा त्या देहावर अवतीभवती फिरत असतो, परमेश्वराचा आत्मा ख्रिस्तावर, त्या महान दिवशी, त्याला ठाऊक आहे, तो पुन्हा उठेल; ठीक तसेच पवित्र जन आपल्या शरीरामध्ये आहेत.

197 आता लक्षात ठेवा. येशू, जेव्हा तो मेला, तो अधोलोकात गेला. कारण तो पापविरोधक असल्यामुळे त्याला तेथे जावे लागले. “आणि त्याने अधोलोकातील आत्म्यांना घोषणा केली, ज्यांनी नोहाच्या दिवसात, परीक्षा होत असता पश्चाताप केला नाही.” ते बरोबर आहे? तो अधोलोकात गेला आणि आत्म्यांना घोषणा केली परमेश्वराकडे त्या विभक्त प्राणांसाठी. *मृत्यु* म्हणजे “वेगळे होणे.” आणि ते परमेश्वरापासून वेगळे झाले होते, कधीच परत जाऊ शकत नव्हते. आणि येशू ती साक्ष देण्यास गेला की तो तोच आहे ज्याविषयी सांगण्यात आले होते. त्या—त्या स्त्रीचे बीज.

198 सर्पाचा वंश, पाहा, त्या सर्पाच्या बीजाने काय केले? शेवटी तो ख्रिस्तविरोधक; ‘मृत्यु’ अर्थात विभक्त होणे, त्या स्वरुपात लाल घोड्यावर येतो. शेवटी स्त्रीचा वंश, जीवन अर्थात येशू ख्रिस्त श्वेत घोड्यावर येतो. समजले? हे काय आहे? एक दुसऱ्या विरुध्द, सर्पाचे बीज हे स्त्रीच्या बीजाविरुध्द. तुम्हाला हे कळले काय? आपण ह्या विषयावर अजून थोडा वेळ राहू शकतो. काय तसे करणे योग्य नाही काय? परंतु आपण येऊ या आणि ह्या ठिकाणी थांबूया.

**187. भाऊ ब्रॅन्हम, पहिल्या घोड्याचा स्वार पहिला शिक्का हा दुसऱ्या थेस्सलनीकाकरांस मधील “त्या पापाच्या पुरुषाचे प्रगट होणे याला पूर्ण करतो काय”?**

199 होय. ते खरे आहे. ते त्याला पुर्ण करते. हा एक सोपा प्रश्न आहे. तो त्याला पूर्ण करतो. तो पापाचा पुरुष आहे. तोच व्यक्ती जो फक्त वेगवेगळ्या अवस्थेत तितपर्यंत स्वार होत राहतो, जीतपर्यंत फिकट घोडा ज्याला “मृत्यु” म्हटले आहे त्याच्यावर स्वार होत नाही. ख्रिस्त हा न्यायीपण, पवित्रीकरण याद्वारे पांढऱ्या घोड्यावर स्वार होऊन येतो. आणि तोच तो जीवन आहे. तुम्ही पाहा.

**188. त्या नविन जन्म प्राप्त केलेल्या विश्वासणाऱ्यांचे काय होते, जे वेगवेगळ्या सांप्रदायिक मंडळ्यांत आहेत परंतु ख्रिस्ताच्या नवरीत त्यांचा समावेश नाही, त्यांचे काय होईल?**

200 ठीक आहे, मला वाटते की मी याविषयी थोड्या वेळेपूर्वी स्पष्ट केले आहे. समजले? ते महासंकटात जातात. ते त्या महासंकटात हुतात्मे होतील. आणि ते हजार वर्षाच्या शेवटी, न्यायासाठी येतील. समजले? कारण बायबल म्हणते बाकी राहिलेले जिवंत... “मृतांपैकी बाकीचे लोक, ती हजार वर्षे पूर्ण होईपर्यंत जिवंत झाले नाहीत.” मग तेथे एक पुनरुत्थान येते आणि मग तेथे दोघे येतात. न्यायी व अधर्मी, आणि त्यांचा न्याय ख्रिस्ताद्वारे आणि नवरीद्वारे केला जातो. तो आपल्या हजारोंहजार पवित्र लोकांसह पृथ्वीवर येतो, त्याच्या वधुसह. काय हे बरोबर आहे ना?

201 न्यायाचे सिंहासन मांडले होते. पुस्तके उघडली होती, पुस्तके उघडली होती आणि एक दुसरे पुस्तक उघडले, जे जीवनाचे पुस्तक होते. तेथे तो शेरडांपासून मेंढरे वेगळी करतो. हे खरे आहे ना? त्याचा वधुशी काही एक संबंध नाहीए. तो तेथे न्यायासाठी आपल्या राणीबरोबर उभा होतो...राणी आणि राजा दोघे एकत्र उभे होते. “तो आपल्या पवित्र जनांसह येतो. हजारोंहजार त्याची सेवा करित होते.” तो आपल्या पत्नीसह येतो. मग न्यायासन मांडण्यात आले, आणि मग मेंढरे ही शेरड्यांतून वेगळी करण्यात आली. आठवण करा, एका रात्री मी त्यावरचे मनन घेऊन आलो होतो, यासाठी की तुम्हाला ते समजावे, एका गुराख्याचे मनन? समजले? तुम्ही त्याच स्थितीत आहा.

202 नाही, ते ज्या मंडळ्या त्या—त्या सांप्रदायिक मंडळ्यामध्ये आहेत, ते खरे विश्वासी आहेत ज्यांनी संदेशाचा स्विकार केलेला आहे; आणि ते त्याला कधीच पाहणार नाहीत. त्याचा त्यांना कधीच प्रचार केला नाही. आणि त्या मिश्र समुदायात ज्यांना प्रचार करण्यात

येईल, ते त्यांच्या डोक्यावरुन जाईल जर त्यांची नावे कोकऱ्याच्या जीवनी पुस्तकात नसतील तर. होय, परंतु ते चांगले लोक असतील.

203 आणि ते पुन्हा उठतील आणि त्यांचा न्याय होईल, आणि त्यांचा न्याय त्या लोकांकडून होईल ज्यांनी त्यांना त्याविषयी प्रचार केला होता. "काय तुम्हाला हे माहीत नाही की पवित्र जन पृथ्वीचा न्याय करतील?" पाहा? ते त्यांना प्रचार करतील. त्याविषयी त्या लोकांकडून प्रचार होईल ज्यांनी त्यांना या संदेशाविषयी साक्ष दिली होती, की "तुम्ही तिच्यांतून बाहेर निघून या!" पाहा? मी आशा करितो की ही गोष्ट स्पष्ट केली आहे. माझ्याकडे येथे खूप प्रश्न आहेत, की...

**189. भाऊ ब्रॅन्हम, काय सातवा दूत, जो एलियाच्या आत्म्याने आहे, तो तोच व्यक्ती आहे की, ज्याला रॅपचर झाल्यानंतर साडेतीन वर्षाकरिता एक लाख चव्वेचाळीस हजार यहुदी लोकांकडे पाठविले जाते? आमच्यांतील काही जण याबाबत द्विधा स्थितीत आहेत.**

204 नाहीए. तो तो व्यक्ती नाहीए. पाहा, हे तर दोन वेगवेगळे व्यक्ती आहेत. अलीशा जो एलीयाच्या रुपात आला होता तो एलीया नव्हता. आणि एलियाच्या आत्मा ज्या मनुष्यावर आला होता तो योहान बाप्तिस्मा करणारा एलीया नव्हता. आणि सातवा संदेशवाहक दूत जो लवदिकीया युगाच्या अंत समयी येईल, तो वास्तविक एलीया नसणार. तो एक परराष्ट्रीय व्यक्ती असेल आपल्या लोकांसाठी.

205 त्यानंतर जो एलीया येईल किंवा एलीयाचा आत्मा येईल...ते तर तेथल्या लोकांसाठी होईल, हे तर यहुदी लोकांसाठी होईल. कारण त्यांना त्यांच्या लोकांसाठी पाठविले गेले आहे. हे माझे प्रकटीकरण आहे. ह्या कारणांमुळे मी...की टॉमी ऑसबर्नशी...जेव्हा आम्ही त्या वेळी याविषयी बोललो होतो, जेव्हा टॉमी आणि मी याविषयी बोललो होतो. मी कधी ह्याविषयी जाणत नव्हतो. मी तर फक्त आजाऱ्यांसाठी प्रार्थना करीत होतो.

206 मी तेथे वरती आलो. आणि तेथे एक स्त्री होती जी फोर्ट वायने गॉस्पल टॅबरनॅकलवरुन आली होती, परदेशात मिशनरीचे काम ती करीत होती. तिचा स्तन *एवढा* मोठा होता, तो कर्करोगाने खाऊन टाकला होता. आणि ती स्त्री तेथे घरात राहत होती. जेथे आम्ही पूर्वी राहत होतो. आणि मी त्या प्रिय बहिणीसाठी प्रार्थना केली. आणि ती बरी झाली आणि पूर्ववतः आपल्या कार्यास लागली. आणि जेव्हा...ती आफ्रिकेतून आली. आणि तिने मिशनरीच्या कामासंबंधी एक छोटेसे पुस्तक सोडून आली.

207 मला—मला वाटले, "ठीक आहे, सुवार्तिक चांगले असतात." आणि मी...मी मिशनरींच्या विषयी कधी अधिक विचार केला नव्हता. आणि म्हणून मी विचार केला, "ठीक आहे, ते तर तेथे बाहेर परमेश्वराचे एक कार्यालय आहे. म्हणून ते...माझे ठिकाण तर येथे आहे—आठवी पेन स्ट्रीटवर आहे." म्हणून मी जेवढी चांगलीच सेवकाई करु शकत होतो तेवढी चांगली सेवकाई करीत होतो.

208 परंतु एके दिवशी जेव्हा मी बसून अभ्यास करीत होतो, तेव्हा मी ते पुस्तक उचलले. आणि त्यामध्ये निग्रोजातीच्या—च्या एक वृध्द पित्याचे चित्र होते, आणि त्याची कडा एका सफेद रंगाच्या केसाची होती. आणि त्याच्या खाली ह्याप्रकारे लिहीले होते. "गोरा मनुष्य, गोरा मनुष्य, तुमचा पिता कुठे आहे? पाहा, मी आता म्हातारा आणि मनाने निरस झालो आहे, आणि मला फार चांगले असे समजत नाही. मी जेव्हा तरुण होतो तेव्हा जर येशूला ओळखले असते मी त्याला माझ्या लोकांकडे आणले असते." ठिक आहे, मी ते वाचले.

209 आणि कोणीतरी मला सांगत राहीले होते, “हे पुन्हा वाच. हे पुन्हा वाच.” मी वाचत राहीलो. ओह, तुम्ही ते कितीवेळा वाचलं असतं. कोणीतरी मला काही म्हणत होते, “ते पुन्हा पुन्हा वाच. त्याच्यामध्ये काहीतरी आहे.”

210 हे तर बिलकुल तसेच उडले होते जसे तेव्हा घडले होते, जेव्हा मी त्यादिवशी ग्रीन मीलमध्ये होतो. जेव्हा मी त्या गुहेतून बाहेर निघून आलो होतो. मी हे समजू शकत नव्हतो, कि लोक कसे काय अन्य भाषेत बोलू शकतात आणि ते जोरजोरात ओरडू शकतात. आणि ते सुद्धा खऱ्या पवित्र आत्म्याद्वारेच आणि तरीही ते ख्रिस्त विरोधक होऊ शकतात. अन्य भाषेत बोलू शकतात ते खऱ्या पवित्र आत्म्याद्वारेच अन्य भाषेत बोलू शकतात. आणि तरीही ते एक दुष्ट असू शकतात. हे खरे आहे. मी ते तुम्हाला सिध्द करुन दाखवीन. होय, खरेच. आणि मग मला आढळले…जेव्हा ते तेथे उभे राहीले होते.

211 शेवटी अन्य भाषा, बोलणे हा काही पवित्र आत्मा मिळाल्याचा पुरावा असू शकत नाही. हे पवित्र आत्म्याच्या एका वरदानापैकी एक वरदान आहे. सैतान प्रत्येक त्या गोष्टींची जी परमेश्वराकडे आहे त्याची नक्कल करतो, तो दैवी आरोग्य व तसेच त्याप्रमाणे इतर गोष्टींची ही नक्कल करु शकतो.

त्याने म्हटले, “त्या दिवशी पुष्कळ जण माझ्याजवळ येऊन म्हणतील, ‘हे प्रभू, काय मी दुष्ट आत्म्यांना बाहेर काढले नाही का? काय मी केले नाही…’” हे तर फक्त शुभवर्तमानाचा प्रसार करणे होय. “‘काय मी तुझ्या नावाने मोठी मोठी सामर्थ्यवान कामे आणि इतर दुसरे कामे केली नाहीत का?’ आणि मी म्हणेन, ‘हे सर्व अन्याय करणाऱ्यांनो, माझ्यापुढून निघुन जा. मला तुमची कधीच ओळख नव्हती.’”

212 बायबल म्हणते की, “नितीमानांवर व अनितीमानांवर तो सारखाच पाऊस पाडतो.” आणि ते काटेरी झुडूप जे गव्हाच्या शेतात उभे असते. त्या पावसाच्या पाण्याने जे त्याच्यावर पडते तो सुध्दा आनंदीत होऊ शकतो आणि ओरडू शकतो जो पाऊस त्या दोघांवर पाठविला जातो. “परंतु तुम्ही त्यांना त्यांच्या फळावरुन ओळखाल.” ते छोटे काटेरी झुडूप जे तेथे उभे राहू शकते आणि ते एवढे आनंदीत होऊ शकते जेवढे होऊ शकते, आणि ते एवढे ओरडू शकते जेवढे ते ओरडू शकेल.

213 तुम्हीही त्याच स्थितीत आहा. यासाठी की ते ओरडू शकतात, अन्य बाषेत बोलू शकतात आणि सगळ्यांची नक्कल करु शकतात जे ते इच्छितात, त्या दिवशी त्यांना “अनाचार करणारे” म्हटले जावे.

214 जसे मी तुम्हाला थोड्या वेळेपूर्वी म्हटले होते, तुम्ही लक्ष पूर्वक ऐका मी काय म्हणतोय! तुम्ही ध्यान देऊन ऐका. तुम्ही आपल्या आत पाहा, वचनाद्वारे स्वतःला पारखा आणि समजा तुम्ही कुठे आहात.

215 तुम्ही स्त्रियां, ज्यांनी आपले केस तोकडे केले आहेत, तुम्ही आपल्या केसांना वाढू द्या. जे तुम्ही तोकडे तोकडे कपडे घालत आहा, तुम्ही ते वापरणे बंद करा. स्त्रीसारखे आचरण ठेवा. तुम्ही पुरुषांनो, जे तुम्ही अजूनही सिगारेट पित आहात आणि पाण्याच्या डोहाकडे जे धावता, बंद करा. मी याची काळजी करीत नाही की तुम्ही किती खोटा आव आणून बोलून दाखविता. जर तुम्ही अजूनही त्या संस्थेला पकडून आहात आणि म्हणत असाल “*हेच* ते आहे, आणि *हेच* ते आहे,” तुम्ही थांबविणे हे उचित होईल. तुम्ही स्वतःला आत पारखा आणि देवाच्या वचनाद्वारे स्वपरिक्षण करावे. आम्ही बाहेर निघत आहोत…

216 आम्ही तर असे तोकडे केलेले केस आणि या सर्व गोष्टीपेक्षा वरचे जीवन जगायला हवे. ह्या समयी जे युग आहे, ते असे आहे की आम्ही कशामध्ये तरी पुनः आलो आहोत,

की जेव्हा देव त्या गुप्त गोष्टींना ज्या जगाच्या स्थापनेपूर्वी पुस्तकात ठेवल्या होत्या त्याना प्रगट करीत आहे. आणि ज्यांनी ह्या छोट्या गोष्टीत परमेश्वराच्या आज्ञांचे पालन केले आहे, तेच ह्या दुसऱ्या गोष्टींना पकडू शकतील. जर त्यांनी आज्ञांचे पालन केले नसेल, तर ते त्यांच्या डोक्यांवरुन निघून जाईल. एवढे की जशी पूर्व ही पश्चिमेपासून दूर आहे. या गोष्टी त्यांच्यापासून दूर राहतील. हे फक्त...

217 जसा गिदोन आपल्या पुरुषांना वेगळे करीत होता, ते हजारो हजार पुरुष होते. परमेश्वराने म्हटले होते, "ते खूप आहेत, त्यांना पुन्हा वेगळे कर." त्याने त्यांना अजून एक परिक्षा घेण्यास लावले. आणि "त्यांना पुन्हा वेगळे कर." आणि तो त्यांना पुन्हा पुन्हा वेगळे करित राहिला, जीतपर्यंत की ते थोडे मुठभर राहतील. तो म्हणाला, "हाच तो समुह आहे ज्यांच्याद्वारे मी कार्य करु इच्छितो." तेच तंतोतंत घडले.

218 पेंटेकॉस्टल स्त्रिया (ज्या मागे पुढे चालत आहेत.) ज्या तेथे बसल्या आहेत, ऐकत आहेत आणि वचनाद्वारे समजत आहेत की तसे करणे चुकीचे आहे. काय आपण विचार करीता की ते त्याच्या वचनासह जुळवून घेतील? नाही, महाशय. प्रत्येक वर्षी जेव्हा मी तेथून जात असतो, तेव्हा तेथे आखुड केस कापलेल्या स्त्रीयांची संख्या त्याहीपेक्षा अधिक झालेली आढळली जेव्हा मी तेथून जाण्याची सुरुवात केली होती.

219 लोक म्हणतात, "असं काय करायचं आहे...तुम्ही असे केले पाहीजे..." कोणीतरी म्हणाला, "का, भाऊ ब्रॅन्हम लोक तुम्हाला एक संदेष्टा मानतात, तुला संदेष्ट्यासारखा आदर देतात."

आता पाहा, मी नाही म्हणत की मी एक संदेष्टा आहे. कोणी मला असे म्हणताना ऐकलेले नाही. परंतु मी हे म्हणेन, जर—जर तुम्ही तसे केले आहे, जर तुम्ही तसे मानता...

त्याने म्हटले होते, "तुम्ही का लोकांना हे शिकवित नाही पवित्र आत्मा कसा घ्यावा हे, आणि *तो* कसा प्राप्त करावा, आणि कसे महान आत्मिक दाने प्राप्त करावी आणि मंडळीला सहकार्य करावे?"

मी त्यांना कसे बीजगणित शिकवू शकतो, जर ते बाराखडीची मुळाक्षरे शिकण्यास ऐकत नाहीत? हे खरे आहे. तुम्ही या थोड्या थोड्या गोष्टी तरी करा. तुम्ही येथे नम्र व्हा आणि ते पाखडून काढा आणि चांगल्याने सुरुवात करा. आमेन. ठीक आहे.

220 हे सर्व खरं असलं तरी मी कशाविषयी बोलत होतो? आपण पाहूया. माझे म्हणणे विषयांतर करणे नव्हे. पाहा. क्षमा असावी. ठीक आहे. "आमच्यांतील काही जण... आमच्यांतील काही जण दुमतात आहेत. काय एलीया तसाच आहे जसा..." होय, हं—हं, हाच तो प्रश्न होता.

नाही. हा एलिया जो परराष्ट्रीयांकडे येणार आहे, तो परराष्ट्रीय असेल, त्या आत्म्याने अभिषेक पावलेला असेल, कारण देवाने त्याच आत्म्याचा उपयोग आपल्या लोकांना गोंधळाच्या स्थितीतून बाहेर काढण्यासाठी प्रत्येक वेळी वापरला आहे आणि त्या आत्म्याने परमेश्वराची सेवा खूप चांगली केली आहे, म्हणून तो पुन्हा खाली येतो. कारण पाहा...

आता, कारण, जर त्याने उच्च प्रकारचे प्रतिष्ठीत, शिक्षित व्यक्तींचा उपयोग केला असता, तर त्याने त्या प्रकारच्या लोकांनाच पकडले असते.

221 त्याने अशा मनुष्याला आणले ज्याला क्वचितच बाराखडी माहीत असेल, आणि त्याचे शब्द उच्चारणं योग्य रितीने नसेल, आणि अशा सारखे सर्वकाही. आणि तो त्या प्रकारचा व्यक्ती असतो जो जंगलातील काही जुन्या गोष्टी कुठून घेऊन त्या मध्येच

वचनाला घेऊन येतो, आणि पुढे जाऊन ते साध्या मनोवृत्तीच्या लोकांपर्यंत थोपवितो. [भाऊ ब्रॅन्हम एक वेळा आपल्या बोटांनी आवाज करतात—सम्पा.] आणि त्यांना ते त्याप्रमाणे समजते, पाहा, ते त्यांना समजते, जर तो येतो आणि कॉलर...

222 जसे पौलाने म्हटले, "मी तुमच्याकडे शिक्षणाच्या श्रेष्ठतेने आलो असे नाही, परंतु मी तुमच्याकडे पुनरुत्थानाच्या सामर्थ्याने आलो." अरबस्थानात परमेश्वराला त्यातून त्याचे शिक्षण बाहेर काढण्यासाठी साडे तीन वर्षे लागली. मोशेमधून ते बाहेर काढण्यासाठी चाळीस वर्षे लागली—लागली होती. समजले? अशाच स्थितीत तुम्ही आहा. तेच...

मी नाही सांगत की परमेश्वर नाही...आता मी निरक्षरतेला उचलून धरीत नाही, परंतु मी—मी तुम्हाला हे सांगण्याचा प्रयत्न करीत आहे की ते जसे धरत नाही... शिक्षण नाहीए...

223 जगाचे ज्ञान हे विरोधात आहे. शिक्षण हे शुभवर्तमानाच्या कामात सर्वाधिक अडखळण आहे. जर आमच्याकडे शिक्षण नसते तर आमच्याकडे ह्या सर्व मोठ्या सेमेनरीस आणि अशा गोष्टी आमच्याकडे ज्या आहेत त्या नसत्या. ते साधारण–मनोवृत्तीचे लोक असते जे वचन ऐकू शकले असते. परंतु ते फार उच्च शिक्षित आणि अव्यवस्थित झालेले आणि फारच घट्ट झालेले आहेत. ते त्या संस्थेमध्ये एवढे घट्ट झालेले आहेत की ते त्याच्याबरोबर राहू इच्छित आहेत. त्यांच्याविषयी हेच सगळं काही आहे. त्यांनी तो आत्मा ग्रहण केला आहे. काय तुम्ही एका चांगल्या स्त्रीला घेऊन तिचा विवाह कोणत्या नीच पुरुषाबरोबर केला आहे? तो नीच पुरुष एकतर त्या चांगल्या स्त्रीप्रमाणे बनेल किंवा ती स्त्री तशीच नीच बनेल जसा तो पुरुष आहे. समजले? ही गोष्ट खरी आहे.

224 म्हणूनच तो म्हणाला, "त्यांच्यातून बाहेर निघून या, जेव्हा मी स्वर्गरोहण होण्याची तयारी करीत आहे." तुमच्याजवळ तर त्या प्रकारचा एक विश्वास असला पाहीजे जो तुम्हाला ह्यांतून बाहेर काढील.

### 190. दानिएल 9:27 मधील करार एका आठवड्याविषयी कधी पक्का करील?

225 जेव्हा येशू ख्रिस्त या पृथ्वीवर यहुद्यांना प्रचार करीत होता. तेव्हा कराराचा अर्धा भाग तर तेव्हाच पक्का केला होता. तो कधीच परराष्ट्रीयांकडे गेला नव्हता. आणि तो आपल्या शिष्यांना म्हणाला, "परराष्ट्रीयांकडे जाऊ नका." कारण ते केवळ यहुद्यांसाठीच होते. पाहा? आणि त्याने साडेतीन वर्षे प्रचार केला. तो सत्तर सप्तकांचा अर्धा आठवडा होता, जसे दानिएलाने म्हटले होते की तो ते करील.

226 आता ह्याचे स्मरण ठेवा, तो यहुदी लोकांसमोर दृढपणे शाबित केला गेला होता. परंतु त्यांचे डोळे आंधळे झाले होते, यासाठी की त्यांच्या आत परराष्ट्रीयांचा लाभ आणला जावा. काय तुम्ही संपूर्ण योजना पाहू शकत नाही? आणि त्याने स्वतःला एक संदेष्टा म्हणून सिध्द केले होते. त्याने तेच तंतोतंत केले होते जे एक संदेष्टा करीत असतो. त्याने त्यांना एका संदेष्टाचे चिन्ह दाखविले होते. "जे तुमच्या शास्त्रलेखात सांगितले आहे, 'जर कोणी व्यक्ती म्हणत असेल, की तो आत्मिक व्यक्ती आहे किंवा संदेष्टा आहे, तर तो काय म्हणतो त्यावर लक्ष लावा. आणि जर ते घडते, आणि पुन्हा पुन्हा ते होत राहते जे तो सांगतो.'"

227 जसे तुम्ही बायबलमध्ये पाहा, असे म्हटले आहे, "ठोका, म्हणजे तुमच्यासाठी उघडले जाईल, शोधा म्हणजे सापडेल, मागा, म्हणजे दिले जाईल." आता, जर तुम्ही लक्ष द्याल, तर हो "ठोठावणे" आहे. हे ठोठावणे सतत आहे. [भाऊ ब्रॅन्हम व्यासपीठावर ठोठावण्यास सरुवात करतात 23 वेळा—सम्पा.] तुम्ही तेथेच उभे राहा. जसा तो अन्यायी न्यायाधीश त्या स्त्रीला उत्तर देत नव्हता. ती फक्त त्याचे द्वार ठोठावत राहिली.

म्हणाली, "मी तुझ्या हाती आहे." [भाऊ ब्रॅन्हम व्यापीठावर ठोठावणे बंद करतात.] तुम्ही शोधु इच्छित नाही. परंतु म्हणता, "प्रभू मला *असे* झालेले आवडेल. आमेन." ते तसे नाहीए. तुम्ही तेथे तितपर्यंत थांबा, जीतपर्यंत ते तुम्हाला मिळत नाही. तुम्हाला हे कळते की ते तुम्हाला मिळणार. म्हणून त्याने त्याचे अभिवचन दिले आहे. शेवटी तुम्ही तेथे तितपर्यंत थांबून राहा, जीतपर्यंत की तुम्ही ते प्राप्त करीत नाही. समजले?

आता पाहा, सत्तरव्या आठवड्याच्या शेवटचा भाग त्याचा शेवटचा भाग मंडळीचे स्वर्गरोहण झाल्यानंतरचा काळ हा महासंकटाचा काळ आहे. तेव्हा येथे साडेतीन वर्ष आहेत आणि ते प्रकटीकरण 11 अध्यायातील दोन संदेष्टे म्हणजे मोशे आणि एलिया ह्यांच्याद्वारे पक्के केले जाईल. आता या आणि पाहूया की हा प्रश्न काय आहे:

**191. जर तुम्ही त्याच्या निवडलेल्यातील एक आहात, तर काय तुम्ही नवरीमध्ये वरती जाल काय?** (होय, ह–ह, हम, होय महाशय, हा खुपच सोपा प्रश्न आहे)

**192. भाऊ ब्रॅन्हम, तुमचा सांगण्याचा अर्थ ते सात हजार होते ज्यांनी बलामपुढे गुडघे टेकले नाहीत की सातशे होते?**

228 सात हजार, मला म्हणायचे होते. पाहा. याविषयी मला माफ करा. ते फक्त...

जसे मी काही वेळेपूर्वी म्हटले होते, काय आपण माझे येथे उभे राहण्यावर लक्ष दिले होते, मी म्हणालो, "आणि—आणि त्या कोकऱ्याला पाहून त्यांना साक्ष दिली...?" पाहा? समजले? तो कोकरा पृथ्वीवर होता. समजले? "परमेश्वराचा आत्मा कोकऱ्यावर उतरताना पाहून त्याने साक्ष दिली."

229 आता पाहा, तेथे असे म्हटले आहे, "हा माझा प्रिय पुत्र आहे, ज्यामध्ये मी संतुष्ट आहे." तुम्ही समजले? आता पाहा, हे ग्रीक भाषेच्या मूळ रुपात लिहीले गेले होते, जेथे क्रियापद हे क्रिया विशेषणापूर्वी लावले गेले आहे असे दिसते. परंतु तुम्ही येथे लक्ष द्या, त्याला तसे वास्तविक असले पाहीजे. आता तुम्ही फक्त वचन घेऊन ते पाहा. संत याकोबाच्या भाषांतरात बायबल येथे असे म्हणते, "हा माझा परमप्रिय पुत्र आहे, ज्याच्यामध्ये राहण्यास मी संतुष्ट आहे." पाहा. तुम्ही तर त्या शब्दांना उलटसुलट फिरवीत आहा. पाहा, समजले? हा माझा परमप्रिय पुत्र आहे, ज्यामध्ये वास करण्यास मी फार आनंदीत आहे. पाहा, आता पाहा, आज आम्ही याला माझ्या प्रकारे सांगु, "हा माझा परमप्रिय पुत्र आहे. ज्याच्यामध्ये वास करण्यासाठी मी फार आनंदीत आहे." पाहा, ह्या दोघांमध्ये सुध्दा एकाच प्रकारचे शब्द आहेत. फक्त त्यांना इकडेतिकडे उलटसुलट केले आहे. समजले?

230 आता, पाहा, होय, माझे म्हणणे...कृपया माफ करा. मी...आणि—आणि बंधुजनांनो, तुम्ही जे तेथे टेपवर ऐकत आहा, तुम्ही हे ऐका. माझे येथे ह्या प्रकारे सांगण्याचे तात्पर्य नव्हते. मी—मी—मी शुभवर्तमानाचा एक सेवक आहे. जसे मी ह्या विषयी खूपवेळा प्रचार केला आहे. मी जाणत होतो की हे सात हजार होते. फक्त झाले असे की मी म्हणताना ते सातशे बोलून गेलो. माझे म्हणणे सातशे नव्हते. माझे म्हणणे, तुम्ही...मी ते शास्त्रभागांतून वाचले नव्हते. मी बोलताना माझ्या मनात ते आले आणि मी सात हजार ऐवजी सातशे बोलून गेलो. मी अनेक वेळा चुका केल्या आहेत. मी—मी निश्चितच निरुपयोगी प्रतिकृती आहे, म्हणून तुम्ही मला क्षमा करा. समजले? माझे तसे करण्याचा काही उद्देश नव्हता.

**193. काय ख्रिस्ताची नवरी आणि ख्रिस्ताचे शरीर एकच आहेत?**

231 होय, महाशय! समजले? आता येथे, आता पाहा, मला त्यावर प्रचार करण्यास सरुवात करण्याची गरज नाही. कारण मी त्यावर...एक प्रचार या विषयावर दिला आहे. समजले? परंतु मी आता तसे करणार नाही. परंतु मला तुम्हाला दाखवायचे आहे. जेव्हा देवाने आदामाला त्याच्या बाजूंतून काढलेली नवरी दिली, तो म्हणाला, “ही माझ्या हाडांतील हाड आहे, आणि माझ्या मासांतील मांस.” काय हे योग्य आहे ना?

232 जेव्हा देवाने ख्रिस्ताला त्याची नवरी दिली, आत्म्याने देह म्हणजे नवरी दिली, त्याला मारुन टाकण्यात आले होते, त्याच्या हृदयाच्या खाली बाजूला छेदण्यात आले आणि पाणी, रक्त आणि आत्मा बाहेर आला; तेच “त्याच्या मासांतील मांस, आणि हाडांतील हाड” बनले गेले. आम्ही त्याच्या हाडाचे आणि मांसाचे आहो. नवरी ही तंतोतंत ख्रिस्ताच्या शरीराची आणि हाडाची असेल. ते असतील...अशीच त्याची नवरी आहे.

### 194. काय ख्रिस्ताच्या नवरीचे असेल...काय ख्रिस्ताच्या नवरीची स्वर्गरोहणापूर्वी काही सेवकाई असेल?

233 निश्चितच. तेच आता आहे जे चालू आहे. पाहा, ख्रिस्ताची नवरी. खचीतच हाच या समयाचा संदेश आहे. पाहा. ख्रिस्ताची नवरी. खचीतच, त्यामध्ये प्रेषित, संदेष्टे, शिक्षक, सुवार्तिक आणि पाळक हे समाविष्ट आहेत. हे बरोबर आहे ना? [मंडळी म्हणते, “आमेन”—संपा.] हीच ख्रिस्ताची नवरी आहे. खरेच तिची सेवकाई आहे. तिची एक महान सेवकाई आहे, तिची या समयाची सेवकाई आहे. ती फार नम्र असेल.

234 आता आठवण ठेवा. येथे पहिले किती जण होते, जेव्हा मी...गेल्या रविवारी मी... पाहा, आठवण ठेवा, की मी कशावर प्रचार केला होता? लीनता. ओह, तुम्ही ते विसरु नका. मी येथे एक मिनीटभर थांबू इच्छितो, त्याविषयी पुन्हा चेतावणी देण्यासाठी. लक्षात ठेवा, जेव्हा परमेश्वर काहीतरी महान घडणार याविषयी भविष्यवाणी करतो लोक आपल्या ज्ञानाद्वारे त्या गोष्टीपासून इतके अधिक दूर असे पाहत राहतात की त्या गोष्टींना ते मुकून बसतात. जेव्हा देव म्हणतो काहीतरी महान आहे, तेव्हा जग त्यावर हसते. “तो अज्ञानी आणि मूर्खांचा समूह!” हे खरे आहे.

परंतु जेव्हा महान जग, आणि महान उच्च चर्च म्हणते, “मुला, हे गौरवयुक्त आहे!” देव म्हणतो, “ते तर अज्ञानी मूर्खांचा समुह आहे!” म्हणून पाहा, तुम्ही ते पाहीले पाहीजे माझे म्हणणे असे नाही की ते त्याप्रमाणेच असेलच, कदाचित तंतोतंत त्याचप्रमाणे, परंतु ते तसेच आहे.

235 पाहा! त्यांची एक महान, पवित्र परंपरावादी चर्च म्हणत असे. “आम्ही वचन समजतो, आमच्या जवळ शिक्षण संस्था आहेत, आमच्याजवळ सेमेनरिस आहेत. आमच्याकडील व्यक्ती फार शिक्षित आहेत. आम्ही आम्ही शेकडोंवर्षांपासून यहोवाशी विश्वासयुक्त राहीलेले आहोत. आम्ही एक मंडळी आहोत. आम्ही एक सभास्थान आहोत. आमच्याकडे मंडळ्याची परिषद आहे. दोघे परुशी आणि सदुकी आणि सर्व सांप्रदायिक मंडळ्या एकत्र मिळतो,” जसे आम्ही एकत्र होत आहोत. समजले? “आम्ही सर्व एक आहो, मंडळीची परिषद. आम्ही येथे फार प्रतिष्ठित आहो. आम्ही त्या शास्त्रलेखाविषयी जाणतो. कोणी छोटा, अशिक्षित अज्ञानी व्यक्ती जो त्या नदीवर आहे. तो आहे तरी काय, त्याची दाढी त्याच्या चेहऱ्यावर झुलत आहे आणि तो मेंढऱ्याचे कातडे पांघरलेला आहे, तो आम्हाला काय सांगायला लागला आहे?” निश्चितच, त्यांनी त्याचे ऐकले नाही.

236 परंतु बायबल म्हणते, मलाखी चौथ्या अध्यायात...किंवा तिसऱ्या अध्यायात, पाहा, “मजपुढे मार्ग तयार करण्यासाठी मी आपला निरोप्या पाठवितो.” सातशेवीस वर्षापूर्वी योहान...महान संदेष्टा यशयाने तेथे उभे राहून सांगितले होते, “रानात ओरडणाऱ्याची

वाणी होईल, 'प्रभूसाठी राजमार्ग तयार करा, आणि त्याचा रस्ता सरळ करा.'" हे खरे आहे. आणि म्हणाला...आणि...ओह, त्यांतील पुष्कळांनी याविषयी म्हटले होते. म्हणाले होते, "प्रत्येक उंच जागा सखल होईल, वाटा सपाट होईल."

237 ओह, त्यांनी म्हटले, "असे होईल की...जेव्हा तो व्यक्ती येईल, तो आपल्या बोटांनी इशारा करील. आणि तो डोंगरांना ढळवून टाकील. आणि ओह जे सगळी ठीकाणे जी सपाट आहेत. आणि खोरे हे सखल होतील. मग सर्व, जे सर्व डोंगर व टेकडी आहे. ती सखल होईल. भावा, आम्ही येथे चारही बाजूला सर्व शेतात धान्य पेरु. आणि ओह, जेव्हा हा व्यक्ती येईल, तेव्हा आम्ही मोठी—मोठी कार्ये करु." समजले?

238 ते परमेश्वराकडून ही आशा करीत होते की तो डोंगर, टेकड्यांचे स्थान सखल करील, आणि दोन्ही मार्गांना जोडणारा रस्ता सखल बनवून म्हणेल, "माझ्या मसीहाच्या निरोप्या तू खाली उतरुन ये." आणि मग तो जाताच, त्यांनी परत ते ओढून घेतले आणि त्याची सेवकाई समाप्त झाली. पुन्हा त्यांनी ते ओढून बंद केले आणि सेमेनरीच्या ते तसेच ठेवले. आणि म्हणाले, "ठीक आहे, माझ्या प्रिय पुत्रा, चालत ये आणि सांग त्यांना." पाहा, माझ्या परमेश्वरा!

239 आणि मग जेव्हा तो त्यांच्याकडे आला, तेव्हा काय झाले होते? येथे एक मनुष्य येतो जो त्यांच्या कोणत्याही शिक्षण संस्थेच्या विषयी जाणत नव्हता. त्याच्याकडे सहभागिता—पत्र सुध्दा नव्हते. ओह! त्याच्याजवळ काही विश्वास पत्र सुध्दा नव्हते. नाही. कोणीही हे जाणत नव्हता की तो आपल्या जीवनात कधी कोणत्या दिवशी शाळेत गेला असावा. तुम्ही त्याच्या बोलण्यावरुन हे सांगू शकत नव्हते. तो अगदी त्यांच्या एकाही धर्मोपदेशासारखा बोलला नाही. तो तर सापाविषयी, कुऱ्हाडी आणि—आणि—आणि जंगलाविषयी इत्यादी विषयी, पाहा, झाडांविषयी तो बोलत असे. तो त्याच्या दिवसांतील जे उपदेशक ठरविले गेले होते, त्याच्यासारखा किंवा दुसऱ्या कोणत्याही दिवसांतील उपदेशकासारखा त्यांच्या अटीतटीच्या भाषेत बोलला नाही.

240 तो तर "सेसाफरस," जसा आला, जसे आम्ही त्यांना येथे इंडियानामध्ये म्हणत असतो. तो कुठून तरी झाडा—झुडूपांतून बाहेर निघून आला आहे. त्याने आपली दाढी सुध्दा केली नव्हती. आणि केस त्याच्या डोक्यांवर उभे असे होते, मी अशी कल्पना नाही करीत की त्याने आंघोळ केली असेल, तो प्रत्येक दोन किंवा तीन महिन्यात एकदा आंघोळ करीत असणार. हे खरे आहे. त्याने रात्री काधी पायजमा नेसला नव्हता. त्याने कोणतीही कार कधी चालविली नव्हती. त्याने आपल्या दातांना कधी ब्रश केलं नव्हते. निश्चितच त्याने तसे केले नव्हते, ओह, माझ्या देवा, तो काय व्यक्ती असेल!

241 येथे तो येतो, तो जंगलातून त्याचप्रकारे बाहेर निघून येतो आणि म्हणतो, "मीच अरण्यात ओरडणारी वाणी आहे. प्रभूसाठी एक मार्ग तयार करा, आणि त्याच्यासाठी राजमार्ग तयार करा!"

242 काही शिक्षक जे तेथे उभे असतील त्यांनी म्हटले असेल, "हे! मुला, तुझ्याकडे काय आहे...या मोहीमेत आम्ही तुला सहकार्य नाही करु शकत. ठीक आहे. तुमचे...ते कुठे आहे. तुमचे ओळखपत्र कुठे—कुठे आहे?" तुमची ओळख काय? त्याने तर त्याला दुर्लक्षित केले. त्याच्याकडे एक संदेश होता, म्हणून तो पुढे जात राहीला, फक्त तेथे प्रचार करीत गेला.

243 त्यांनी म्हटले, "का बरे बाबा! बरे, आपण जर आज तेथे खाली गेलो असतो, आम्ही आपल्याबरोबर तेथे खाली बिशपला घेऊन गेलो असतो, आणि पाहीले असते की तो त्याविषयी काय म्हणतो. जर आम्हाला माहीत आहे तर आम्ही खाली जातो. हे तर चर्चचे

प्रमुख. आणि आम्ही जाणतो की त्याला ते जाणून घेतले पाहीजे. तो जर देवापासून असेल तर तो आमच्या बिशपला ओळखेल."

244 त्या सर्व मान्यवरांना एकाच रांगेत होऊन उभे केले गेले.

245 त्याने म्हटले, "तुम्ही सापाची पिल्ले आहात! तुम्ही त्या गवतातील साप आहात!" त्याने असे त्या लोकांना सांगितले ज्यांची कॉलर चारही बाजूला झुकलेले होते. आणि ते "पवित्र फादर," आणि इत्यादी. त्याने म्हटले होते. "तुम्हाला कोणी सुचविले की येणाऱ्या क्रोधापासून पळावे? तुम्हाला माहीत आहे की तुमची वेळ जवळ आली आहे. तुम्ही आता विचार करु नका की...तुम्ही म्हणता, की, 'अच्छा मी तर *त्याचा* आहे, *ह्याचा* आहे.' मी तुम्हाला सांगतो, की ज्या परमेश्वराची मी सेवा करीत आहे तो या दगडांपासून अब्राहामासाठी लेकरे उत्पन्न करण्यास समर्थ आहे." ओह, माझ्या देवा!

246 आता तो उपदेशक आपल्या भाषेत त्याच्याबरोबर उलटसुलट बोलण्यास जात होता. त्याने म्हटले होते, की "मी म्हणतो की झाडाच्या मुळाशी कुऱ्हाड ठेवली आहे! म्हणून जे प्रत्येक झाड चांगली फळे देत नाहीत. ते तोडून अग्नीत टाकले जाईल! ओह, मी तुमचा बाप्तिस्मा पाण्याने पश्चातापासाठी करितो खरा, परंतु तो माझ्यामागुन येत आहे. चंद्र रक्तमय होईल! आणि, ओह, माझ्या देवा, तो आपले खळे संपूर्णतः स्वच्छ करील. आणि तो भूसी घेईल आणि न विझणाऱ्या अग्नीमध्ये टाकील. आणि तो गहू कोठारात जमा करील. तो भूसी आणि गहू वेगळे करील." ओह, माझ्या देवा! काय संदेश आहे!

247 ते म्हणाले, "हा मनुष्य? हूँ! तो काय म्हणतोय, ही कोणती—कोणती—कोणती वेळ आहे? ओह, अज्ञानी! आमच्याकडे तेथे वरती बरोबर एक व्यक्ती आहे, आमच्याजवळ भाऊ जोन्स आहेत. जर या काळात जर कोणी असा व्यक्ती आहे जो हे करील, तर तो एक असा व्यक्ती आहे जो ते करील. *अमुक—अमुक* बिशपच हे करु शकेल, *अमुक—अमुक* पवित्र फादरच हे करील." ओह, समजले?

परमेश्वर साधेपणात राहतो, पाहा, परमेश्वर साधेपणातच कार्य करीत आहे.

248 मग, पहिली गोष्ट तुम्हाला ठाऊक आहे, तो एके दिवशी तेथे उभा राहीला आणि तो म्हणाला, "होय, तो तुमच्यामध्ये उभा राहीला आहे!" तो एवढा खात्रीशीर होता की तो राजदूत होता. जो जाणत होता की तो कोण आहे. हेच कारण होते की ते त्याला पकडून ठेऊ शकत नव्हते. म्हणून टाकून दिले. त्याने म्हटले होते, "आता तुम्ही घाबरु नका, परंतु फक्त पुढे चाला, आणि पुढे चालत राहा. तुम्ही शिपायांनो, तुम्ही तुमच्या अधिकाऱ्यांचे पालन करा, आणि जर तुम्ही काही वाईट केले असेल, तुम्ही ते घ्या..."

249 "आम्ही काय करावे? काय आम्ही *हे* करणे बंद करावे काय? काय आम्हाला *असे* करणे बंद केले पाहीजे?"

250 तो म्हणाला, "तुम्ही जसे आहात तसेच आपले काम करीत राहा. आपले काम करीत राहा. आपले काम करीत राहा. पुढे जा. आणि आपले काम करीत राहा. जर तुम्ही बटाट्यांची लागवड केली असेल, तर तुम्ही ते उगवू द्या. समजले? तुम्ही जे शिपाई आहात, तुम्ही हत्या करु नका. आणि—आणि तुम्ही हे करा. आणि जे काही तुम्ही कराल, जसे तुम्ही आहात. तसेच ते करीत राहा. तुम्ही आपल्या अधिकाऱ्यांच्या आज्ञेत राहा. तसेच दुसऱ्यांच्या आज्ञेत राहा, जे त्या प्रकारचे आहेत."

"रब्बी, आपण काय करावे?"

251 "तुम्ही जसे आहात तुम्ही काम करीत राहा. परंतु तुमच्यामध्ये एक आहे, ज्याला तुम्ही ओळखत नाही." तो त्याला ओळखीत होता; तो आपल्या समयाचा संदेश ओळखत

होता. तो जाणत होता की त्याला व्यक्तीची ओळख करुन द्यावी लागेल. त्याला माहीत होते की तो व्यक्ती तेथे होता. “तुमच्यामध्ये एक आहे! तुम्ही त्याला पाहत नाही. ज्या गोष्टी चालल्या आहेत, तुम्ही त्याच्याविषयी काही जाणत नाहीत.” आणि म्हणून त्याने त्यानंतर असे म्हटले, “काहीतरी घडणार आहे.” तो म्हणाला, “तुम्ही पाहा आणि तो येथे असेल. आणि मी त्याला ओळखीन.”

252 आणि शेवटी, एके दिवशी, तो म्हणाला, “पाहा, तो तेथे आहे! तेथे परमेश्वराचा कोकरा आहे जो जगाची पापे हरण करुन नेतो!” आणि म्हटले, “आणि आता माझा समय पुरा झाला. मी त्याचा तुमच्याशी परिचय करुन दिला, आता मी घटलो पाहीजे, आता मला दृश्यावरुन हटले पाहीजे, आता येथून पुढे तो सांभाळील.”

“हजार वर्षाला आरंभ होईल; आणि पाहा, त्याची वेळ फार जवळ आली आहे.” नंतर मग जेव्हा तो येतो, जेव्हा...

253 अगदी योहान म्हणाला होता, “ओह, तो करण्यास जात आहे, तो भुस वेगळी करण्यासाठी जात आहे. तो—तो भुस गव्हापासून वेगळी करण्यासाठी जात आहे, आणि तो त्याला जाळण्यासाठी जात आहे. आणि त्याचे सूप त्याच्या हातात आहे, आणि तो आपले खळे अगदी निर्मळ करण्यास जात आहे!” परंतु ते काय होते? छोटासा...

254 आता पाहा, परंतु त्या लोकांनी त्याचे असे चित्र रंगवले होते. की, “ओह, माणसा! त्याच्याजवळ एक भाला होता जो एक मैल दूरपर्यंत जाऊ शकत होता. तो येथे वरती पॅलेस्टाईनमध्ये मागे उभा राहील. तो फक्त तेथे वरती उभा राहील. आणि बस...त्या पांढऱ्या ढगांतील कोणत्या एका ढगावर उभा राहील. आणि तो त्या सर्व रोमी लोकांना *ह्याप्र*कारे उचलील आणि नरकात फेकून देईल. तो फक्त असेच करीत राहील, जो पर्यंत की त्यांना सर्व जागेतून घेऊन फेकत नाही.” का, त्यांनी त्याचे अशाप्रकारे चित्र रंगविले होते.

आणि जेव्हा तो होता, जेव्हा तो लहान कोकरा त्याच्या मधून बाहेर निघून येतो, तो नम्र आणि सौम्य असतो, आणि त्याला ह्या बाजूला आणि *त्या* बाजूला धक्का मारला जातो.

255 अर्थात योहान म्हणाला, आता योहानाकडे पाहा जो संदेष्टा आहे;तो म्हणाला, “जा आणि त्याला विचारा. काय खरोखर तोच आहे ना?” तो एवढा नम्र होता की संदेष्टा सुध्दा ओळखू शकला नाही. त्याने म्हटले होते, “काय तोच आहे की आम्ही कोणा दुसऱ्याची वाट पाहावी?”

256 आता पाहा, त्याने मत्तय 11 मध्ये—मध्ये त्या शिष्यांना कोणते कधी पुस्तक दिले नव्हते. ते येतात, आणि त्याला विचारतात जेव्हा योहानाचे शिष्य...

योहान हा बंदीशाळेत होता, तो एवढा अधिक गोंधळात पडला होता की तो...मला वाटते की तो मेंबर होता ज्याने असे म्हटले होते की, “तेथे खाली त्याच्या गरुड डोळ्यांवर आच्छादन आले होते,” समजले तुम्ही...तो—तो जमिनीवर खाली आला होता. तो हवेत राहत होता. परंतु त्याची भविष्यवाणी पूर्ण झाली होती. तो पुन्हा भुमिवर आला होता. कारण पाहा, त्याला बंदीशाळेत टाकण्यात आले होते. त्याला त्या मोठ्यामोठ्या पंखाचा अधिक उपयोग करण्याची काही गरज नव्हती. म्हणून तो तेथे खाली पडून राहीला. परंतु तो बाकीच्या इतराहून अधिक उंच उडला होता.

257 मला तुम्हाला काही दाखवू द्या. परमेश्वराने त्याचा उपयोग केला होता. आणि तुम्ही पाहा, की येशू जाणता होता, कारण तो परमेश्वराचा देहधारी स्वरुप होता. समजले? तो होता…म्हणून तो—तो म्हणाला होता, त्याने म्हटले होते…

आता पाहा, त्याने कधीही असे पुस्तक दिले नव्हते, की त्याला बंदीशाळेत कसे वागले पाहीजे, त्याने हे सांगितले नव्हते. “आता जरा एक मिनिट थांबा. मी येथे एक लहानसा निबंध लिहीतो, आणि तुम्ही त्याला घेऊन जा. आणि योहानाला सांगा की जोपर्यंत तो बंदीशाळेत आहे, त्याने माझ्याखातीर कशी वर्तणुक ठेवावी.” पाहा? नाही. त्याने असे कधीच म्हटले नाही.

258 तो तसे म्हणाला नाही, “जा योहानाला सांगा की त्याने सेवकाईला सुरुवात करण्यापूर्वी त्याच्याकडे पिचडी.ची डिग्री घ्यावी लागेल.” समजले? जर त्याने तसे केले असते, तर तो देखील त्या बाकीच्या लोकांपैकी एक असता, तो सुध्दा नापसंत करणाऱ्यांतील असता.

योहान हा प्रामाणिक होता आणि त्याने प्रश्न विचारला होता.

259 आणि त्याने म्हटले होते, “तुम्ही तोपर्यंत तेथे थांबा जोपर्यंत ही सभा संपत नाही, आणि मग पुन्हा जाऊन योहानाला दाखवा जे घडले ते, तेव्हा तो ओळखेल. जर तुम्ही त्याला सांगाल की काय घडत आहे, तर तो समजून जाईल.” पाहा? समजले? “फक्त जाऊन त्याला…त्याला सांग. जाऊन त्याला सांग…तो तर बंदीशाळेत आहे आणि तो तेथे येऊ शकत नाही. परंतु—परंतु तुम्ही तर सभेत बसलेले आहा. आणि तुम्ही तर पाहीले आहे, की काय घडले आहे. तुम्ही जाऊन त्याला सांगा.”

म्हणून मग शिष्य म्हणाले, “ठीक आहे, गुरुजी.”

260 आणि ते त्या टेकडीवर गेले. येशू त्या खडकावर बसून त्यांच्याकडे फक्त पाहु लागला जोपर्यंत ते पार होऊन जात नाहीत आणि टेकडीवर पोहचत नाही.

261 तो जमलेल्या लोकांकडे वळला, आणि म्हणाला, “योहानाच्या वेळी तुम्ही कोणाला—कोणाला पाहायला गेला होता?” पाहा? म्हणाला, “तुम्ही काय पाहायला गेला होता? काय तुम्ही त्या मनुष्याला पाहण्यास गेला होता ज्याची कॉलर दुमडलेली आहे, आणि तो मऊ वस्त्र परिधान करतो, आणि खूप शिक्षित व अतीप्रतिष्ठीत अशा प्रकारच्या माणसाला पाहण्यास तुम्ही गेला होता?” म्हणाला, “नाही, तुम्ही जाणता की ते कोणत्या प्रकारचे असतात? ते तर मुलांचे चुंबन घेतात आणि तुम्हाला माहीत आहे, की असे लोक राजमहलात काम करतात. ते—ते योहान तर अशा प्रकारचा मनुष्य नव्हता.”

262 म्हणाला, “अच्छा, मग तुम्ही काय पाहण्यास गेले होते? काय तुम्ही एका अशा मनुष्याला पाहण्यास गेला होता, ज्याला एक सेवकाई दिली होती. आणि तो कोणत्या तरी संस्थेत किंवा अशाप्रकारच्या ठिकाणी त्याला ठेवू देईल? वाऱ्याने हालविलेला बोरु… मग जर—जर वननेस संस्था त्याला पसंत करीत नाही, तर तो ट्रिनिटी संस्थेत जाईल? आणि जर ट्रीनिटी त्याला जर पसंत करीत नसेल, तर तो चर्च ऑफ गॉड संस्थेत निघून जाईल किंवा अन्य कुठेही निघून जाईल? काय तुम्ही अशा प्रकारच्या कोणत्या व्यक्तीस पाहण्यासाठी गेले होता? ओह! नाही. नाही योहान.”

263 तो म्हणाला, “मग तुम्ही काय पाहायला गेला होता? एक संदेष्टा?” तो म्हणाला, “आणि मी म्हणतो खरेच. परंतु मी तुम्हाला काहीतरी सांगणार आहे जे तुम्हाला माहीत नाहीये. तो संदेष्ट्याहूनही अधिक होता. तो संदेष्ट्याहून ही अधिक होता. जर तुम्ही त्याला ग्रहण करु शकत असाल, तर तो तोच आहे ज्याच्याविषयी बायबलमध्ये वचनात मलाखी

3 मध्ये, असे लिहिले आहे, 'पाहा मी आपला निरोप्या मजपुढे मार्ग तयार करण्यासाठी पाठवितो, तो मजपुढे मार्ग तयार करील.'" समजले?

264 आणि त्यांना समजले नव्हते. तेच काय शिष्यांना देखिल समजले नव्हते. पाहा. हे खरे आहे. ओह माझ्या देवा! साधेपणा! नम्र असा. पाहा. तुम्ही साधे लीन होत जा... जेव्हा परमेश्वर काही मोठ्या गोष्टींचे अभिवचन देतो, तेव्हा ती त्याच्या दृष्टीने मोठालीच गोष्ट असते.

265 आता, जर तुम्ही आपल्या मनात हे कायम ठेऊ इच्छिता...मला तुमच्यापासून हे पाहीजे की...तुम्ही आपल्या मनात हे ठेवा. आणि जेव्हा ती घडेल, तेव्हा तुम्ही ती बदलू शकता. तुम्ही खाली पोहचता आणि तो एक लहानसा पुष्प त्या फुलांतून होतो जो या वर्षी उगवला आहे किंवा गवताच्या एका साध्या काडीला घेता आणि आपल्या हातात पकडता आणि म्हणता, "आता मी त्याला पकडण्यास जात आहे, आणि पाहा ही खूप साधी आहे, साधेपणाने *तीला* बनविले गेले आहे. आणि मी त्या बुध्दीला बघु इच्छितो, जे चंद्रावर रॉकेट पाठवू शकतात. गवताची पाती बनवितात. तुम्हाकडे ते कायम असते." तुम्ही त्यावर खात्रीपूर्ण राहू शकतात तुमच्याकडे ते कायम असते. पाहा. पाहा, गवताच्या त्या पातीच्या आत एक जीवन असते. तो फारच साधा आणि नम्र असतो.

266 तुम्ही, पाहा, जर कोणी मनुष्य खूप मोठा असेल, ठीक आहे, परंतु जर तो एवढा मोठा आहे की तो साधा बनू शकतो. पाहा, त्याला देव सापडेल. परंतु जर तो साधा बनत नाही, तो कधीच त्याला पाहू शकत नाही. म्हणून तुम्हाला साधे बनले पाहीजे. आता वचन.

**195. प्रकटीकरण 5:9 वचनात जे गीत गाताना दिसता...जर कोकरा त्या पुस्तकाला घेतो, तर जे गीत गाताना आढळतात ते कोण आहेत? काय—काय ते स्वर्गात वर उचलले गेलेले पवित्र लोक आहेत?**

267 नाही, प्रकटीकरण 6...ऐवजी प्रकटीकरण 5:9 नाही, जर तुम्ही लक्ष द्याल, तर हे पवित्र लोक नाहीत. त्याच्या जवळ होते...त्याने अजून पर्यंत आपल्या धनसंपत्तीचा दावा केलेला नाहीए. समजले? हे पवित्र लोक नाहीत. जर तुम्ही लक्ष द्याला, तर ते वडील मंडळी आणि प्राणी आहेत, आणि तेच येथे गीत गातात.

268 या आपण ते वाचू, म्हणून तो व्यक्ती...आणि मग मी प्रयत्न करीन...माझ्याजवळ येथे जवळजवळ अर्धा डझन पेक्षा जास्त प्रश्न आहेत. आणि मला वाटते मी त्याचे थोड्याच मिनिटात उत्तर देऊ शकतो. या, आपण प्रकटीकरण 5:9 पाहू. या, आता आपण त्या अगोदर थोडेसे वाचू. यासाठी की ज्या व्यक्तीने हा प्रश्न विचारला आहे...तो त्या विषयी प्रामाणिक आहे आणि तो ते जाणू इच्छितो. पाहा.

> *त्याने गुंडाळी घेतली तेव्हा ते चार प्राणी व चोवीस वडील कोकऱ्याच्या पाया पडले. त्या प्रत्येकाजवळ वीणा व धुपाने भरलेल्या...सोन्याच्या वाट्या होत्या. त्या वाट्या म्हणजे पवित्र जनांच्या प्रार्थना होत.*
>
> *ते नवे गीत गाऊन म्हणतात.* (पाहा, समजले?) *तू गुंडाळी घ्यावयास, व तिचे शिक्के फोडावयास योग्य आहेस* (पाहा?)...*तू आम्हाला सोडवले आहे...*
>
> *आणि...आम्हाला याजक आणि राजे असे केले आहे.*

269 हा तर स्वर्गीय समुह आहे. अजून मुक्ती पावलेले नाहीत. ठीक आहे. आता.

**भाऊ ब्रॅन्हम, जर सर्व...**

आता, जरा एक मिनिट [भाऊ ब्रॅन्हम शांत होतात—संपा] मला वाटते, कि... माफ करा.

**भाऊ ब्रॅन्हम, जर–सर्व भक्त समुह,** (हँ) **भक्त समुह जर स्वर्गरोहणात गेले, तर एलिया आणि...मोशे कुठून येतील.**

270 कुठे तरी काही गडबड आहे. काही गडबड वाटत आहे. ह्याच्या विषयी हेच सर्व आहे. काहीतरी झालेलं आहे. पाहा? कुठेतरी काही चुकीचे झाले आहे. सर्वजण ठिक वाटत आहे ना? [मंडळी म्हणते, आमेन—संपा.] तेथे ...काही आजार किंवा अन्य काही नाहीए?

[एक भाऊ सभेतून म्हणतो, "प्रकटीकरण 5व्या अध्यायातील 9 वे वचन पुन्हा वाचावे."] या प्रकटीकरण पुस्तकात पाहू.... भावा ते कुठे होते? ["5."] 5. ["5."]

ओह, हा प्रश्न, ओह हाच तो प्रश्न आहे, ज्याचे मी उत्तर दिले आहे. आता या, आपण पाहु. "तू..." तो बिलकुल योग्य जागी आहे:

*आणि जेव्हा त्याने पुस्तक...घेतले तेव्हा ते चार प्राणी व चोवीस वडील कोकऱ्याच्या पाया पडले, त्या प्रत्येकाजवळ वीणा व धुपाने भरलेल्या सोन्याच्या वाट्या होत्या, त्या वाट्या म्हणजे पवित्र जनांच्या प्रार्थना होत.*

*ते नवे गीत गाऊन म्हणतात. तू गुंडाळी घ्यावयास व तिचे शिक्के फोडावयास योग्य आहेस. कारण तू...वधला गेला होतास...*

हाच तो प्रश्न आहे! हाच तो प्रश्न आहे! मी येथे चुकलो होतो. समजले?

*...आणि तू आपल्या रक्ताने सर्व वंश, आमच्या 'देवासाठी' विकत घेतले आहेत. (मुक्त केले आहेत...)*

271 हे खरे आहे. आता, तुम्ही याविषयी काय विचार करता? ओह, जर पवित्र आत्म्याची उपस्थिती येथे नसेल, तर मग काय आहे? तो करु देणार नाही...पाहा, मी फक्त त्या वचनाचा पहिला भाग वाचला आहे पाहा, हे फक्त...किंवा काहीतरी लिहिलेलं आहे. आणि उत्तर देण्याचा मी प्रयत्न करीत होतो, घड्याळाकडे पाहून. पररंतु तुम्ही पाहीलं ना मला तेथे कसे थांबवले? महिमा होवो, पाहा, मी त्याचा शेवटचा भाग कधी वाचलाच नाही, पाहा, माझ्याकडे ते येथे आहे. "आणि..." येथे पाहा, "आणि त्यांनी—आणि त्यांनी एक नवे गीत गाईले," आणि पाहा. मी फक्त इथवर थांबलो होतो. परंतु येथे पाहा, "आणि त्यांनी—आणि त्यांनी हे सांगताना हे गीत गाईले," तू आम्हाला प्रत्येक कुळातून, भाषा, आणि जातींतून विकत घेतले आहे (मुक्त केले) निश्चितच, ते आहेत. ओह! माझ्या देवा! ओह, माझ्या देवा! काय तुम्ही समजले? आणि तरीही येथे एक अजून प्रश्न आहे.

**196. काय आपण नियंत्रित जे आपण दिले आहे...ठीक आहे; प्रकटीकरण 6:11 प्रमाणे "जे शुभ्र वस्त्र देण्यात आले," ते त्याच्या बरोबर समजवू शकतो "ज्यांनी त्यांचे झगे कोकऱ्यांच्या रक्तात धुतले आहेत?"**

272 आता, पाहू या, प्रकटीकरण 6. लोकांनो पाहा, मी याविषयी घाई करणार नाही. जशी मी येथे केली. पाहा, कारण असे तर...मी काही चुकीचे उत्तर देऊन जाईन. आता, त्याला—त्याला नकोय त्याची इच्छा नाहीए की मी असे करावे. हे खरे आहे, म्हणून मला मदत करा. देवाचा पवित्र आत्मा जाणतो की हे सत्य आहे. पाहा? मी फक्त...तेथे काहीतरी आहे फक्त...मी—मी त्याच्याकडे दृष्टी लावली...मी घड्याळावर दृष्टी लावत होतो, की साडे अकरा वाजत आहेत, आणि मी विचार केला, "जर आता मी घाई करणार नाही, तर मी आजाऱ्यांसाठी प्रार्थना नाही करु शकणार." आणि मी त्याचे उत्तर देण्याचा प्रयत्न करीत होतो. कारण मी...आणि माझे मन हे फार...मी करु शकत नाही...

273 तुम्ही आठवण ठेवा, की तुम्हाला फक्त हे समजणे गरजेचे आहे, की मी—मी एक मनुष्यच आहे. समजले? आणि मी—मी सात दिवसांपासून तेथे आत मध्ये राहीलो आहे…आणि आजच्या दुपारी सुध्दा माझ्याकडे काही गोष्ट आहे, जी मला परमेश्वरापासून शोधणे आहे.

274 परंतु, परमेश्वर एवढा अधिक दृढ निश्चयी होता की माझ्याकडून चुक होऊ नये. म्हणूनच तर त्याने मला त्या वचनाचा बाकीचा भाग वाचण्यास सांगितला. मी तर… हे असे भासत होते की काहीतरी माझ्यावर चालत आहे, आणि म्हणाला, "परत जा! परत जा!"

मी विचार केला, काय "'परत जाऊ'? काय? काय येथे आताच थांबू आणि आजाऱ्यांसाठी प्रार्थना करण्यास सुरुवात करु? परंतु काय—हे काय आहे? मी काय केले आहे?"

आणि मी तीतपर्यंत पोहचण्यास पुढे जाण्यास सुरुवात केली होती, कोणीतरी म्हणाला, "या वचनाचे वाचन पुन्हा करु या." आणि मी त्याला पुन्हा वाचले. आणि "प्रकटीकरण 6" च्या बरोबर खाली तो प्रश्न होता.

275 पाहा, मी त्याचा पहिला भागच वाचला होता, परंतु तो ह्या प्रश्नांसारखा भासत नव्हता. पाहा, पाहा, पहिल्या भागात तर तो होता, "आणि त्यांनी एक नवे गीत गाईले."

परंतु येथे खाली बघा, ते काय होते? त्याच्या नंतर ते खालील वचनात होते. "त्याने आम्हाला विकत घेतले आहे." खात्रीशीर, ती नवरी होती, जे स्वर्गरोहणातील संतजन. "काय आपण…" आणि येथे, खरोखरच ते पुस्तक कोकऱ्यांच्या हाती होते. तो कृपेच्या मध्यस्थीचे दयासन सोडून गेला होता. समजले? काय आपण पाहीले की पवित्र आत्मा कसा त्याला पाहतो? कारण हीच गोष्ट संतोतंत मी एके रात्री म्हणालो होतो.

276 जेव्हा तो माझ्याशी त्या खोलीत बोलला, आणि मी खाली येऊन आणि तूम्हा सर्वांना प्रचार केला, तो म्हणजे. "जेव्हा कोकऱ्याने आपले स्थळ सोडले." हे माझ्या देवा! आता मला वाटते की आपण एक धडा घेऊया. पाहा, "कोकऱ्याने आपले आसन सोडले आणि तो बाहेर आला," पाहा, जसा मी तेथे उभा राहीलो होतो, जेव्हा तो म्हणजे प्रकाश ख्रिस्त तेथे उपस्थित होता. तेव्हा त्याने हे सांगितले. जेव्हा कोकरा आपले मध्यस्थीचे आसन सोडून देतो, तेव्हा तो येथे बनतो. आणि मंडळीसाठी मुक्तीच्या दिवसाची समाप्ति होते.

277 त्यानंतरचे मुक्तीद्वार उघडते ते यहुदी लोकांसाठी, म्हणजे एक लाख चव्वेचाळीस हजार. हे खरे आहे ना? कारण त्याने अभिवचन दिले होते की, की त्यानेच झाड तोडून टाकीले आहे हे तुम्ही जाणता.

278 आता पाहा, येथे आता येथे तो म्हणजे कोकरा बाहेर येतो, आणि तेव्हा मुक्तीचा दिवस समाप्त होतो. आणि ते सर्व लोक ज्यांना मुक्ती मिळाली पाहीले, ते पहिलेच सोडविलेले गेले असतात, आणि पुस्तकात ते राखले गेले होते, आणि येथे तो बाहेर आहे आणि पुस्तक उघडत आहे. ठीक आहे!

279 हे प्रभू तुझा धन्यवाद होवो. समजले? आपल्या अधिर सेवकाने काही गोष्टीत घाई केल्याबद्दल क्षमा कर.

**आता तुम्ही प्रकटीकरण 6:11 मधील लोकांविषयी समजू शकता "ज्यांना पांढरे शुभ्र वस्त्र दिले गेले होते."…**

280 आता या, आम्ही प्रकटीकरण 6:11 पाहू ठीक आहे. ह्यावेळी आम्ही येथे ह्यावर कुठे आहोत? "शुभ्र वस्त्रे," होय, ते तर रक्तसाक्षी आहेत जे वेदीच्या खाली आढळतात. हे तर यहुदी आहेत. त्यावेळेमधील "त्यांना शुभ्र झगे दिले गेले."

> **...त्यांची तुलना प्रकटीकरण 7:14 तील लोकांशी करता येते. "ज्यांनी आपले झगे कोकऱ्याच्या रक्तात धुतलेले आहे?"**

281 नाही. आता हे वेगळे आहेत. खचीतच कारण येथे पाहा, *येथे* आम्ही बघतो की, "त्यांना पांढरे झगे देण्यात आले," त्यांना ह्या वेळेच्या आत पांढरे झगे देण्यात आले. त्यांना कृपेच्याद्वारे "पांढरे वस्त्र देण्यात आले होते." आणि जे *येथे* आहे. "त्यांनी आपले झगे कोकऱ्याच्या रक्ताने धुतले आहे," आणि हे येथे प्रकटीकरणात आहेत, ते तेच आहेत "जे सर्व मोठे समुदाय, जे देवासमोर आले होते, ते सर्व वंश, भाषा निरनिराळ्या बोलणारे सर्व राष्ट्रे होते." आणि *हे* तर प्रत्यक्षरित्या हुतात्मे झालेले यहुदी आहेत, तुम्ही समजले? आता, आता हे सत्य आहे. आता.

**197. भाऊ ब्रॅन्हम जर सर्व जे पवित्रजन जे स्वर्गरोहणात वर घेतले गेले, मग एलिया आणि मोशे हे कुठून येणार? काय ते यहुदी असणार? किंवा आमचा एलिया जो दिला गेलाय तो त्यांच्याबरोबर होईल काय?**

282 नाही. परराष्ट्रीय ज्यांच्याकडे एलियाचा अभिषिक्त केलेला आत्मा त्यांना बोलावण्यासाठी पाठवलेला हा, त्यांच्यामधून काढला जाईल. कारण तुम्ही पाहा. संपूर्ण मंडळी सर्वजण वर घेतले जातात आणि 2 संदेष्टे हे जे प्रकटीकरण 11व्या अध्यायातील—तील ते खाली आणण्यात येते आणि परराष्ट्रीयांचा कृपेचा काळ समाप्त होतो, आणि यहुद्यांकडे त्यांना पाठविण्यात येते. नाही. ते तंतोतंत तेच व्यक्ती नसणार आता, मी—मी याबाबतीत पूर्णपणे निश्चित आहे. आता लक्षात ठेवा, की ही गोष्ट मी माझ्या उत्तम समजुतीप्रमाणे सांगितली आहे.

या आता पाहा हे काय आहे काय म्हटले आहे. प्रश्न आहे की, "गहू आणि द्राक्षारस..." ओह, "काय..." गहू. नाही. मला वाटते माझे म्हणणे, "काय..." येथे "काय" हा शब्द नाहीए. हा प्रश्न तर हे सांगतो:

**198. काय, काय आणि द्राक्षारस किंवा गहू आणि द्राक्षारस, जो प्रकटीकरण 6:6 मध्ये आहे त्याचा काय...अर्थ आहे?**

या आपण पाहूया की ते काय आहे. आता जेव्हा मी त्याला पाहतो, या आपण ते वाचूया.

> *आणि जणू काय चार प्राण्यांच्या मधून निघालेली वाणी मी ऐकली ती अशी, रुपयाला शेरभर गहू आणि रुपयाला...तीन शेर जव...तेल व द्राक्षारस ह्यांची खराबी करु नको.*

283 मला वाटते की ज्या प्रश्नात विचारले आहे, त्याचा "गहू आणि द्राक्षारस" ह्याच्याशी संबंध आहे.

> **परंतु ते एक चिन्ह आहे. काय जो द्राक्षारस प्रकट...पहिल्या करिंथकरास पत्रात 11:24 च्या प्रभू भोजनाच्या मेजावर घेतला जातो, तो एका प्रतिकाच्या स्वरुपात आहे.**

284 "काय द्राक्षारस—द्राक्षारस..." नाही. पाहा. ह्यांतील एक तर आत्मिक प्रतिक आहे आणि दुसऱ्या प्रकारचा द्राक्षारस हा वास्तविक वचनाचे प्रकाशन आहे.

**199. आमच्यांतील पुष्कळ आजारी आहेत, काय त्याचे कोरण हेच आहे, कारण आम्ही प्रभूच्या देहाला ओळखत नाही?** (एकदम बरोबर).

**...परंतु आता काय ही गोष्ट आता सहावा शिक्का उघडला त्याद्वारे प्रकट झाली काय?**

285 आता, या, आपण ते पाहूया. मी फक्त पाहत आहे की काय मी या प्रश्नांना घेऊ शकतो हे तुम्ही नाहीत. हा तर मी आहे. तुम्ही केले नाही...तुम्ही हे योग्यरितीने लिहीले होते, परंतु तो मी होतो ज्याने हे वाचले आहे.

**आमच्यांतील पुष्कळ आजारी आहेत. काय त्याचे कारण हे आहे, कारण आम्ही प्रभूच्या देहाला ओळखत नाही?** (या प्रश्नाच्या शेवटी प्रश्न चिन्ह लावलेले आहे)

286 ठीक आहे, पवित्र शास्त्र म्हणते, की, "प्रभूच्या शरीराचे मर्म न ओळखल्यामुळे, तुमच्यांतील पुष्कळ जण आजारी आणि दुर्बल आहेत." हे संपूर्ण सत्य आहे. कारण, पाहा, प्रभूचा देह ही त्याची नवरी आहे. आणि त्यांच्यातील पुष्कळजण मार्ग भ्रष्ट होतात आणि ते त्याच्याबरोबर चालत नाहीत. हे सत्य आहे. पाहा, ते हे जाणत ही नाहीत की त्यांना कशाप्रकारे वागले पाहीजे. आणि ते कशाप्रकारचे जीवन व्यतीत करीतात आणि प्रभूभोजनामध्ये भाग घेतात. हे बरोबर नाहीए. समजले? जी ही लोकं प्रभू भोजनात भाग घेतात. परंतु लबाडी करतात, आणि चोरी करतात आणि नशापान करतात आणि ते—ते—ते फार भयंकर आहे. तुम्ही तसे करायला नकोय. समजले?

**...परंतु आता ही गोष्ट सहावा शिक्का उघडल्यामुळे प्रगट झाली आहे?**

287 "सहावा शिक्काच्या उघडण्याद्वारे." आता येऊ या, आपण हे पाहू या. नाही. तुम्हाला आढळते की सहाव्या शिक्क्याच्या प्रगट होणे तर यहुदी लोकांसाठी होते. पाहा, मंडळी ही निघून गेलेली आहे. हा तर महासंकटाचा काळ आहे म्हणून ही व ती गोष्ट एक अशी नाहीए. नाही, नाही. हे ते नाहीए.

288 त्यांतील एक तर आत्मिक द्राक्षारस आहे, जे वचनाचे प्रकटीकरण आहे, मग विश्वासी वचनाच्या प्रकटीकरणाद्वारे उत्तेजीत होतो. आणि दुसरे चिन्ह हे येशूच्या रक्ताचे आहे जे प्रभूच्या मेजावर घेतले जाते. आता हे सर्व माझ्या उत्तम समजुतीप्रमाणे आहे.

**200. काय जे पहिल्यापासून अगाऊ नेमलेले नाहीत ते प्रभूला स्विकारतील काय? जर तसे केले तर परत पतीत होतील काय?**

नाही, जर ते अगाऊ नेमलेले नाहीत तर ते प्रभूला ग्रहण करु शकत नाही.

**201. येथे हा जो वचनाचा लेख आहे जो असा दर्शवितो की...कॅथलिकवाद हा यहुदी लोकांना धोका देईल आणि त्यांची संपत्ती हडप करील?**

289 आता, "प्रश्न हा आहे की—की—की कुठे असे सांगितले आहे की पशु संपत्तीसाठी धोका देईल?" वचन असे म्हणत नाही. परंतु आम्ही अंदाज करितो की...आता, तुम्ही दुसऱ्या रात्रीचा संदेश आठवा. तुम्ही टेपकडे ध्यानपूर्वक लक्ष लावा. मी असे म्हटलेच नव्हते की ते काय करतील. मी म्हणालो...पाहा, कॅथलिकचा समुह हा जगातील सर्वाधिक धनवान आहे. त्यांच्यासारखा कोणी नाहीए. आणि त्यांच्याकडे जे नाही ते सर्वच यहुद्यांकडे आहे.

290 येथेच बरोबर या देशाची आर्थिक स्थिती आहे. आता...*लाईफ लाइन* नुसार (लाईफ लाईन) एक रेडीओप्रसारण आहे (जे वॉशिंग्टन डी.सी.वरुन प्रसारित होते) ह्यावेळी आम्ही पैशावरील करावर जगत आहोत, ज्याची परत फेड आजपासून चाळीस वर्षानंतर करण्यात येईल. हेच आहे ते. पैसा खर्च केला जातो. आता म्हणून आम्ही फार मागे आहोत. की

आम्ही त्या करांवर हुंडी देतोय ज्याची परतफेड आतापासून चाळीस वर्षात केली जाईल. हे राष्ट्र आर्थिकदृष्ट्या मोडकळीस आले आहे. हे राष्ट्र समाप्त झाले आहे.

291 आता, पाहा केस्ट्रोने, जे कधी समजदारी चे काम केले होते, त्याने ते तेव्हा केले होते, जेव्हा त्याने नकली चलनाच्या नोटी आणल्या आणि त्याने हुंडी आणि बँडची परतफेड केली आणि त्यांना जाळून टाकले होते आणि त्याने चलनीनोटा बदलल्या होत्या, हेच कार्य तो करु शकत होता.

आणि संयुक्त राज्य अमेरिका करण्यासाठी तेथे फक्त एकच गोष्ट उरली आहे. पाहा, लक्षात ठेवा, हा विल्यम ब्रॅन्हम बोलत आहे, पाहा. ही माझी संकल्पना आहे. हा माझा अंदाज आहे, यावर फक्त नैसर्गिकरित्या दृष्टी टाकली जात आहे, कदाचित हा विचार लाखो मैल दूरच्या असेलही मी असा विश्वास करतो की तेथेच कुठे त्या पैशामध्ये... "पैश्याचा लोभ सर्व प्रकारच्या वाईटाचे मूळ आहे." आणि मी विश्वास करतो की तेथे कुठे एक चेंडूप्रमाणे चढ–उतार चालू होईल.

292 आता, पाहा की कॅथलिक मंडळी मागिल काळात मिस्सा बली आणि इत्यादी कडून जगातील संपत्तीचा धनी झाली आहे. आपण लक्षात ठेवा, की बायबल म्हणते की "ती धनवान आहे," आणि म्हणते की ती कशी आहे. आणि लक्षात ठेवा, किती केवळ कोणत्या राष्ट्रापेक्षा धनवान आहे. परंतु आकाशाखालील प्रत्येक राष्ट्रांहून धनवान आहे. त्यांच्याजवळ पैसा आहे. आता जे त्यांच्याजवळ नाहीए, ते वॉल स्ट्रीटकडे आहे, ज्याचा ताबा यहुदी लोकांकडे आहे.

293 आणि आता तुम्ही स्मरण ठेवा की (कालच्या रात्री आम्ही हे पाहीले होते) जेव्हा याकोब परत आला आणि इस्त्राएल बनला तेव्हा त्याच्याजवळ धन होते. परंतु त्याच्या पैश्याने त्याला एसावाचे विकत घेता आले नाही, समजले, कारण एसावाकडे सुध्दा धन होते. पाहा. दोघेही विरोधी होते. आणि—आणि एक...पाहा. हे जणू एक परिपूर्ण दर्शक दिसते.

294 आता येथे पाहा. मी असे म्हटले होते की कदाचित ते पैश्याच्या विचाराने एकत्रित होऊन धनाचे एकीकरण करण्यास पाहतील, आणि—आणि रोमी ताकद यहुद्यांची ताकद आणि धन हडपून टाकील, आणि करार मोडतील. कदाचित तसे होईलच असे नाही. समजले? मी हे जाणतो की ते करार मोडतील, परंतु मी—मी त्याचा करार मोडण्याचे कारण जाणत नाही, कारण ते काय करतील हे मला प्रगट केले गेले नाही.

295 परंतु पाहा, आता, आज जर, आता आज जर आम्ही केवळ काय कार्य करु शकतो, काय करु शकतो? (जर हा संदर्भ खरा आहे) जर आम्ही मुद्रेवरुन कराची वसुली करत असू—आम्ही त्या करातून प्राप्त झालेल्या धनावर जीवन कंठीत आहोत ज्याची परतफेड चाळीस वर्षात केली जाणार आहे. आमचे सोने आहे...आम्ही तर खर्च करुन चुकलो आहोत. आम्ही कोलमडलो आहोत. आमच्याकडे काही धन नाहीए. आणि आम्ही तर आमच्या नावलौकीकावर जीवन व्यतित करीत आहो.

296 हेच ते आहे जे आजच्या नामधारी मंडळ्या करीत आहेत; वधुनाही. परंतु नामधारी मंडळ्याच असं करीत आहेत. ती आपल्या नावलौकीकावर जीवन व्यतीत करीत आहे जी तिने सिंह काळात पूर्वी सेवकाईत केली होती. "आम्ही मंडळी आहोत! आम्ही आई म्हटलेली मंडळी आहोत. आम्ही सुरुवात केली..." हे खरे आहे, समजले? ती आपल्या नावलौकीकावर आहे.

297 मेथडीस्ट आपल्या पूर्व प्रतिष्ठेवर जगत आहेत. बाप्टीस्ट आपल्या पूर्व प्रतिष्ठेवर जगत आहेत. पेंटेकॉस्टल आपल्या नावलौकीकावर जगत आहेत. "परमेश्वराची स्तुती होवो!"

काही काळापूर्वी जेव्हा संतजन आत्म्यात होऊन नाचत होते आणि कसे ते...प्रभूने *हे* केले *ते* केले." हे तर असे आहे जे भुतकाळात झाले होते. "भावांनो आता आम्ही सर्व मोठे झालो आहो." समजले? ही सर्व नावलौकीकता आहे.

298 हे राष्ट्र त्या नावलौकीकतेवर जगत आहेत की आमचे पूर्वज कसे होते. आणि हेच कारण आहे की आम्ही विचार करतो, की आम्ही वाचलो जाणार. परमेश्वराने इस्त्राएलांचा या आधारावर आदर केला नव्हता की ते कोण होते, की ते काय करीत होते, की ते तेव्हा काय होते! लक्ष द्या.

299 परंतु आता, येथे मला वाटते, जे मी—मी विचार करतोय तेच होईल. आता पाहा, असे कदाचित होणारही नाही. मी असा विश्वास करतो की असा समय जेव्हा आम्हाला आर्थिक नियोजनाशी संबंधित परिस्थीत दबाव आणिल. आणि जेव्हा असे होईल, तेव्हा आमच्या चलनाच्या बदलाऐवजी...ते फिलिप्स मॉरिस कंपनीला करील? तो व्हिस्की कंपनीसाठी काय करील? तो स्टील उद्योगाकरिता काय करील? तो संपूर्ण वाणिज्य विभागाकरिता काय करिल? तो काय करिल? तो त्यांना तोडून टाकील. ते कोलमडलेल्या अवस्थेत पोहचतील. परंतु जर "आम्ही ते पैसे कर्जाने घेऊ शकतो." तुम्ही पाहू शकता की तो किती चलाख आहे?

300 मग देश मंडळीला विकला जाईल. आणि मग चर्च आणि राज्याचे एकीकरण होईल. आणि ती त्या स्थितीला पोहचेल. समजले? असेच आहे. अवलोकन करा. ठीक आहे. आता तुम्ही यावर लक्ष द्या:

**202. जर कोणी एक आपल्या सरकारच्या द्वारे बनविलेल्या संख्येशी संलग्न असेल आणि तो आपल्या हृदयातील अलेखित संदेशाला किंवा शेवटच्या दिवसांतील सत्याविषयी बोलू शकतो, तर मग त्याचा शब्द "वेश्येंचा" पैकी एक असा असेल काय?**

301 या आणि पाहू या. "जर कोणी संस्थेशी संलग्न..." ठीक आहे. पाहा, संस्थेशी संलग्न; संस्था जीला सरकारकडून बोलण्याचा अधिकार आहे. पाहा, त्याचे हृदयाशी काही कर्तव्य नाही. समजले? आता पाहा, तो जर एक खरा विश्वासी आहे आणि परमेश्वराच्या आत्म्याने जन्मलेला आहे. तर तो कधी ना कधी तरी किंवा अन्य कोणाही द्वारे पारखला जाईल. समजले? हे असे असू शकत नाही. की ते एकदम सरळ आहे आणि तरी त्याला ते समजत नाही.

302 आता मी तुमच्याकडून अपेक्षितो...मित्रांनो, मी असे अपेक्षितो की तुम्ही ह्याचे स्मरण ठेवावे की परमेश्वराने—परमेश्वराने असे कधी केले नाही किंवा जितपर्यंत मी आठवण करु शकतो, पाहा, परंतु काय...

303 पाहा, येशू ह्या सर्वांचा मुख्य व्यक्ती होता. कारण तो परमेश्वर होता जो देहधारी झाला होता, तो इम्मानुएल होता. आता त्याला पाहा ह्या व्यक्तिला येशूला पाहा. जेव्हा...काय तुम्हाला माहीत आहे, जेव्हा तो पृथ्वीवर आला, तेथे पृथ्वीवर एवढे लोक नव्हते...मला वाटते की जगातील एक दशांश भागच ओळखत होता की तो येथे आहे?

काय तुम्ही जाणता, जेव्हा तो निरोप्या येतो. जेव्हा संपूर्ण "डोंगर," आणि अन्य सर्व घटना घडल्या, मला वाटते की इस्त्राएलांच्या लोक संख्येतून शंभरातील एका व्यक्तीलाही त्याच्याविषयी ओळख नव्हती. काय हे अद्भूत नाहीए?

304 का; तेव्हा संपूर्ण जगभरात लोक यहुदी नव्हते काय? आता आठवण ठेवा, की येशू एक साक्ष बनवण्यासाठी आला. तो जगाच्या उध्दारकर्त्याच्या रुपात आला. काय हे

योग्य आहे? का तेथे लोक होते, लोकांनंतर अजून लोक आले. पिढीनंतर पीढी आली, लोकांनंतर अजून लोक आले, परंतु त्यांनी त्याच्याविषयी जाणले नाही. ते तर पुढे जात राहीले. आणि त्यांनी त्याच्याविषयी काहीही समजले नाही, जसे जगाने ओळखले नव्हते, परंतु हे जगात सर्व समयी चालत राहीले. समजले?

305 का त्याने त्यांना आपणांस ओळखू दिले नाही? तो आला आणि त्यांनीच त्याला ग्रहण केले; जे अगाऊच अनंत जीवनासाठी नियुक्त केलेले होते. बाकीच्या लोकांविषयी सांगण्यासारखी कोणतीच चांगली गोष्ट नाहीए; कारण तो त्यांना वाचवू शकत नव्हता, कारण ते वाचविण्याजोगे नव्हते. जेव्हा ते धर्मगुरु तेथे उभे होते, तर हे असे का होते? त्याला तर त्या ठिकाणापर्यंत यायचे होते कारण अगाऊच निवडलेले लोक सर्व ठिकाणी पसरलेले होते. म्हणून त्यांना एक समुह म्हणून प्रचार करायचा होता.

306 आणि त्या महान विद्वानांनी तर त्याला ओळखायला हवे होते, म्हणाले, “हा माणूस बालजबूल आहे, आम्ही या व्यक्तीला आमच्यावर प्रभूत्व वगैरे करु देणार नाही. आम्ही त्याला नाही करणार.”

परंतु ती एक छोटी वेश्या जिच्या आत ते जीवन होते, ती अनंत जीवनासाठी अगाऊच निवडलेली होती, आणि तिचे नाव येथे देवाच्या वचनात अमरत्त्वात लिहीलेले होते, तो तेथपर्यंत चालत आला, आणि प्रथमच तो प्रकाश त्या छोट्या बीजावर पडला, तेव्हा तीने लगेचच त्याला ओळखले. [भाऊ ब्रॅन्हम आपले बोट—सम्पा.]

307 त्या वृध्द कोळ्याला पाहा जो तेथे येतो. येथे तो उभा होता. आणि चिन्ह आणि चमत्त्कार करीत होता, आणि—आणि अनेक लोकांना त्यांच्या हृदयातील गुप्त गोष्टी सांगत होता आणि स्वत:ला प्रगट करीत होता.

आणि तेथेच ते परुशी उभे होते, “हा व्यक्ति तर बालजबूल आहे.” त्यांना आपल्या मंडळीला उत्तर द्यावे लागत असे.

308 ते सर्व चारही बाजूला उभे होते, आणि त्यांनी म्हटले, “डॉ.जोन्स काय तुम्ही खाली जाल आणि ह्या व्यक्तिचे ऐकाल? असे वाटते की तो—तो काय बोलतोय ते त्याला कळतेय काय? तो साधारण लोकांसारखा बोलत नाहीए.”

309 “मी त्याचे ऐकेन आणि पाहा.” तो तेथे खाली चालला आहे, होय, परमेश्वर—परमेश्वर त्याच्याजवळ कधी जाऊ शकत नाही.

आणि तो तेथे उभा होता. आणि त्याने सांगितले...

त्यांनी सांगितले, “आता येथे पाहा. तेथे पाहा. तेथे एक व्यक्ती येतो. त्याच्या शिष्यांतील एक येतो. आता तेथे एक व्यक्ती येतो. त्या व्यक्तीचे नाव अंद्रीया होते. आपण आठवण ठेवा. ओह, काय तुम्हाला तो वृध्द—वृध्द कोळीची आठवतो; जो तेथे खाली असत असे? होय तेच ते. होय तेथे—तेथे त्याचा भाऊ शिमोन आहे. समजले? आणि ते—ते वृध्द योनाचे पुत्र आहेत. आता, ते तेथे...पाहा, तो—तो त्याच्या बरोबर कोणाला तरी घेऊन येत आहे. कोण आहे तो? ठीक आहे. पाहूया की आता तो काय करीत आहे. तो—तो येथे येणारा वेगळा व्यक्ती आहे.” आणि तो त्याच्याजवळ चालत येतो.

आणि तो म्हणतो, “तुझे नाव शिमोन आहे, आणि तू योनाचा पुत्र आहेस.”

310 “हा माणूस बालजबूल आहे! पाहा, त्याच्यावर एक प्रकारचा आत्मा आहे. तो एक विचित्र व्यक्ती आहे, समजले? पाहा, तुम्ही सरळ राहा, आणि तुम्ही सर्व अशा प्रकारच्या कोणत्याही गोष्टींवर कान देऊ नका. स्वतःला त्यापासून दूर ठेवा. पाहा, मी तर अशाप्रकारच्या कोणत्या सभेत कदाचित कधी येणार ही नाही. जशी ही सभा समाप्त होईल

तशी आम्ही येथून बाहेर निघून जाऊ. आम्ही येथे पुन्हा कधी येणार नाही." समजले? का बरे? आता पाहा हेच होते जे त्यांनी विचार केला होता आणि त्याला त्यांच्यातील एक व्हायला हवे होते. पाहा, ज्या लोकांकडे तो आला होता. त्यांनीच त्याला क्रुसावर चढविले होते. समजले?

311 परंतु तेथे एक छोटी वेश्या होती, जिला सर्वजण बाहेर फेकत होते. मी वेश्यावृत्ती मान्यता नाही देत आहे. खचितच नाही. मी असे करीत नाहीए! परंतु मी तर तुम्हाला अगाऊ निवडलेले बीज दाखवू इच्छितो.

312 आता तुम्ही येथे या व्यक्तीला पाहा, हा वृध्द कोळी नाही. करु शकत होता...बायबल म्हणते तो अशिक्षित होता. काय हे बरोबर आहे ना? तो केवळ अशिक्षित नव्हता तर तो अज्ञानी सुध्दा होता. आता, काय ही गोष्ट खरी आहे किंवा खोटी आहे? ओह, आम्ही केवळ ह्या अनेक गोष्टींविषयी अज्ञानी बनू ज्याविषयी आम्ही विचार करतो की आम्ही त्यांना ओळखतो. समजले? हे खरे आहे. पाहा, तो अशिक्षित व अज्ञानी दोन्ही होता. आणि तेव्हा तो तेथे प्रभू येशूच्या उपस्थितीत चालून आला आणि प्रभू येशूने त्यांना सांगितले की तो कोण होता. आणि तेथेच तेव्हा त्याने ठरवून टाकले होते.

313 आता पाहा, की ह्या दुसऱ्या व्यक्तीचा त्याच्याविरुध्द काय वाद होता? "अच्छा, पाहा, त्याने त्याचा विश्वास केला, पाहा तो कोण आहे. तुम्ही जाणता की तो कोण आहे. अच्छा, त्या व्यक्तीने तर कधी...का बरे—का बरे. तो तर एक कोळी होता. का? त्याला त्याची बाराखडी माहीत नाही. मी तर त्याच्याकडून मासळी खरीदी केली होती, तो तर पावतीवर सही सुध्दा करु शकत नाही. पाहा, तो तर ह्या प्रकारचा अशिक्षित व्यक्ती आहे. आणि हे त्याच प्रकारचे लोक आहेत जे त्या प्रकारच्या गोष्टी ऐकतात." प्रभूचा धन्यवाद होवो. आमेन. समजले? "का—का, तो नाही...त्याच्या वडिलांना पाहा, तो सुध्दा अशिक्षित होता. त्याने त्यांना शाळेत सुध्दा पाठविले नव्हते." परंतु हा एक असा होता ज्याला त्याने शाळेत पाठविले होते. आणि त्याला त्याप्रकारे शिक्षण दिले जसे त्याला पाहीजे होते.

314 आता, मी येथे या गोष्टीला आधार देत नाहीये की मुलांना शाळेत पाठवू नये, मी आशा करितो की तुम्ही समजता. परंतु ही तर केवळ त्याची प्रतिछाया आहे, पाहा, जी तुम्हाला त्यात प्राप्त होते. अशाप्रकारच्या गोष्टी होत्या आणि कारण होते, की ते त्यांच्या डोक्यावरुन निघून जाई.

315 आणि तुम्ही जाणता की काय आहे? एक नाही...मी म्हटले होते पृथ्वीवर संपूर्ण यहुदी लोकांमध्ये एक तृतीयांश लोकही नाहीत ज्याना त्याच्या आगमनाविषयी कधी काही ठाऊक होते. आणि—आणि पुन्हा त्या एक—एक तृतीयांश लोकांनी त्याचे ऐकले होते आणि पुन्हा त्या एक पंचमांश मधुन लोकांनी त्याचे ऐकले होते. आणि पुन्हा त्या एक पंचमांशमधुन केवळ शंभरातून एकाने स्विकार केला. तुम्ही जाणता की त्याकडे कितीजण होते. त्याच्याजवळ बारा क्रुसाजवळ उभे होते, त्या संपूर्ण समुदायातून बाकीचे कुठे होते? पाहा? सत्तरजण निघून गेले होते.

316 आता पाहा, जेव्हा तो आजाऱ्यांना बरे करीत होता, आणि केवळ खाली जात होता, आणि आपल्या शिक्षणाविषयी काहीही बोलत नव्हता; तो केवळ पुढे चालला, आजाऱ्यांना बरे करीत चालला आणि अशा प्रकारचे सर्व कार्य करीत राहीला. हे माझ्या देवा! हा परमेश्वराचा आत्मा होता जो त्याच्यावर होता. काय आपण त्याचा विश्वास करतो काय? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.] जेव्हा तो आजाऱ्यांना बरे करित होता. तेव्हा तो आश्चर्यकारक होता. "तो तर महान रब्बी आहे. म्हणाले तुम्ही सर्व भावांनी त्याला आपल्या

मंडळीत स्थान द्यायला हवे. मुला तू सामर्थ्याविषयी बोलतोस, ती व्यक्ती खरोखरच रोग्यांस बरे करु शकते! तुम्ही हे पाहीले पाहीजे. त्याला आरोग्य देण्याचे वरदान आहे."

317 ठीक आहे, खरे पाहता, ते त्याची काही नक्कल करण्यास जात आहेत. येथे ते येतात, कारण प्रत्येक समुहाजवळ आपलाच एक व्यक्ती असायला हवा.

येथे तो येतो. आणि मग पहिली गोष्ट तुम्हाला माहीत आहे, एके दिवशी तो बसून राहीला.

"ओह, हे रब्बी, निश्चयपूर्वक आम्ही तुझ्या बरोबर येतो."

318 "ठीक आहे, बसा, चला आपण जाऊया. ठीक आहे, त्याने त्या सत्तर आणि इतरांना पाठवून दिले."

महान चमत्कारांनंतर एके दिवशी तो खाली बसला आणि त्यांना वचन सांगू लागला. "आरंभी आवाज..." ठीक आहे. तो त्यांना वचन सांगू लागला, तो त्यांना सत्य सांगू लागला.

त्यांनी म्हटले, "ओह, आता, एक मिनिट थांबा! हूं! मी *त्याच्या*विषयी काही जाणत नाही." हे त्यांच्या शिक्षणाच्या विरुध्द होते. त्यांनी सांगितले की, "अच्छा, मला माहीत आहे की आम्ही सभास्थान आणि अशाप्रकारचे सर्व स्थान सोडून दिले आहेत, परंतु भावांनो, असे असू शकते की असे करुन आम्ही—आम्ही चुकलो आहोत. हे योग्य आहे की आम्ही परत फिरावे कारण हा मनुष्य तर कोडात बोलतो. हा तर एक विचित्र प्रकारचा माणूस आहे. मी *ते* समजू शकत नाही." पाहा? ते काय होते? ते बीज तर प्रारंभापासूनच निवडलेले नव्हते.

319 मग, तुम्ही ही पहिली गोष्ट समजता, की त्याच्याजवळ सेवकगणांचा लहान समुह आहे, आणि त्याने सेवकांशी बोलणे केले होते. त्यांनी म्हटले, "आ! हम! आपण ही परत जावे हेच योग्य ठरेल आणि परत जाऊन आपण संस्थेत मिळू. आणि पाहा, आपण पुन्हा आपले कागद घेऊ या. कारण हा व्यक्ती...काय माहीत परंतु कोण ह्या माणसाला समजू शकतो. तो *येथे* काही सांगतो आणि मग *तेथे* काही सांगतो. ओह!"

320 ते दुसरे त्याला त्या प्रकारे समजले नव्हते. तो त्यांतील काहीना कोडे उलगडून दाखवित होता, परंतु तो ह्या दुसऱ्यांना ते दाखवित नव्हता.

म्हणून ते सोडून निघून गेले. मग त्याने वळून आणि बारा जणांना उभे असलेले पाहीले आणि म्हणाला, "तुम्हालाही जायचे आहे काय?" समजले?

321 आता पाहा. पेत्राने म्हटले, "तुला माहीत आहे काय? मी त्या सर्व समयी त्या जुन्या जागेवर उपस्थित राहीलो आहे. मी जगात कुठे जाऊ? मी कुठे जाऊ? मी कुठे—कुठे जाऊ शकतो? माझे येथे काम करुन झाले आहे...आणि मी त्या कचऱ्याच्या डब्यात पुन्हा जाऊ इच्छित नाही, ज्यामध्ये जगातील सर्व प्रकारची घाण व मलिनता पडलेली आहे. पाहा? मी—मी...मी कुठे जाऊ? मी—मी असे करुच शकत नाही."

322 त्याने म्हटले, "मग ठीक आहे, पुढे ये, वर जा." आता पाहा. तुम्ही बरोबर त्याच स्थितीत आहा. मग ते कसे होते? तर जवळजवळ पंचवीस लाख लोकांतून बाराच त्याच्या बरोबर होते. करोडोमधील केवळ बाराच त्याच्या बरोबर होते. आणि जेव्हा या जगाचा तो उध्दारकर्ता, आणि तरीही तो नम्र होता. पाहा, तो नम्र बनून राहीला. आता पाहा.

आता पाहा, जेव्हा ते सर्व परुशी तेथे होते. आणि एक लहानगी वेश्या तेथे येते. ती म्हणाली, "बोल, तू तर एक संदेष्टा असायला हवा! आता, आम्हाला माहीत आहे की मसिहा येणार आहे, आणि जेव्हा तो येईल तेव्हा तो हे करील."

तो म्हणाला, “मी तोच आहे.”

323 ती म्हणाली, “हा तोच आहे,” आणि ती तेथून धावत सुटली, तुम्ही तीला एकदा तरी थांबविण्याचा प्रयत्न करा? तुम्हाला ते करता येणार नाही.

**203 भाऊ ब्रॅन्हम, प्रभू येशूच्या नावाने तुम्हाला शुभेच्छा, कृपया तुम्ही हे समजवा, की मत्तय 22:11 मध्ये, जो व्यक्ती लग्नाचा पोशाख घातलेला नाही. ज्या व्यक्तीने लग्नाच्या पोशाख घातला नव्हता. तो कोण होता? मला हे माहीत आहे की ह्या व्यक्तीने लग्नाचा पोशाख न घालता तो स्वर्गात प्रवेश करु शकत—शकत नाही. मला माहीत आहे की तो वधु नव्हता, तो तर पाहूणा होता.**

324 होय, ते खंर आहे. तो…होय तो तर आत शिरतो. समजले? आता पाहा. आता, मी…यावर एक प्रवचन घेऊ शकतो.

आता माझ्याकडे दहा मिनिटे आहेत, आजाऱ्यांसाठी प्रार्थना करावी आणि हे समाप्त करावे. मला वाटते. की मी त्यांतील अर्धा डझन प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. लक्ष द्या. परंतु आता मी—मी खरेतर घाई करणार आहे, ह्या प्रश्नानंतर घाई करावी लागेल. समजले?

325 जर तूम्ही पूर्वेकडील देशांची पध्दत ओळखली, तर आपण हे जाणता की येथे हेच घडले होते. समजले? जेव्हा कोणी नवरा आपल्या विवाहासाठी लोकांना आमंत्रण देतो, तर तो फार लोकांना आमंत्रण देतो. आणि त्याने पाठविलेल्या आमंत्रणानुसार द्वारपाल त्याच्यासाठी मंडपाच्या दाराशी उभा राहतो, यासाठी की त्याला पोशाख घालावा. मग तो गरिब असो किंवा तो कोणीही का असेना, त्या सर्वांना…जर तो श्रीमंत असेल किंवा गरीब काहीही का असेना, त्या सर्वांना…लग्नाचा पोशाख घालावा लागत असे.

326 जेव्हा ते त्या दरवाज्याजवळ उभे राहत, ते त्यांना तो पोशाख घालीत असे हे, त्यांच्या बाहेरच्या अस्तित्वाला झाकते. तो तर आमंत्रित केलेला आहे, तो लाखोपती असो किंवा कंगाल असो. तो एक शेतकरी असो, तो एक खड्डा खोदणारा असो किंवा कोणीही असो किंवा तो धनाड्य हो, तो—तो अशावेळी तो तेथे पोशाख नेसलेला असे. कारण हे वस्त्र तर त्याला दारावरुन नेसविले जाते जेव्हा तो दाराने आत प्रवेश करतो.

327 आता, संत योहानाच्या 10 अध्याय, मला वाटते, येथेच आहे जेथे त्याने म्हटले होते, “मी द्वार आहे,” समजले? “मी ते द्वार आहे…ज्यातून आत येऊन तुम्ही प्रवेश करता.” आता येथे तो उभा आहे, आणि येथे ही व्यक्ती आत येते, तेव्हा वस्त्र नेसण्यासाठी, पवित्र आत्मा देण्यासाठी, नितीमत्वाचा पोशाख घालण्यासाठी उभा राहतो.

